साप्ताहिक

# माणूस

शनिवार
६ एप्रिल १९७४
एक रुपया




श्याम जोशी

# दर्डाजी आता माघार घेऊ नका

अखेर सर्व बाजूंनी तोफा डागल्या गेल्यावर जवाहरलाल दर्डांनी माणूसवर एक बार उडवला आहे. गेल्या आठवड्यात दर्डांचे वकील श्री. घाटे (नागपूर) यांनी माणूसला नोटिस पाठवली आणि एका आठवड्याच्या आत माणूसने बिनशर्त माफी मागितली नाही तर माणूसच्या संपादकांना कोर्टात खेचण्याचा, दोन लाख रुपये नुकसान-भरपाई माणूसवर लादण्याचा इशारा या नोटिसीद्वारा माणूसचे संपादक-मुद्रक-प्रकाशक यांना दिला गेला.

पाठोपाठ दुसरीही एक नोटिस माणूसमधील दर्डाप्रकरणी लेखात ज्यांचा उल्लेख आलेला आहे त्या गृहस्थांनी माणूसला पाठविली आहे. श्री. बी. जी. यादव हे या गृहस्थांचे नाव. श्री. यादव यांनी पन्नास हजार रुपये नुकसानभरपाईप्रीत्यर्थ कळविले आहेत. शिवाय विनशर्त माफीचीही मागणी केली आहे.

आणखीही काही नोटिसा कदाचित येतील.

गेले महिनाभर ही वदंता होतीच. माणूसवर केस करण्यासाठी दर्डाजी कागदपत्र वगैरे गोळा करीत आहेत, संबंधित व्यक्तींशी बोलाचाली करीत आहेत अशा बातम्या यवतमाळ-नागपूरकडील दर्डांच्या निकटवर्तीय गोटातील मंडळीच माणूस कचेरीत येऊन सांगत होती. मुंबईहूनही काही गोष्टी समजत होत्या. पण दर्डा केस करायला धजावणार नाहीत, केसमुळे ते आणखीनच गोत्यात अडकतील असाही एक विचारप्रवाह होता. माणूसची अर्थात कशालाही तयारी असल्याने या उलटसुलट बातम्यांचा माणूसवर काहीही परिणाम होत नव्हता. उलट दिनांक ९ मार्चच्या अंकात दर्डांच्या आणखी काही भानगडी उघडकीस आणणारा लेख प्रसिद्ध करून माणूसने आपली भ्रष्टाचारविरोधी आघाडी मजबूत असल्याची पुन्हा एकदा जाणीव सर्वांना करून दिली.

होय. गेली दोन वर्षे तरी माणूसने ही आघाडी सतत गर्जत, गाजत ठेवलेली आहे. 'भाऊसाहेबांची कहाणी' या बार्शीच्या झाड-बुक्यांवरील लेखापासून तर शासकीय गोटातही या आघाडीची दखल घेतली जाऊ लागलेली आहे. त्यानंतर ठाणे, नासिक, मराठवाडा विभागातील कितीतरी प्रकरणे नावनिशीवार माणूसने उघडकीस आणली. यात वरिष्ठ सरकारी अधिकारी, सत्ताधारी किंवा विरोधी गटाचे आमदार, बँकांचे, सहकारी संस्थांचे पदाधिकारी इत्यादी मान्यवर व समाजात प्रतिष्ठित असणाऱ्या व्यक्तींचा समावेश होता. परंतु कोणीही माणूसवर केस लावण्यास धजावले नाही. बहुतेक एकाच गोळीने जनावरे घायाळ होत होती; पुरेशी राजकीय व सामाजिक जागृती असती, लोकमताचा दबाव स्थानोस्थानी निर्माण झाला असता तर माणूसने टिपलेली ही जनावरे सार्वजनिक जीवनातून कायमची दृष्टिआडही झाली असती. पण ही पुढची जोड, पाठपुरावा नाही म्हणून माणूसने आपले कार्य थांबविले नाही. एखादे प्रकरण सार्वजनिक हिताच्या दृष्टीने उघडकीस यायला हवे असे माणूसला वाटले, सकृद्दर्शनी भ्रष्टाचाराचा ढोबळ पण विश्वासार्ह तपशील हाती आला तर माणूस बिनदिक्कत तो प्रसिद्ध करीत राहिला—परिणामांची तमा न बाळगता. याच सूत्रान्वये माणूसने गेल्या ऑगस्ट महिन्यात दर्डा प्रकरण हाती घेतले आणि यावेळेपावेतो एकूण तीन लेख यासंबंधी प्रसिद्ध केले. यातील पहिल्या ऑगस्ट अंकातील लेखावर दर्डांकडून नोटिस आलेली आहे. उरलेले दोन लेख अद्याप तरी दर्डांना विचारात घ्यावेसे वाटलेले दिसत नाहीत. वास्तविक हे पुढचे

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : तेरावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ६ एप्रिल | अंक : पंचेचाळीसावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |

दोन लेखही सज्जड आहेत, दर्डांच्या गैरव्यवहारांवर भरपूर प्रकाश टाकणारे आहेत. मग दर्डाजी फक्त पहिल्याच, सात महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेल्या लेखावरच का तुटून पडलेले आहेत ?

कदाचित हे तुटून पडण्याचे नाटकही दर्डांनी केले असावे. बाहेर फार बोंबाबोंब सुरू झाली. विधानसभेत दर्डाजींनी सांगितले, 'सभागृहात काय आरोप करता ! बाहेर मैदानात या !' लोक विचारू लागले : अहो, तो 'माणूस' मैदानातच उभा आहे ना ! मग त्याला तरी उत्तरे द्या. मग दर्डाजींची अगदीच पंचाईत झाली असावी आणि काहीतरी थातुरमातुर करून तूर्त माणूसला गप्प बसविण्याचा त्यांनी हा प्रयोग चालविलेला असावा. नोटिस देऊन खटला वगैरे भरला, की न्यायप्रविष्ट प्रकरण म्हणून वृत्तपत्रे यासंबंधी काही लिहीत नाहीत, छापत नाहीत. म्हणजे एक आघाडी थंड. विधानसभेत इतर अनेक महत्त्वाचे विषय असतात. वरचेवर एकाच विषयावर चर्चा संभवत नाही. म्हणजे तीही आघाडी शांत असे लोकांच्या नजरेआड प्रकरण हळूहळू न्यायचे, ते थंड करत करत दडपायचे, लोकही हळूहळू विसरतात, नवीन प्रकरणे उद्भवतात–अशी ही एक 'कायदेशीर ट्रिक' या प्रकरणी दर्डाजींनी केली नसेलच असे सांगवत नाही. अर्थात हा एक तर्क आहे. ट्रिक किंवा धूळफेक नसून दर्डाजी खरोखरच सत्यशोधनासाठी कोर्टात जात असतील तर माणूसही कोर्टाच्या पायऱ्या अवश्य चढेल आणि या सत्यशोधनाच्या कार्यात शक्य ते सर्व सहकार्य करील. कारण माणूसचा उद्देश एखाद्या व्यक्तीला बदनाम करणे हा कधीही नव्हता, नाही. यवतमाळ-नागपूर भागातील एक भ्रष्टाचार केंद्र म्हणून माणूसने दर्डाप्रकरणाकडे पाहिले व या केंद्रांवर एक, दोन, तीन प्रहार केले. वेळप्रसंग पडल्यास आणखीही प्रहार चढवण्यास माणूस कमी करणार नाही. कारण सार्वजनिक जीवन शुद्ध रहावे, सामाजिक नीतिमूल्ये पायदळी तुडवली जाऊ नयेत, असंरक्षित अशा जनसामान्यांच्या पै-पैशाचा अपहार होऊ नये, लोकशाहीच्या निकोप परंपरा या समाजात रुजाव्यात, जोपासल्या जाव्यात, हा माणूसचा आग्रह आहे आणि त्यासाठी भ्रष्टाचारविरोधाची मोहीम माणूसने चालवलेली आहे. हा एक सत्याग्रही मार्गाने सुरू असलेला लोकशाहीलढा आहे. एखादी जखम या लढ्यात माणूसलाही होण्याची शक्यता आहे. कोण त्याविषयी चिंता करतो ? किंवा भिऊन माघारी फिरतो ? निदान माणूस तरी नाही. आम्ही तर या जखमा आनंदाने सहन करू इतकेच नाही तर, अभिमानाने मिरवूसुद्धा ! कारण अशी एक जखमसुद्धा मानसन्मानांच्या शेकडो पदकांपेक्षा अधिक मोलाची, अधिक स्फूर्तिदायक असते.

तेव्हा दर्डाजी, Proceed further. दोन गोष्टी फक्त करा. १ : कोर्टात प्रकरण मनापासून, हिरीरीने लढवा. दिरंगाईचा डाव खेळून प्रकरणातील हवा काढून घेऊ नका. २ : पुढच्या दोन लेखांवाही लवकर विचार करा आणि आणखी काही नोटिसा वगैरे पाठवायच्या असतील त्या पाठवून द्या. नाहीतर लोक म्हणतील, डोळ्यासमोरच्या मोठ्या आगीकडे दुर्लक्ष करून दर्डाजी उगाचच सात महिन्यापूर्वी लागलेल्या एका लहानशा आगीसाठी बंब बोलावीत आहेत.

आणखी एक गोष्ट. निदान नोटिसांवर तारखा वगैरे तरी नीट टाकत चला. या पहिल्या नोटिसीवर तारीखच दिलेली नाही. आतली अंकाच्या तारखेची नोंदही चुकलेली आहे. एवढा निष्काळजीपणा बरा नाही, दर्डाजी !

आणि यादवजी ! तुमचे हे दर्डा प्रकरणातील उपप्रकरण आताच कशाला काढलेत ! एक शंका येते की, अशी उपप्रकरणे माणूसवर सोडून मुख्य दर्डाप्रकरणाची धार बोथट करण्याचा, प्रतिकार विस्कळित करण्याचा हा दर्डाजींच्या योजनेचाच एक भाग तर नसावा ! असे जर असेल तर अशा उपप्रकरणात, दुय्यम विषयात माणूसने स्वतःला कितपत अडकवून घ्यावे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. यासंबंधी निर्णय घेण्यापूर्वी एकदा माणूस-वाचकांचा, मित्रपरिवाराचा कौल घ्यावा अशी कल्पना आहे. भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचा एक भाग म्हणून माणूस या दर्डाप्रकरणाकडे पाहत आहे. तेव्हा यासंबंधीच्या निर्णयप्रक्रियेत जनतेनेही सहभागी व्हावे असे माणूसला वाटते. मुख्य निर्णय अर्थात घेतला गेलेला आहे. दर्डांचे आव्हान माणूसने स्वीकारले आहे. ही उपआव्हानेही माणूसने स्वीकारावीत काय ? याविषयी वाचकांनी, सर्वसामान्य लोकांनी आपले विचार माणूसला लिहून कळविले तर ती एक स्वागतार्ह गोष्ट ठरेल. माणूसच्या भ्रष्टाचारविरोधी मंचाला त्यामुळे अधिकच उठाव मिळेल. हा मंच जेवढा लांबरुंद आणि विस्तृत तेवढा तो समाजकंटकांना कोसळविण्यास जड. तेव्हा सर्वांनी या मंच-उभारणी कार्यात सहभागी व्हावे असे आवाहन माणूस करीत आहे.

**–श्री. ग. माजगावकर**

संपादक, मुद्रक, प्रकाशक–माणूस.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ५७३५९

# बॅक–बे रिक्लमेशन

## महापौर श्री. सुधीर जोशी यांची मुलाखत

महापौरपदाचा स्वीकार केल्यानंतर अर्ध्या तासाच्या आत टेलिव्हिजनला दिलेल्या मुलाखतीत बॅक बे रिक्लमेशनच्या विरुद्ध श्री. सुधीर जोशी यांनी महाराष्ट्र शासनाला इशारा दिला होता. तेव्हापासून सतत वर्षभर त्यांनी या प्रश्नाचा पाठपुरावा केला. शासनाबरोबर चर्चा केली आणि आता अखेरीस 'ही योजना राबवायचीच असे सरकारने ठरविले, तर त्याविरुद्ध जनतेचे तीव्र आंदोलन उभारावे लागेल' अशा मताला ते आले आहेत.

बॅक बे रिक्लमेशनच्या प्रश्नावर महापौर श्री. सुधीर जोशी यांची 'माणूस' करता मुलाखत घ्यायला महापालिकेतल्या त्यांच्या प्रशस्त दालनात गेलो त्यावेळी महापौर सर्व तयारीनिशी बसलेले होते. या बॅक बे प्रकरणाच्या त्यांनी दोन खास फायलीच तयार करून घेतल्या आहेत. अनेक प्रकारची आकडेवारी, कागदपत्रे, टिपणे, आलेख, नकाशे यांनी भरलेल्या या फायलीमध्ये महापौर मुलाखतीच्या वेळी मधून मधून डोकावत होते. पण बहुतेक माहिती त्यांच्या तोंडावर होती.

मुलाखतीची सुरुवात करतानाच श्री. जोशींनी सांगितले की, ही योजना सरकार इतका इज्जतीचा प्रश्न (प्रेस्टीज इश्यू) का करीत आहे, तेच समजत नाही. ही सोन्याची अंडी देणारी कोंबडी आहे, असे नाईक सांगतात पण प्रत्यक्षात तशी स्थिती नाही. या रिक्लमेशन योजनेमुळे अनेक तोटे होणार आहेत. आणि मुंबईत सध्या राहणाऱ्या तमाम जनतेला या योजनेचा या ना त्या स्वरूपात पुढे कायम वाढता उपद्रव सहन करावा लागणार आहे. साठ लक्ष मुंबईकरांच्या जीवनाशी भयंकर खेळ खेळणारी ही बॅक बे रिक्लमेशन योजना आहे.

'या योजनेचा महापालिकेशी कितपत संबंध आहे ?'–मी.

'अहो, सारा संबंध महापालिकेशीच. सरकार फक्त समुद्र बुजवणार. त्या जागी बांधायच्या इमारतींना पाणी आम्ही पुरवायचे, रस्ते आम्ही बांधायचे, विजेच्या केबल्स आम्हीच टाकायच्या. सरकार समुद्र मागे ढकलते. पण तो जाणार कुठे ? तो पुन्हा माहीम वर्सोव्याला वस्तीत घुसला की तिथे बंधारे बांधण्याचे श्राद्ध महापालिकेने करायचे. या करता सरकार पैसा देत नाही. तो खर्च महापालिकेच्या तिजोरीतूनच करावा लागणार.

'या योजनेमुळे महापालिकेला कोणती सेवा अधिक प्रमाणात उपलब्ध करून द्यावी लागेल ?'

'तो एक प्रचंड व्याप आहे. बॅक बे मुळे जवळ जवळ साडे पाचशे एकर जागा व्यापणार. यापैकी एक तृतियांश जागेत भराव टाकण्याचे काम आता पुरे झाले आहे. या साडे पाचशे एकरातल्या वस्तीला पाणी पुरवायचे तर १ कोटी २२ लाख १५ हजार रुपये लागतील. सध्या या विभागाला दहा लाख गॅलन पाणी द्यावे लागते आहे. सध्या असलेल्या 'ए' वॉर्डला दीड कोटी गॅलन पाणी लागते. बॅक बे पूर्ण झाल्यावर फक्त तिथल्या वस्ती करीता दोन कोटी तीस लाख गॅलन पाणी लागेल. ड्रेनेजसाठी २ कोटी रुपये खर्च येईल तर रस्त्याकरिता जवळ जवळ अडीच कोटी रुपयांचा भुर्दंड महापालिकेस सोसावा लागेल. सध्या कुलाब्यापासून माहिमपर्यंतच्या मुंबई शहराला अडीचशे मेगावॅट टन वीज पुरते पण ही योजना पुरी होईल तेव्हा त्या करिता साडे पाचशे मेगावॅट टनापेक्षाही जास्त वीज लागेल. हा सारा जादा ताण मुंबई महानगर पालिकेवर पडणार आहे. साहाजिकच त्याची झळ मुंबई शहरात गेली अनेक वर्षे राहाणाऱ्या सामान्य माणसालाही पोहोचेल.'

या योजनेमुळ निर्माण होणाऱ्या इतर प्रश्नाबद्दल बोलताना महापौर म्हणाले की, 'रिक्लेम' केलेल्या जागेत प्रचंड गगनचुंबी इमारती उभ्या राहातील. अशा दोन उंच इमारतींमध्ये पुरेशी जागा सोडणे आवश्यक असते. पण तशी मोकळी जागा सोडण्यात आलेली नाही. साहाजिकच प्रकाशाच्या व्यतिकरणाचा (लाइट व्हेंटिलेशन) प्रश्न नव्या योजनेत प्रकर्षाने सतावणार आहे. दुसरा प्रश्न वाहातुकीचा. आधीच दक्षिण मुंबईत हजारो कार्यालये केंद्रित झाल्याने वाहातुकीचा किचकट प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातून याच भागात ही नवी वस्ती तयार झाल्यावर या वाहातुकीच्या प्रश्नात भरच पडेल. या उंच इमारतींना वर आग लागली तर पाणी मारण्याकरिता जादा प्रेशर द्यावे लागेल. त्यामुळे आसपासच्या भागात पाणी वर चढू शकणार नाही.'

'आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे या नव्या वस्तीत नवे उद्योग सुरू होतील. सरकार त्यांना सहाय्य करणार. म्हणजेच मुंबईत परप्रांतातून येणाऱ्यांचा लोंढा अधिकच वाढणार. शिवाय सरकार ज्या हेतूने जुळी मुंबई उभारीत आहे, तो हेतूच यामुळे नष्ट होणार. कारण मुंबईतच जर नव्या उद्योगांना जागा आणि सवलती मिळत राहिल्या तर विकसनशील अवस्थेत असलेल्या नव्या मुंबईत उद्योगपती जातीलच कशाला ?'

'या योजनेपासून सरकारला काय फायदा मिळणार आहे ?'–मी.

'भराव टाकलेली जमीन भरमसाट भावाने विकून सरकार भरपूर पैसा कमावणार आहे. हा पैसा शहराच्या विकासाकरिता खर्च करायचा सरकारचा मनोदय दिसतो. पण या योजनेमुळे जर जनतेचा त्रासच वाढणार असेल तर तो पैसा घेण्यात काय मतलब ? शिवाय भराव टाकल्यानंतर पाणी,

वीज, रस्ते पुरवणे याकरिता महापालिकेला होणारा खर्च पाहता ही योजना तोटयातच जाणार असे दिसते.'

'मग सरकार याबद्दल काय करील ?'

जनमताचा मान राखून सरकार ही योजना तात्काळ मागे घेऊन 'बॅक बे रिक्लमेशनचे काम थांबवील अशी मला आशा वाटते.' ◻

# मुंबई विद्यापीठातल्या कर्मचाऱ्यांचे आंदोलन

मुंबई विद्यापीठाला हे वर्ष फारसे चांगले नाही. कॉलेज कर्मचाऱ्यांचा संप टळला. एका वांध्यातून सुटलो असे म्हणत कुलगुरु टोपे हुश्यऽऽ करून कोट काढीत असतील, तोच प्रत्यक्ष मुंबईविद्यापीठातले कर्मचारी 'नियमानुसार काम आंदोलन' सुरू करणार असल्याची बातमी आली आणि ते आंदोलन गेल्या बुधवारपासून सुरू सुद्धा झाले. अर्थात एकंदर आपल्या देशातल्या कर्मचाऱ्यांची उद्योगप्रियता पाहून 'नियमानुसार काम आंदोलन' त्यांना जरा जडच जायचे. कारण 'नियमानुसार काम' करायचे म्हणजे दहाचे ऑफिस असेल तर दहा-दहाची 'दादर फास्ट' पकडून चालणार नाही. शिवाय संध्याकाळी साडे पाच वाजेपर्यंत 'नियमानुसार काम' करायचे, तर सहाचा प्लाझाचा 'शो' चुकवावाच लागणार. एकूण भारतीयांना हे आंदोलन जरा त्रासदायकच.

पण मुंबई विद्यापीठातल्या कर्मचाऱ्यांनी ऐन परीक्षेच्या धामधुमीत 'नियमानुसार काम' सुरू केल्याने विद्यापीठाचे धाबे दणाणून गेले आहे. परीक्षेच्या काळात विद्यापीठाच्या परीक्षा विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना अगदी सकाळी कामावर यावे लागते आणि रात्री उशीरापर्यंत चाकरी करावी लागते. पण आता हे कर्मचारी सेवा तत्परतेने सकाळी साडेदहा वाजता येतात आणि तितक्याच कर्तव्य दक्षतेने साडेपाच वाजता विद्यापीठाच्या पायऱ्या उतरतात. विद्यापीठाचे एक मुद्रणालय आहे. तिथल्या कर्मचाऱ्यांची 'ड्यूटी' साडे नऊ वाजता सुरू होते. पण परीक्षेच्या दिवसात रोज प्रश्न-पत्रिकांची छपाई करायची असल्याने ही मंडळी पहाटे सहा वाजताच कामावर येत. पण आता आंदोलन पुकारल्याने तेही अगदी ९–३० ला कामावर हजर होतात.

या कर्मचाऱ्यांनी एकदम हे आंदोलन का सुरू केले ? उत्तर स्वाभाविक आहे. 'आपल्या मागण्याकरता !' या मागण्या कोणत्या ? अर्थातच नेहेमीच्याच. वेतनवाढ हवी, ही तर जगातल्या तमाम कर्मचारी आणि कामगारांची जन्मसिद्ध मागणी. अर्थातच ती मागणी इथेही आहेच. शिवाय इतर सटर फटर मागण्या, आपल्या नेहेमीच्याच.

बॉम्बे युनिव्हर्सिटी एम्प्लॉईज युनियन या संघटनेने ही आंदोलनाची हाक दिली. युनियनने गेल्या ऑगस्टमध्ये म्हणजे आठ महिन्यांपूर्वी विद्यापीठाकडे मागण्या सादर केल्या. पण तपासलेले पेपर ठेवून द्यावेत, तसेच विद्यापीठाचे रजिस्ट्रार टी. व्ही. चिदम्बरन् यांनी त्या ठेवून दिल्या. मग सिंडिकेटने या मागण्यांचा विचार करण्यासाठी आपल्या सरकारच्या धोरणाप्रमाणे एक उपसमिती नेमली. कोणतीही उपसमिती जे करील तेच याही उपसमितीने केले. युनियनबरोबरच्या वाटाघाटी फिसकटल्या आणि विद्यापीठातले बाराशे कर्मचारी नियमानुसार काम करू लागले.

या आंदोलनामुळे अनेक कटकटी वाढल्या. विद्यापीठाच्या मुद्रणालयात प्रश्न पत्रिका पुरेशा प्रमाणात छापून होईनात. मग काय ? बाहेरच्या प्रेसमध्ये प्रश्न पत्रिका छापायला पाठवल्या जात आहेत. आता पेपर फुटले तर ? नाही तरी विद्यापीठाच्या मुद्रणालयात कडेकोट बंदोबस्तात प्रश्नपत्रिका छापल्या जात, तेव्हासुद्धा त्यांना बाहेर पडायला पाय फुटतच होते की ! दुसरे म्हणजे केंद्रावर प्रश्न पत्रिका, उत्तर पत्रिका नेणे वगैरे सोपस्कार कॉलेजांच्या कर्मचाऱ्यांना करावे लागतात. इतके करूनही गेल्या तीन-चार दिवसातच प्रश्नपत्रिका वेळेवर न मिळाल्याची तक्रार दहा बारा केंद्रातल्या विद्यार्थ्यांनी तरी केली आहे.

विद्यार्थ्यांच्या परीक्षा नुकत्याच सुरू झाल्या आहेत. त्या संपायला अद्याप किमान दीड महिना बाकी आहे. त्या नंतर पेपर तपासणी, निकाल वगैरे सव्यापसव्य करण्यासाठी आणखी दीड महिना. या प्रचंड काळात एकदा जरी हे आंदोलन चिघळले तरी सगळीच बोंब होणार. 'मागण्या पदरात पाडून घेतल्याशिवाय आता माघार नाही.' असे कर्मचारी सरळ सरळ बोलू लागले आहेत.

एकंदर कर्मचाऱ्यांचा रागरंग पाहिला तर विद्यापीठाचे रजिस्ट्रार चिदंबरन यांच्याविरुद्ध बराच असंतोष निर्माण झालेला असल्याचे दिसते. 'आमच्या वाजवी मागण्या दाबून ठेवण्याचा चिदम्बरन् यांनी प्रयत्न केल्याने हा प्रसंग निर्माण झाला असे त्यांचे मत आहे. प्रत्येक सरकारी किंवा स्वायत्त संस्थेत एक एक प्रस्थ असते. चिदम्बरन् हे अशाचपैकी एक प्रस्थ. त्यांचे अनेक पराक्रम ऐकण्यासारखे आणि सांगण्यासारखे आहेत. पुन्हा कधी तरी जरूर वेळ येईल.

असो. पुन्हा एकदा तेच विद्यापीठीचे कर्मचारी 'नियमानुसार काम' करताहेत. अधिकारी वर्ग 'नियमानुसार ते सारे पहातो आहे. पण भरमसाठ फी देऊन शिकणाऱ्या कॉलेज विद्यार्थ्यांची मात्र मधल्यामध्ये मौत आहे. ◻ ◻

---

**पुढील अंकी**

**समुद्रात वसत असलेली आणखी एक नवी मुंबई**

**सु. ल. सोमण**

# सोलकढी

## □ दोन कवींची कुस्ती

आपण विशाल हृदयाचे आणि प्रागतिक दृष्टीचे आहो, असा टेंभा पुणे-मुंबईकर सारखा मिरवत असतात. खरे असे आहे की कोकण काय, मराठवाडा काय, विदर्भ काय, हे एखाद्या अज्ञात आणि दूरस्थ खंडातले भूभाग आहेत, अशी पुणे-मुंबईकरांची वृत्ती असते. त्या नामांकित प्रदेशात काय चालले आहे याची त्यांना गंधवार्ताही नसते. तशी ती असती तर नागपूर येथे नुकत्याच झालेल्या एका अटीतटीच्या कुस्तीची दखल त्यांना घ्यावी लागली असती. आता कुस्ती होऊन थोडे दिवस लोटले आहेत. आखाड्यातले हुहुकार शमले आहेत. लोकांनी मारलेल्या आरोळ्या विरल्या आहेत. विजयी पैलवान हातातला गजरा आणि पराजित पैलवान आपल्या जखमा कुरवाळतो आहे. कुस्तीतल्या डावपेचांची चिकित्सा करण्यात संबंधित मंडळी गढली आहेत. विदर्भ साहित्य संघाच्या ढंगाळ्या इमारतीत कबुतरांना पुन्हा थोडे निवांतपण मिळाले आहे.

आता ज्या विदर्भ साहित्य संघाचा उल्लेख केला ती महाराष्ट्र-उपराजधानी नागपूर येथली एक चालती गाजती संस्था आहे. साहित्यिकांच्या ताठुंग्या मस्तकांवर या संस्थेने गेली तीस वर्षे छप्पर उभे ठेवले आहे. डोईवर छप्पर मिळाले म्हणजे भुईवर लाथाळ्यांचा चक्रीकार्यक्रम अखंड चालू ठेवणे, हे जगातल्या सगळ्या नैष्ठिक साहित्यिकांचे ब्रीदच असते. मराठीतले सगळेच साहित्यिक नैष्ठिक असतात. त्यात प्रदेशपरत्वे नैष्ठिकतेला वेगवेगळे पाणी चढत असते. विदर्भ साहित्य संघ या बाबतीत कधीच मागे राहिला नाही हे मुद्दाम सांगितले पाहिजे असे नाही. विदर्भ साहित्य संघाची एतद्विषयक कीर्ती परवाच्या कुस्तीने नव्याने सिद्ध झाली आहे.

प्रादेशिक अस्मितेचे संगोपन करणाऱ्या प्रातिनिधिक साहित्यसंस्थेजवळ एक मुखपत्र असते. या मुखपत्रातून संस्थेने केलेले बहुविध आणि बहुमोल कार्य मांडून ठेवलेले असते. परिणामी ते रेल्वे-समयसारिणीइतके वाचनीय असते. विदर्भ साहित्य संघाचे 'युगवाणी' हे मुखपत्र परवापरवापर्यंत असेच होते. तीन वर्षांखाली असे घडले की माणिक गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस 'युगवाणी'चे संपादक झाले. त्यांच्या मनात काही भलतेच आले. साहित्य संघाच्या मुखपत्रातून, प्रामुख्याने, चांगले साहित्य प्रसिद्ध व्हावे, असे त्यांना वाटले. त्याचबरोबर मुखपत्र विदर्भ साहित्य संघाचे असले तरी सगळेच वैदर्भीय साहित्य चांगले मानून त्याला 'युगवाणीत' अग्रहक्क द्यायलाच हवा, असे त्यांना वाटले नाही. म्हणून विदर्भाबाहेरून चांगले साहित्य मिळवण्याचा प्रयत्न त्यांनी चिकाटीने केला. या चिकाटीला अनपेक्षित यश आले. 'युगवाणी'तून विविध प्रकारचे लक्षणीय साहित्य प्रसिद्ध होऊ लागले. प्रस्थापित आणि बंडखोर, जुने आणि नवे, मोठे आणि लहान, विचारवंत आणि भावनावंत, चांगले आणि वाईट, (प्रसंगी खरे आणि खोटेसुद्धा) महाराष्ट्रातले सगळेच साहित्यिक आवर्जून 'युगवाणी'साठी लिहू लागले. पाहता पाहता 'युगवाणी' लोकप्रिय झाले. नियतकालिकांच्या थारोळ्यात त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. 'युगवाणी'ची आस्थेने चर्चा-चौकशी होऊ लागली. नागपूरला जाणारा लहानमोठा वाचक-लेखक कवी ग्रेसना कळकळीने भेटू लागला. ग्रेसच्या गूढ व्यक्तिमत्त्वामुळे पुण्या-मुंबईकडचे वातड साहित्यिकसुद्धा हलून गेले. नागपूर म्हणजे ग्रेस आणि ग्रेस म्हणजे 'युगवाणी' ('संध्याकाळच्या कविता') अशी ठाकठीक समीकरणे साहित्यक्षेत्रात स्थिर होऊ लागली.


यामुळे साहाजिकच नागपूरच्या इतर साहित्य श्रेष्ठीवर अन्याय होऊ लागला. विशेषतः आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ कवी अनिल या थोर, वयोवृद्ध, रईस माणसाची फारच पंचाईत झाली. वस्तुतः अनिल हा चोवीस तास काव्य जगणारा माणूस. उच्च नैतिक मूल्ये दैनंदिन व्यवहारात आणू पाहणारा थोर कलावंत. मानवतेचा पुजारी. मानाचा-मोठेपणाचा हव्यास उभ्या आडव्या आयुष्यात त्यांनी कधी बाळगला नव्हता. म्हणूनच मान आणि मोठेपणा त्यांच्या पायाशी आयुष्यभर घोटाळत राहिले. त्यांची सवय झाल्यामुळे वानप्रस्थाश्रमातही ते जवळपास असावे असे त्यांना वाटत राहिले यात नवल नाही. पण त्यांनी म्हणजे मान व मोठेपणा यांनी तर ग्रेससारख्या तेरड्या एवढ्या उंचीच्या चिल्लर पोराच्या दारास तोरण बांधले होते. अनिळ झाले तरी त्यांनी किती म्हणून सहन करावे? तेव्हा अनिलांनी ग्रेसच्या दारावरचे ते तोरण उतरवायचे ठरवले.

आणि ठरवले तसे उतरवलेही (वा रे पठ्ठे) गेल्या महिन्यात झालेल्या विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत अनिल गटाने ग्रेसगटाला माती चारली. अध्यक्षपदासाठी तर अनिल आणि ग्रेस या दोन कवींचीच निकाली कुस्ती झाली, ग्रेस पडले; अनिल, या वयातही, विजयोन्मादाने उड्या मारत बसले. अशा उड्या मारत राहिले तर म्हातारपणात शरीर आणि मन ताजेतवाने राहते. पुन्हा या उड्यांनी कोठें उखणविखण भरण्याचा भीती नसते.

संपादक म्हणून ग्रेस बंद झाले तरी 'युगवाणी' चालूच राहणार आहे. त्याचे गोत्र कोणते असेल ते निश्चितपणे सांगणे अवघड आहे.

नागपूर येथे झालेल्या, महाराष्ट्रातल्या दोन टोपण नामवंत कवींच्या जाहीर कुस्तीमुळे काही हळव्या मंडळींना खंत वाटून राहिली आहे. मी मात्र या कुस्तीवर खुश आहे. निकालाचे सोडा, ही कुस्ती ज्या प्रतिष्ठेने खेळली गेली तिचे मोल मला विशेष वाटते. त्यातही कवी अनिलांनी जे कुस्तिकौशल्य दाखविले ते पाहून माझ्यासारख्या असली प्रेक्षकाला वाटले की कविताऐवजी आयुष्यभर वस्ताद अनिल कुस्त्याच मारीत राहिले असते तर केवढी मज्जा आली असती! काही कलावंतांना आपल्या अंगची खरी कला आणि आपले खरे कलाक्षेत्र वेळेवर सापडत नाही, हेच खरे.

—अनंतराव



# 'झोला म्हणजे मानवी सद्सद्विवेकाची जाग'

अनातोल फ्रान्स

**एमिल झोला व्यक्तिजीवनात भारी हळवा होता. पण सत्त्याची कास धरायचीच असा निर्धार करताक्षणी त्याच्या हृदयात जणू असीम ताकद आली. त्याने सबंध समाजाचे आव्हान स्वीकारले. शांत, खानदानी, अकादमीत प्रतिष्ठा पावलेला हा सत्त्याचा उपासक न्यायासाठी तीव्र लढा देण्यास सिद्ध झाला.**

# एमिल झोला

सौ. सुमती देवस्थळे

झोला–इटालियन शब्द–अर्थ–माती–मातीचे ढेकूळ. एमिल् झोला या फ्रेंच कादंबरीकाराने आपले उपनाव यथार्थ केले. खरोखरच तो ज्या देशात राहिला, त्या देशाच्या मातीशी पूर्णपणे समरस झाला. फ्रेंच भूमीशी सुसंगत असे लिखाण त्याने केले...अत्यंत वास्तव, परखड, स्पष्ट, जिवंत, प्रत्ययकारी ! फ्रेंच भूमीशी तो उत्कटपणे समरस झाला, आणि म्हणूनच केवळ फ्रान्सचाच नव्हे तर जागतिक कीर्तीचा कलावंत ठरला !

एमिलची आजी ग्रीक, वडील इटालियन व आई फ्रेंच. त्यामुळे ग्रीक, इटालियन व फ्रेंच अशा मिश्र रक्ताचा वारसा त्याला मिळाला होता. एमिल्चे वडील अत्यंत बुद्धिमान, कल्पक पण अस्थिर वृत्तीचे होते. प्रथम त्यांनी लष्करी पेशा स्वीकारला. मग कंटाळून जाऊन सरळ विद्यार्थीदशा स्वीकारली. पदुआ युनिव्हर्सिटीतून त्यांनी इंजीनिअरिंगचे शिक्षण घेतले. स्थापत्याविषयी त्यांना फार गोडी. डोक्यात नव्या नव्या कल्पना घोळत रहात. Aix ह्या ठिकाणी पाणीपुरवठा करण्यासाठी त्यांनी एक योजना तयार केली. ती सरकारातून पास करून घेण्यासाठी पॅरिसच्या वाऱ्या केल्या. तेथेच, स्वत:पेक्षा २५ वर्षांनी लहान असलेल्या फ्रेंच मुलीशी त्यांनी लग्न केले. एमिल्चा जन्म २ एप्रील १८४० या दिवशी झाला. दोन वर्षे झोला कुटुंब पॅरिसला रहात असे. कॅनॉल बांधण्याची योजना सरकारमान्य झाल्यावर ते ऐक्स (Aix) येथे परतले. कॅनॉलचे बांधकाम चालू असताना लहानगा एमिल् वडिलांबरोबर 'साइट'वर जात असे. वडील त्याला बरोबर वागवीत असत.

एकदा एमिल्च्या वडिलांना पॅरिसला जाण्याची वेळ आली. प्रवासात त्यांना भयंकर सर्दी व कफ झाला. प्रकृती इतकी बिघडली की वाटेतच मुक्काम करणे भाग पडले. रोग क्षणोक्षणी वाढत जाऊन फ्ल्यूरसी झाली. खानावळीत मुक्काम, अनोळखी वातावरण, फ्ल्यूरसीसारखा आजार – औषधयोजनेची हयगय – यापायी हा हुषार इंजीनिअर अकाली मरण पावला. वडील गेले तेव्हा एमिल अवघा ६ वर्षांचा होता. वडिलांच्या मृत्यूनंतर सर्वत्र अवकळा आली. घरात अव्यवस्था येणे स्वाभाविकच होते, पण बाहेरही वातावरण धामधुमीचे होते. घरात उदासीनता अन् बाहेर राजकीय उद्रेक ! सातवे वर्ष लागले तरी अद्याप एमिल्ला अक्षरओळखही झाली नव्हती. हा ७–८ वर्षांचा मुलगा म्हणजे आईचा एकमेव आशादीप. त्याला नीट शिकवावे, वाढवावे असे वाटणे स्वाभाविकच होते. तिने एमिल्ला थोडेफार घरी शिकविले, अन् मग कॉलेज ऑफ बर्बोनमध्ये त्याचे नाव घालून टाकले. म्हणायचे कॉलेज, पण होती ती शाळाच. तिथ एमिल्चा अभ्यास उत्तम रीतीने चालू झाला. पण त्यात काही फारसे नवल नव्हते. कारण वर्गातल्या इतर मुलांपेक्षा तो दोन वर्षांनी मोठा होता. त्याला लॅटिनमधील प्राविण्याबद्दल बक्षीस मिळाले. सिझनी, बेल (Cezanne, Baille) हे दोन जिवलग मित्र मिळाले. ही तीन पोरे म्हणजे अतूट त्रयी समजली जाऊ लागली. तिघेजण हुषार, संवेदनाशील, गोष्टीवेल्हाळ, कथाकवितांचे नादी अन् एकंदर छंदीफंदी ! वय वाढत होते. तिघे मित्र छोट्या-मोठ्या सहली काढणे,

पोहोणे, शिकार, कवितावाचन, पेंटिंग, वनविहार, गरमागरम चर्चा या संस्कारात वाढत होती. 'रोमँटिसिझम्' त्या काळातल्या वातावरणात भरून राहिलेला होता. रूसोच्या विचारसंचितावर आपापल्या प्रतिक्रिया नोंदविणे हा फार मोठा बौद्धिक आनंद होता. त्याच्या जोडीला व्हिक्टर ह्यूगोचे साहित्य – म्यूसे (musse) लॅमर्टिन्, जॉर्ज सॅण्ड – यांचे साहित्य मनसोक्त वाचले जात होते. उमलत्या संवेदनाशील मुलांची मने संस्कारित होत होती. असल्या बौद्धिक आणि भावनात्मक आनंदात दंग होणे झोला कुटुंबाला परवडण्यासारखे नव्हते. वडील गेल्यामुळे आईला कंबर बांधून मिळतील ती कामे करावी लागत होती. एकदा कोर्टाच्या कामानिमित्त तिला पॅरिसला जावे लागले. तेथे काम करून थोडे अधिक पैसे मिळण्याचा रंग दिसताच तिने एमिललाही तिकडेच बोलावून घेतले. गाडीभाड्यासाठी घरातली सारी चीजवस्तू विकून, मित्रांना सोडून एमिल् पॅरिसला आला.

## कामाचा शोध

पॅरिस्मध्ये आल्यावर मुलाने तावडतोब नोकरीला लागावे अशी काही आईची इच्छा नव्हती. शक्य तितके शिक्षण पदरात पाडून घ्यावे, सुप्रतिष्ठित व्हावे अशीच त्या माऊलीची इच्छा. म्हणून तिने ओळखीच्या माणसांकडे जाऊन खटपट केली. अखेर वडिलांच्या मित्राच्या शब्दाला मान मिळाला आणि एमिलला कॉलेजातील शास्त्राच्या शाखेत प्रवेश मिळाला. शिष्यवृत्तीही मंजूर झाली. आता सारी गाडी रुळाला लागली असे मानून आईने निश्वास टाकला.

वस्तुस्थिती आईला वाटली तितकी सरळ नव्हती. शाळकरी वयापासूनच एमिल कविता लिहू लागला होता. दोन-तीन नाटकेसुद्धा लिहिली होती. त्या लिखाणाचे साहित्यिक मूल्य कदाचित नगण्य असेल, पण त्याला पंख लाभले होते हे मात्र निश्चित! वाचनाचे वेड जबरदस्त होते. वर्गात केमिस्ट्रीचा तास असला तरी हा डेस्क खाली पुस्तक ठेवून जॉर्जसॅण्डच्या कादंबऱ्या वाचीत बसे, आपल्या मित्रांना खूप मोठमोठी पत्रे लिहीत असे. त्याचा जीव सायन्समध्ये मुळीच रमत नव्हता. करणार काय? वर्गातील मुलांपेक्षा तो वयाने मोठा होता. त्याला येथे मित्र नव्हते. खेड्यातून आलेला...व्यक्तिमत्त्वावर गावरान छाप! भाषेतले हेल उमटून वेगळे दिसणारे... त्यामुळे पॅरिसमधल्या चटपटीत वातावरणात त्याला सहजी मिसळून जाता येईना. तो हळू हळू एकांडा-कुढा बनू लागला. तशात टॉयफॉईड् – दोन महिने अंथरूण सुटले नाही...शिक्षणात लक्ष लागेना. मध्येच एकदा बॅरिस्टर होण्याची हुक्की आली. तिकडे प्रवेश मिळविण्याची धडपड...तोंडी परीक्षेची हद्द ओलांडता आली नाही. इतिहासात हास्यास्पद चूक अन् साहित्यविषयक प्रश्नात तर चक्क भोपळा! परीक्षा पद्धतीची नालायकी सिद्ध करायला आणखी कोणते प्रमाण हवे? पुनश्च प्रयत्न केला – तोही अयशस्वी! मग मात्र एमिलने शिक्षणाचा नादच सोडला. भविष्य फार धूसर होते. तो कमालीचा आगतिक बनला होता. बाहेरून त्याचे वागणे अडेलतट्टासारखे दिसे, मख्खपणाचे वाटे, पण आतून मात्र तो अस्वस्थ होता, गोंधळला होता, चाचपडत होता. मित्रांशी त्याचा खूप पत्रव्यवहार चालत असे. नव्याने वाचलेल्या पुस्तकांची चर्चा, कवितांची चर्चा हे सारे त्या पत्रात सहजी येत असे. पण स्वतःविषयीचे धूसर भविष्य त्याला भेडसावीत राही. किती अधुरा संदेह! त्या संदर्भात त्याने मित्राला लिहिले,

'मला सर्वच गोष्टींचा संदेह वाटतो.. त्यातल्या त्यात माझ्या स्वतःविषयी सर्वांत जास्त! कित्येक वेळा मला असे वाटते की, माझ्या ठिकाणी बुद्धीचा लवलेशही नाही. मग मी स्वतःच्या मनाला प्रश्न करतो, कशाच्या जोरावर तू भव्य स्वप्ने पहातो आहेस रे बाबा? माझे शिक्षण पुरे झालेले नाही, मला फ्रेंच भाषा उत्तम तऱ्हेने बोलतासुद्धा येत नाही. सगळ्याच बाबतीत मी अडाणी आहे! कारकुनी करीत कुजून मरणे एवढेच फक्त माझ्या नशिबी आलेले दिसते.' एका डॉकमध्ये खरोखरच कारकुनी मिळाली. ६० फ्रॅन्क्स पगार. दोन महिन्याच्या वर तेथे काम करणे शक्य नव्हते. एमिलला ते कंटाळवाणे जीवन आवडेना. मित्रांना तो सारखा पॅरिसला बोलावीत होता. पैकी सिझॅनी पॅरिसला आला. तो उत्तम चित्रकार होता. दोघे एका बिल्डिंगच्या गॅरेजरूममध्ये रहात होते. दोघे कलावंत. दोघे संवेदनाशील. अशी माणसे एकत्र राहू शकत नाहीत. सिझॅनीने उत्साहाच्या भरात झोलाचे तैलचित्र काढण्यास सुरुवात केली. विशिष्ट तंत्राने ते चित्र काढायचे होते. झोलाचा तात्त्विक मतभेद आला. 'तू तंत्राचे फारच स्तोम माजवितो आहेस बुवा. त्यापेक्षा चेहऱ्यावरचे भाव जास्त महत्त्वाचे आहेत!'

'गेला उडत तो चेहऱ्यावरचा भाव!'

सिझॅनीने झोलाचे पोर्ट्रेट फाडून टाकले अन् तो गावी निघून गेला. झोला एकटा–उदास–अवघडलेला–आत्मसंकोची असा बनत गेला. पॅरिसमधील स्वतःच्या उपरेपणाची त्याला नको इतकी जाणीव! एकप्रकारचा न्यूनगंडसुद्धा! आपण परित्यक्त आहोत, उपेक्षित आहोत ही जाणीव त्याला सलत असे. दारिद्र्य, उपासमार, बदनाम वस्तीतील वास्तव्य, सारा निर्दय, रुक्ष व्यवहार, हाणामारी.. हे भोवतालचे दृश्य. झोलाच्या मनात उदासी साकळून राही. आयुष्य फुकट चालले होते. नुसता धूर धूर...! याच सुमारास स्त्रीसुखाचा अनुभव आला. पण तो त्याला मुळीच आनंददायक वाटला नाही. आपण आपल्या तारुण्याची फसवणूक करतो आहोत ही बोच होती. आईच्या कष्टाच्या पैशावर जगायला संकोच वाटत होता. कामाचा शोध...एका डॉक्टरने त्याला नव्या वर्षाची भेटकार्डे आपल्या पेशंट्सकडे पोहोचवून येण्याचे काम दिले. भेटकार्डे वाटण्याचे काम ७–८ दिवसात संपून गेले! पुढे काय? एमिल काव्यरचना करीत होता, पण पिपासितैः काव्यरसं न पीयते। हा अनुभव येतच होता.

## प्रकाशनक्षेत्रात पदार्पण

Hachette & Co. नावाच्या प्रकाशनसंस्थेत झोलाला काम मिळाले. पॅकिंग करण्याचे काम. महिनाभर झोला पुस्तकांची पार्सले बांधण्याचे काम करीत होता. त्याच्या अंगचा चटपटीतपणा व एकंदर हुपारी पाहून त्याची जाहिरातखात्यात बदली करण्यात आली. या खात्यात त्याला समृद्ध अनुभव घेण्याची संधी मिळाली. बरेचसे साहित्यिक (लांबून) दिसले. एकंदर लेखनाचा 'व्यवसाय', धंदा कसा चालतो, कोणकोणत्या गोष्टींची चलती असते, साहित्यिकांचे 'यश' नेमक्या कोणकोणत्या गोष्टींवर अवलंबून असते, प्रकाशक लेखकाला कसा चढवतो, कसा पाडतो, साहित्याच्या क्षेत्रात नाव मिळविण्यास मामुली बुद्धीसुद्धा का पुरेशी ठरते, प्रकाशकाची किमया

कोणती, त्या किमयेमुळे बेतासबात असे लेखकसुद्धा कसे झगमगत रहातात, या व्यवसायातील प्रतिपक्षाला जमीनदोस्त करण्याचे मार्ग कोणते, इ. अनेक व्यावसायिक क्लृप्त्या त्याच्या लक्षात आल्या. वर्तमानपत्राच्या शक्तीचा साक्षात्कार झाला. मामुली संपादकसुद्धा वर्तमानपत्राच्या अमोघ शक्तीने सांस्कृतिक जीवनावर कसे अधिराज्य चालवीत असतो याचा प्रत्यय आला, समाजाच्या अभिरुचीला कोण कसे वळण लावीत असते त्याची नस समजली. परिणामतः काव्याचा हळवा प्रांत सोडून गद्याच्या समरांगणात यावेसे वाटू लागले.मनातली Murset ची प्रतिमा लोपून ऑनर डी बाल्झॅकची मूर्ती तेथे विराजमान झाली.

## पूर्णवेळ साहित्यनिर्मिती

१००-१२५ वर्षापूर्वीचा फ्रान्स. त्या काळात औद्योगिक क्रांतीचे फलित स्पष्ट होत होते. शास्त्रे समृद्ध होण्याच्या मार्गावर होती. डार्विनचा उत्क्रांतीवाद, लाप्लेसचा नेब्यूलर हायपॉथिसिस् या प्रणाली माणसाच्या तर्कशक्तीला आवाहन करीत होत्या. सर्वच क्षेत्रात मूलभूत संशोधन करण्याकडे, शास्त्रीय दृष्टिकोनातून निष्कर्ष काढण्याकडे कल होता. मानवी जीवनातले अन्तस्त्रोत शोधून काढायचे, स्पष्ट मांडून दाखवायचे, अलिप्तपणे साक्षित्वाने चर्चा करायची या गोष्टींचे त्यावेळी फार नाविन्य होते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सजग प्रयोगशीलता होती. रोमँटिसिझमची कात गळून पडली होती. अभिरुचीच्या बाबतीत निश्चित वळण लागलेले नव्हते. बरीच धूसरता होती. निरनिराळ्या प्रणाली ( Schools ) आपापली मिरासदारी टिकवण्याचा प्रयत्न करीत होत्या. झोला चित्रकलेवरील आस्वादक टीकालेख लिहू लागला. ला फिगरोतून त्याच्या लेखांना प्रसिद्धी मिळाली. दिवसा ऑफीस आणि रात्री लिखाण...थोडासा आत्मविश्वास आल्यावर कथालेखन... 'साभार परत 'चा कटु अनुभव. झोला फार खट्टू झाला. मग त्याने आपण लिहिलेल्या कवितांचे बाड संपादकाच्या टेबलावर हळूच ठेवून दिले आणि प्रतिक्रियेची वाट पहात बसला.

अभिप्राय आला... 'तुमच्या कविता काही तितक्याशा वाईट नाहीत, पण तुम्ही आपले गद्यच लिहीत चला!' लगेच झोलाने Comedy of Love ही कथा संपादकाच्या टेबलावर ठेवली— परिणाम चांगला झाला. संपादकाने त्याची नस ओळखली आणि मुलांच्या मासिकासाठी कथालेखन करण्यास सांगितले. मुलांसाठी लिहिताना तो इतरांसाठीही कथा लिहीतच होता. पेटिट् जर्नलमधून त्याचे लिखाण प्रसिद्ध होत होते. लवकरच Stories for Ninon हा कथासंग्रह तयार झाला. हे झोलाचे पहिले पुस्तक अवघ्या २४ व्या वर्षी प्रसिद्ध झाले. गद्य लेखनात त्याच्यापुढे बाल्झॅक व फ्लॉबर्ट हे दोन आदर्श होते. बाल्झॅकच्या 'ह्यूमन कॉमेडी 'मधील विशाल मानवी चित्रण आणि मादाम बोव्हारीमधला वास्तववाद—दोन्हीही झोलाला मार्गदर्शक वाटत होते. मॉण्टेन, शेक्सपिअर यांच्या अभ्यासाचे संचित जमा झालेले होते. सिझॅनी या चित्रकार मित्राच्या सान्निध्यात चित्रकलेचा आत्मा गवसला होता. पिझॅरो या थोर चित्रकाराशी ओळख झाली होती. त्याच्या Impressionist कलाकृती झोलाला फारशा आवडल्या नाहीत, पण माणूस म्हणून तो चित्रकार फारच आवडला. साहित्यक्षेत्रात झोकून घ्यायला एवढे संचित पुरेसे होते.

या काळात झोला एका लहानशा बिऱ्हाडात खोली घेऊन राहत होता. घरातली गृहिणी निवर्तलेली. मोठी मुलगी फुले विकून पैसे कमावीत असे. तिचा प्रेमभंग झाल्याने ती उदास, दुःखीकष्टी असे. त्या अलेक्झॅन्ड्रिन मेस्लीची समजूत घालता घालता झोला स्वतःच तिच्या प्रेमात पडला. झोलाची प्रेमभावना इतकी उत्कट होती की त्यापायी त्याची झोप उडाली. या संदर्भात लिहिलेली Story of a Servant girl ही कथा पाहावी. अत्यंत वास्तव, परखड असे दलित जीवनाचे चित्र त्यात आलेले आहे. भाषेची आतषबाजी मुळीच न करता अश्राप, गरीब मुलीची जीवनकहाणी त्यात दिलेली आहे. झोलाच्या पहिल्या कथासंग्रहाच्या १५०० प्रती तीन महिन्यात खपल्या. साहित्याच्या क्षेत्रात आपण नाव कमावू शकू असा आत्मविश्वास आला. फिगारोमधील लेखांबद्दल त्याला २०० रु. महिना मिळतच होते. त्याच्या कथांना जी प्रसिद्धी मिळत होती, त्यामुळे त्याला जीवनाचा नेमका सूर सापडला. मग १८६६ मध्ये त्याने आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन टाकला आणि साहित्यनिर्मिती हेच आपले जिवितकार्य मानून लिहायला सुरुवात केली. अशा रीतीने ठराविक पैसे मिळविण्याचे साधन सोडू नये असा सल्ला पुष्कळांनी दिला. ध्रुवाणि तस्य नश्यन्ति अध्रुवं नष्टमेवच। अशा स्थितीचा धाक घातला...! पण झोलाला त्याच्या प्रतिभेने जबरदस्त आश्वासन दिले होते. गेली तीन वर्षे वर्तमानपत्रात काम केल्यामुळे उद्योगाची सवय झाली होती...कष्टाची तमा नव्हती... जनतेची आवडनिवड समजली होती. आधुनिकता,अत्याधुनिकता नेमकी कशात आहे ते समजत होते. तेव्हा नोकरी सोडल्याचा त्याला मुळीच पश्चात्ताप झाला नाही.

## कलामंडळ

फिगारोतल्या लेखांवर वाचक खूष होते. नाटयक्षेत्रात पडद्यामागे चालणाऱ्या भानगडी (Gossips) तो खुसखुशीत शब्दात लिहीत होता. दुसऱ्या एका संपादकांनीही त्याला आपल्या साप्ताहिकातून लेख लिहायची विनंती केली. झोलाच्या लेखात ताजेपणा होता. निकोप अभिरुची होती...संपादक महाशय नेहेमीच्या लेखकांना म्हणायचे, 'पहा बरे, हा पठ्ठ्या तुम्हा सर्वांना खाऊन टाकणार!'

कलेचा सहजपणे आस्वाद घेण्याची क्षमता ही फ्रेंच माणसाच्या प्रतिष्ठेची खूण समजली जाते. त्या दृष्टीने एखादे कलामंडळ (Art Circle) स्थापन करावे असा झोलाचा विचार होता. निरनिराळ्या माध्यमातून कलाभिव्यक्ती साधणाऱ्यांनी एकत्र यावे, विचारविनिमय करावा हे हेतू. त्यानुसार कलामंडळ जमतही गेले. सिझेनी, मॅने, पिझारो हे चित्रकार एकत्र आले. Impressionist व वास्तववादी कलाकारांची चर्चा होई. गरमागरम वादविवाद होत. झोलाचा Naturalism भरीला होता. पण त्यावेळी त्या कल्पना फार अंधुक होत्या. त्यांना विशिष्ट प्रणालीचे स्वरूप आले नव्हते. झोलाने मॅनेच्या कलाकृतीला उचलून धरले...लोकांच्या मनात उत्सुकता जागी केली. विरुद्ध पक्षीयांनी झोलावर टीकेची इतकी झोड उठवली की बस! मूर्ख, बदमाश, चोंबडा, वेडा...येथवर आहेर आले. झोलाचे आसन डळमळले...पुढचे काही लेख त्याने टोपण नावानेच प्रसिद्ध केले! उगीच खटखट नको!

१८६४ मध्ये डार्विनचे मानववंशशास्त्रीय लिखाण फ्रेंचमध्ये

प्रसिद्ध झाले. मानवी भावभावनांकडे वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पहाण्याची नवी दृष्टी आली. माणसाचे आत्मिक जीवन (Spiritual life) जितके खरे, तितकेच त्याचे शारीरिक जीवन, शारीरिक अस्तित्व हे अधिक महत्त्वाचे आहे, हा विचार सर्वसामान्य झाला. जीवनाकडे पहाण्याचा दृष्टिकोन अधिक वास्तव होत गेला. माणसाचे आत्मिक आणि वासनामय जीवन यांच्याकडे अंतर्भेदी दृष्टीने पहाण्याची शास्त्रशुद्ध जाग आली. आणि त्याचे झोलापुरते फलित म्हणजे त्याने केवळ २६–२७व्या वर्षी 'टेरेसा रॅन्किन्स ही विलक्षण परिणामकारक कादंबरी लिहिली त्यातली घटना संपूर्ण प्रत्ययकारी, वस्तुनिष्ठ अशी होती. विशिष्ट गृहीतकृत्ये मिळाल्यावर प्रमेयात जशा पुढच्या पायऱ्या आपोआप, एकातून एक अशा येत जातात, तशा जीवनातील घटना दाखविल्या होत्या. 'दोन प्रेतांवर डॉक्टर जे काम करतात तेच मी दोन जिवंत व्यक्तींवर केलेले आहे.' ही झोलाची भूमिका. अगदी शास्त्रीय पृथक्करण ! सद्‌गुण आणि दुर्गुण किंवा कोणतेही मानवी गुणविशेष हे रासायनिक पदार्थ आहेत. विशिष्ट संदर्भात त्यांच्या प्रतिक्रिया कसकशा होत जातील हे सहज पहाता येईल, असे तो म्हणत असे.

वस्तुनिष्ठा आणि पराकाष्ठेची उत्कटता हा टेरेसा रॅन्किस' या कादंबरीचा प्रमुख गुण.' कादंबरी हप्त्याने प्रसिद्ध होत होती. खुद्द राणी हॉर्टेन्स ही कादंबरी वाचीत असे, हे कळल्यावर संपादकमहाराज जरा जास्त जागरूक झाले. अखेर भीषण शोकांत आहे!... संपादकाला वाटले एवढे भीषण वास्तव राणीला कसे काय वाटेल ? त्याला थोडेसे तात्पर्य जोडू या! असले तात्पर्याचे ठिगळ लागलेले पहाताच झोला अत्यंत संतापला. त्याने संपादकास लिहिले, हे पहा महाशय, 'माझे शब्द गाळले तरी चालेल, पण आपले शब्द माझ्या नावावर खपवू नका हो!'

## पहिली कादंबरी

१८६५ मध्ये झोलाची ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. तडाखेबंद खप ! लगेच दुसरी आवृत्ती काढावी लागली. सेंबव्ह सकट सर्व श्रेष्ठ टीकाकारांनी या कादंबरीची दखल घेतली. विशिष्ट परिस्थितीत मानवी भावभावनांची, वासनांची सरळ सरळ अभिव्यक्ती कशी होत जाईल याचे त्यात लख्ख चित्रण होते. सत्याचा एवढा निःसंदिग्ध आविष्कार पाहून वाचक क्षणभर अवाक होतो खराच ! त्याच Vain मध्ये झोलाने Madeleine Ferat ही दुसरी कादंबरी लिहिली. माणसाला मेंदू असतो तद्वत शरीरही असते. शरीरवासना अत्यंत तीव्र असून तिचा माणसाच्या मेंदूवर, वागण्यावर विलक्षण प्रभाव असतो. मानवी शरिरातल्या बव्हंशी प्रक्रिया आनुवंशिक संस्कारांवर अवलंबून असतात. विशिष्ट आनुवंशिक संस्कारातला माणूस कसा वागणार हे समजण्यासारखे आहे. हे झोलाच्या अभ्यासाचे फलित. हा निष्कर्ष एखाद्या गणिती सिद्धांतासारखा झोलाला पटला. कारण डॉ. ल्यूकस यांचे Natural Heredity वरील विवेचन झोलाने अभ्यासिले होते. त्याचप्रमाणे न्यूरॉलॉजीचाही त्याने पद्धतशीर अभ्यास केला. त्यामुळे कल्पनारम्यतेच्या धूसर वातावरणातून बाजूला होऊन परखड वास्तवतेवर घट्ट पाय रोवून उभे रहाण्याचे धाडस त्याला सहजी करता आले. सामान्यांच्या वास्तवजीवनाचे चित्रण करणाऱ्या एका कुटुंबाच्या काही पिढ्यांवर आधारलेला एक विस्तीर्ण कथापट त्याच्या नजरेसमोर उलगडत गेला. त्यातूनच 'रॅगॉन मॅगार्ट' कादंबरीमालिका सुरू झाली. झोला आता साहित्यक्षेत्रात व्यवस्थित स्थिरावला.

जीवनातही स्थैर्य हवे होते. ३१ मे १८७० मध्ये त्याने अॅलेक्झॅण्ड्रिन् मेस्लीशी विवाह केला. विवाह अगदी साधेपणाने पार पडला. रहायला घेतलेले नवे घर फारच लहान होते. इतके लहान, की भोजनगृहात पियानो नेताच येईना–भिंत फोडावी लागली !

## कादंबरी मालिका

झोलाच्या मनःचक्षूसमोर कादंबरी मालिकेचा भव्य प्रकल्प उभा होता. आत्मविश्वासाचे भक्कम लेणे लाभलेले होते. फ्लॉबर्टसारख्या अनुभवी लेखकाकडून भरपूर प्रोत्साहन मिळाले होते. जसजसे त्याचे लिखाण प्रसिद्ध होऊ लागले, तसतसा त्याला समाजात सन्मान मिळू लागला. वर्तमानपत्राशी संबंध असल्याने सर्व स्तरात त्याला मान्यता मिळाली. त्या काळातही वर्तमानपत्रवाल्यांना अतिशय मान होता. राजेलोक अपरंपार पैसे देऊन संपादकांना गुप्तपणे विकत घेत. आणि स्वतःविरोधी बातमी छापून येणार नाही अशी व्यवस्था करीत.

लग्न झाले त्याच वर्षी–१८७० मध्ये फ्रान्स व रशियात बेबनाव झाला. युद्धाचा झंझावात. झोलाला युद्ध या घटनेचा विलक्षण तिटकारा होता. 'एका राष्ट्रातले पुष्कळसे वेडपट लोक दुसऱ्या राष्ट्रातल्या तितक्याच वेडपट लोकांना ठार करतात.' एवढाच त्याच्या लेखी युद्धाचा अर्थ होता. झोला आईचा एकुलता एक मुलगा असल्याने त्याच्यावर लष्कर भरतीची सक्ती झाली नाही. तथापि पत्नीच्या आजारपणाच्या निमित्ताने तो दक्षिण फ्रान्समध्ये निघून गेला. तेथेही युद्धाचा ताण होताच. आता साहित्य वगैरे सर्व संपले, युद्धाने आपल्या हातातले पेन उडवून लावले असाच त्याचा समज झाला. तशात त्याला पकडण्यात येणार असल्याची वदंता येताच प्रशियन वेश करून तो निसटला. लपतछपत जीव धरून राहिला. भोवतालच्या जगाचे डोळसपणे निरीक्षण करणारी त्याची नजर मात्र तक्षकासारखी जागी होती. युद्धबंदी होताच त्याने Lecuree ही कादंबरी लिहिण्यास सुरुवात केली. आणि मग एका मागून एक अशी कादंबऱ्यांची अतूट मालिकाच लिहिली गेली. त्याचा प्रकाशक होता (Charpentier) चार्पेण्टर. धंद्यात मोठा निष्णात होता तो. त्याने झोलाशी करार केला. प्रतिवर्षी २ कादंबऱ्या झोलाने लिहून द्यायच्या. त्याबद्दल पगार ५०० फ्रॅन्क्स्. झोलाच्या पुस्तकावर प्रकाशकाने अपरंपार पैसे कमावले. अनेक आवृत्त्या निघत, हजारोंनी खप होई. लेखकाला मात्र ठराविक पगार ! बस !... पण प्रकाशकाला सदसद्विवेकबुद्धी होती. आपण झोलाच्या जिवावर इतकी संपत्ती कमावतो, पण त्याला मात्र त्याचा थांगपत्ता लागू देत नाही, ही गोष्ट त्याला बेचैन करू लागली. एकदा झोला त्याच्याकडे जाऊन कादंबरी वेळेवर देऊ शकत नसल्याचे सांगत होता... चार्पेण्टरने झोलाला सर्व वस्तुस्थिती सांगितली, १०,००० फ्रॅन्क्सचा चेक दिला आणि इतःपर रॉयल्टीचा दरही वाढवून दिला. झोला आणि प्रकाशक यांचे संबंध दाट मैत्रीचे झाले, परस्परपूरक झाले.

झोलाला बागकामाची फार हौस. स्वतः जातीने झाडे लावायची, त्यांची निगा राखायची. त्याचप्रमाणे कुत्री, मांजरी, ससे, गिनिपिग्स्

इत्यादी प्राणी पाळायचे, त्यांचे बारीक निरीक्षण करायचे हा त्याचा आवडता छंद होता. त्यामुळे स्वतःच्या घरात तो खूप रमत असे. लेखकांच्या बैठकीसाठी आठवड्याने बाहेर जाईल तेवढाच. पुढे पुढे तर लेखकांच्या बैठकीही घरातच होऊ लागल्या. त्याला अनुलक्षून झोला म्हणे, 'घराच्या फाटकाशीच माझे विश्व संपते !' तथापि नव्या कादंबरीच्या पार्श्वभूमीसाठी–किंवा नवे नवे अनुभव मिळविण्यासाठी त्याला बाहेर जावेच लागे. असाच एकदा तो पॅरिसच्या मार्केटातून हिंडत होता. भाजीवाले, फळवाले. कोंबड्यावाले, कोळी, खाटिक... या सर्वांचे मिळून एक वेगळे अनुभवविश्व होते. त्यांची खास गुंतागुंत होती. माणसामाणसातले हेवेदावे, प्रेम, राग, लोभ–सारे काही होते. झोलाच्या मनात विचार आला, हा भाजीबाजार म्हणजे सबंध पॅरीस शहराचे पोट. या पोटात काय उलघाल चालली आहे पहा !... एका कोळणीला त्याने प्रश्न केला, 'काहो बाई, तुमच्या जवळची कुजकीनासकी मासळी तुम्ही कुठे टाकता ?'

'कां रं बाबा ? तुला काय करायचंय ? '

## विवरात !

झोलाने नम्रपणे जिज्ञासा व्यक्त केली. तेव्हा कोळणीने भुईलगतचे एक फळकूट उचलून दाखविले. खाली खोल विवर ! त्यात काय नरक भरलेला होता ! ते सारे परस्पर वाहून जाण्याचीही सोय होती. वरून कोणालाही त्या भीषण विवराची कल्पना येणे शक्य नव्हते. कोणताही नकोसा झालेला माणूस आत फेकून द्यायचा ! किती सोपी गोष्ट ! झोलाने हा तपशील आपल्या डायरीत टिपून घेतला. खाटकांची दुकाने, कोंबड्यांची दुकाने, दुकानदारांचा जीवनाकडे पाहाण्याचा विशिष्ट दृष्टिकोन–एकंदर बेदरकार वृत्ती... भुकेकंगाल आणि ढेरपोटे यांचा अविरत झगडा. आहेरे विरुद्ध नाहीरे ! त्यांची ती स्पर्धा होती. हे सारे त्या Belly of paris मधून वाचायला सांपडते. लोकांना ती साहित्यकृती अतिशय आवडली. अत्यंत निर्भयपणे झोलाने अनेक घटनांचे नेमके अर्थ टिपलेले आहेत, साध्यासुध्या घटनांचा आरपार वेध घेतला आहे हे वाचकांना जाणवले. म्हणूनच Belly of paris ला शहरी जीवनावरील महाकाव्य (Iliad of Modern City Life) असे सन्मानदर्शक विशेषण मिळाले. त्यात 'Battle of fat & thin' हा अनादि विषय आहे असाही सुजाण टीकाकारांनी अर्थ लावला. Belly of paris या कादंबरीने समाजाच्या अगदी खालच्या तळाचा वेध घेतला.

आता झोला साहित्यात इतका तन्मय झाला होता की त्याला आपले व्यक्तीगत जीवन वेगळे असे उरलेच नाही. माझ्या लिखाणाने माझी आई, पत्नी, इतर अनेक आवडत्या गोष्टी हळूहळू काबीज केल्या आहेत असे तो म्हणत असे. झोलाचा नाटयलेखनाचा प्रयत्न बाल्झॅकप्रमाणेच यशस्वी झाला नाही. तरीही त्याच्या नावावर भरपूर ग्रंथसंपत्ती झाली. प्रतिष्ठित लेखक त्याला बरोबरीने वागवीत. फ्लॉबर्टच्या घरी आवर्जून आमंत्रण. टर्जिनिव्हची तेथेच ओळख झाली. टर्जिनिव्हच्या शब्दावरून त्याला रशियन वर्तमानपत्रात साहित्यवार्ता लिहिण्याचे काम मिळाले. भरपूर अर्थप्राप्ती झाली. प्रतिभावंत साहित्यिक म्हणून त्याची किर्ती कितीही वाढली तरी आत कुठेतरी तडफड होतच राहिली. त्याच्यामागे पदवीचे शेपूट नव्हते, स्वभाव हांजीखोर नव्हता. एक वैशिष्टयपूर्ण आत्मरती होती– बेफिकिरी होती...मानसन्मानाविषयी तो म्हणे, 'काही झाले तरी मला अकादमीत नाही प्रवेश मिळायचा ! मला कोठलेही मानसन्मान लाभायचे नाहीत. मी सदोदित उपेक्षितच राहाणार ! बहिष्कृत... हो, बहिष्कृतच रहाणार मी !' पराकाष्ठेचा स्वाभिमानी व आत्मकेन्द्री होता तो. पूर्ववयात आपण किती उपेक्षित होतो हे त्याला कधीही विसरता आले नाही. अपरंपार पैसे मिळाले तरीही सामाजिक उपेक्षा त्याला विसरणे जमले नाही.

१८७७ मध्ये झोलाने La Assommoir ही प्रसिद्ध कादंबरी लिहिली. कित्येक विचक्षण टीकाकार या कादंबरीला झोलाचा 'मास्टरपीस' समजतात. मानवी मनातील मानसशास्त्रीय गुंतागुंत त्यात प्रभावी शब्दात वर्णन केलेली आहे. ही कादंबरी प्रथम हप्त्याने प्रसिद्ध होत होती. नंतर पुस्तकाच्या स्वरूपात आली. एकापाठोपाठ एक अशा पस्तीस आवृत्त्या काढाव्या लागल्या. कोटयवधी लोकांनी ते पुस्तक वाचले. अक्षरशः किमया व्हावी तसा झोला लोकप्रीयतेच्या लाटेवर आरूढ झाला. नुसत्या फ्रान्समध्येच नव्हे, तर युरोपात, जगभर त्याला प्रसिद्धी मिळाली. कीर्तीचे वलय सतत झगमगत राहिले. लोकांना त्याच्या व्यक्तिजीवनाविषयी जबरदस्त कुतूहल. तो काय वाचतो, केव्हा वाचतो, टेबल कोणते वापरतो, सायकल कोणती वापरतो, दिसतो कसा, वागतो कसा–सर्व तपशिलाबद्दल जबरदस्त उत्सुकता ! त्या संदर्भात एके ठिकाणी असा उल्लेख आला आहे, की 'हा नुसता शिंकला, तरी पॅरीस झोपेतून खडबडून जागे होते !' La Assommoir या कादंबरीवर झोलाला ४० लक्ष फ्रॅन्क्स् मिळाले. परभाषेत किती भाषांतरे झाली व त्यांच्या किती आवृत्त्या निघाल्या याची मोजदादही ठेवता येऊ नये अशी लोकप्रीयता या पुस्तकाला मिळाली.

विश्रांतीसाठी झोला नॉर्मण्डीला आला. तेथे गाय डी मोपॉसाचे वास्तव्य होते. तेथील नवथर लेखक झोलाला भेटायला येत, मार्गदर्शनाची अपेक्षा करीत. साहित्यचर्चा चाले. Huyssmans, Corad, Alexis ही मंडळी होतीच.त्या सर्वांत बाजी मारणारा होता मोपॉसा. साहित्यस्वरूपाच्या चर्चेतून एक विचारप्रणाली बनत गेली. झोलाने पॅरिसपासून २५ मैलांवर मर्दो येथे एक प्रशस्त बंगला बांधला होता तेथे दर गुरुवारी ही लेखकमंडळी जमत असत. या बैठकीतून Naturalism या साहित्यिक प्रणालीची उगम झाला. जीवनाचे सरळ, रास्त, अंतर्भेदी चित्रण करणे हा या मतप्रणालीचा दावा. माणसाच्या बुद्धीइतकेच शरीरही महत्त्वाचे आहे. वंशपरंपरागत असे संचित ही माणसाची नियती आहे. हे लक्षात घेऊन मानवी जीवीतव्यवहाराचे सर्वस्पर्शी, अंतर्बाह्य स्पष्ट चित्रण करणे म्हणजे Naturalism. याचा नमुनेदार प्रत्यय देण्याच्या हेतूने झोलाने एक पुस्तक प्रसिद्ध करायचे ठरविले. नुकत्याच झालेल्या युद्धाच्या सावल्यांनी फ्रान्समधली शांतता विस्कटून गेली होती. तेव्हा त्या संदर्भात प्रत्येकाने एक कथा लिहावी असे ठरले. त्यात झोलाची An Attack on a Mill आणि मोपॉसाची Ball of Fat या दोन कथा अतिशय गाजल्या. विशेष लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे एक नवी मतप्रणाली साहित्याच्या क्षेत्रात नीट रुजली.

लेखकाला निर्भेळ कौतुक कधी लाभत नाही ! कोणी ना कोणी दुस्वासी असतोच. झोला तरी त्याला अपवाद कसा ठरणार ? यश

जेवढे झगझगीत तेवढ टीकाकारांचे शरसंधान प्रभावी. काही वावदूक टीकाकारांनी झोलाच्या विचारप्रणालीवर टीकेची झोड उठवली. झोला हा क्षुद्र, निराशावादी, नुसती घाण उपसणारा, ध्येयशून्य, साहित्यिक–गटारासारखा आहे. इ. आरोप झाले त्याचप्रमाणे Naturalism मध्ये कोणतीही बौद्धिक शिस्त नाही. सत्य व राजकारण यांचा अभाव इ. असंख्य दोषारोप झाले, झोला म्हणाला, 'हे लोक इतके का संतापले आहेत ते मला पक्के ठाऊक आहे. इतर लोक जे हळू हळू पुटपुटतात तेच मी मोठ्याने ठणकावून सांगतो!' साप्ताहिकातून हल्ले सुरू होते. स्वसमर्थनार्थ नव्हे, तर आपल्या साहित्यिक विचारधारेच्या संरक्षणार्थ. झोला सर्व आरोपांना उत्तरे देत होता. १८७७ मध्ये झोलाला मानणाऱ्या सर्व साहित्यिकांनी व टीकाकारांनी त्याचा वाढदिवस मोठ्या थाटामाटाने साजरा केला. मेजवानी आयोजित केली. फ्लॉबर्ट उपस्थित होता. भरपूर चर्चा झाली. सामाजिक भोंदूपणावर शरसंधान झाले. नॅचरॅलिझम् हा पाण्यावरील तैलबिंदूप्रमाणे सर्वत्र पसरत जाणार याविषयी कोणालाही शंका उरली नाही.

## नाना टॉवर

आता झोलाची गणना धनंतर वर्गात-बूर्ज्वा वर्गात होऊ लागली. झोलाला लेखनावर कल्पनातीत पैसा मिळत होता. मूलबाळ नव्हते. ती एक चमत्कारीक उणीव होती. अलेक्झँण्ड्रिन् खूप सुंदर सुंदर वस्तू खरेदी करीत असे. जुन्याकाळची वैशिष्टचे दाखविणारे फर्निचर, गालिचे, भांडी, बुककेस इ. खरेदी करण्याची तिला फार हौस. मादाम चार्पेटर साहित्यिकांचे एक मंडळ चालवीत असे. तेथे झोलाची उपस्थिती ठरलेली. लोक त्याला पहायला गर्दी करीत. दणकट देहयष्टीचा, दुसऱ्यांना गुदगुल्या करून अक्षरशः बेजार करणारा हा झोला नामक 'अस्वल' कसा दिसतो हे पाहाण्याची लोकांना उत्सुकता. (अस्वल हा झोलाला मिळालेला खास आहेर आहे.)

१८८० मध्ये झोलाची 'नाना' ही अजरामर कादंबरी प्रसिद्ध झाली. वेश्याजीवनावरची कादंबरी. त्यात प्रत्ययकारिता यावी म्हणून झोला त्या बदनाम वस्तीत हिंडत असे. अनेक अनौपचारिक मुलाखती घेत असे. प्रचण्ड तपशील जमा करण्यात आला. अवलोकन, सुजाण विश्लेषण, अन्तःकरणाचा सरळ ठाव घेणारी कथावस्तू, साधी स्वच्छ भाषा, उपेक्षितांचे उकललेले अंतरंग...त्यामुळे कादंबरी लोकांच्या एकदम पसंतीस उतरली. क्रमशः प्रसिद्ध होत असताच लोकांच्या उड्या पडत असत. नानातील कथावस्तूविषयी लोक चर्चा करीत. एवढेच नव्हे तर पुढील कथाभागात कसेकसे घटनांचे वळण दाखवावे याचा अनाहूत सल्लाही देत. असले वाचकांचे मार्गदर्शन झोलाला मनोरंजक वाटत असले तरी तो एकंदर बालिशपणाच होता. असे सांगतात की प्रकाशनाच्या दिवशी 'नाना'च्या ५०,००० प्रती खपल्या आणि पहिली लाखाची आवृत्ती बोलबोल म्हणता उडाली. एकामागे एक अशा १० आवृत्त्या काढाव्या लागल्या. हे सारे आकडे आपल्याला केवळ 'अक्रीत' असल्यासारखेच वाटतात. त्यांची तुलना करायचीच झाली तर टॉलस्टॉयच्या रेसरेकशनशी करता येईल. 'नाना'मुळे झोलाला खूप पैसा मिळाला. जुन्या प्रचंड वास्तूशेजारी नवी टॉलेजंग इमारत उभी झाली. 'नाना 'टॉवर! इतःपर अशा कित्येक कादंबऱ्यांच्या नावाचे टॉवर्स उभे रहायचे होते. मूळातली वास्तू अखेर दसपट प्रचण्ड झाली. त्यात रहाणारी माणसे मात्र दोनच. झोला अन् अलेक्झँण्ड्रिन!

१८८० मध्ये झोलाची आई गेली. फ्लॉबर्टही गेला. या दोन्ही व्यक्तींना झोलाच्या भावजीवनात फार मोठे स्थान होते. फ्लॉबर्टचा मृत्यू अगदीच अनपेक्षित होता. तो मुळी आजारीसुद्धा पडला नाही. बाहेर जाण्यासाठी कपडे करून निघाला. जरासे डोके दुखल्यासारखे वाटले म्हणून निजला तो निजलाच! झोलाला फ्लॉबर्टच्या जीवनाची ती अनपेक्षित अखेर चक्रावून गेली. आईच्या अंत्ययात्रेचे दृष्यही डोळ्यासमोरून हलेना. ती ज्या खोलीत गेली, त्याच्या लगतचा जिना गोल होता. शव खाली आणता येईना. खिडकीवाटे बाहेर लोंबकाळत शवपेटिका खाली आणावी लागली होती. ते सारे दृष्य झोलाला विलक्षण यातनामय वाटले होते. एकंदरीत स्मशानभूमीतला अनुभव त्याला ढवळून टाकीत असे. फ्लॉबर्टच्या अंत्यसंस्कारार्थ खणलेला खड्डा तोटका पडला होता. अधिक लांबी वाढवली. तरीही शवपेटिका काही भूमीस समांतर पुरली गेली नाही. फ्लॉबर्ट जरासा तिरपा–वाकडा, असाच पुरला गेला होता...झोलाच्या मनश्चक्षूपुढून हे अन्त्यसंस्कार पुसले जाईनात. त्याला स्वतःविषयी शंका वाटू लागली. स्वभावात अति हळवेपणा आला. अनेक भोळसट समजुतींचा मनावर पगडा बसू लागला. कोठला आकडा शुभ–कोठला अशुभ इ. तर्कदुष्ट विचार येत. कित्येकदा त्याला असे वाटत राही की आपण झोपेतच मरणार! हा गंड इनका दृढ होत गेला, की त्यापायी त्याला झोप येईनाशी झाली. आपले हृदय मूळच्या जागेवरून भरदिशी इकडे तिकडे सरकते याबद्दल तर त्याला मुळी शंकाच नव्हती. कित्येकदा ते गुढग्यात तर कित्येकदा ते कमरेत असल्याचा त्याला भास होई! आकाशात विजा कडाडू लागल्या की एखादा विजेरीचा लोळ खिडकीतून आत येईल आणि सारे काही जळून भस्मसात होईल अशी त्याला धास्ती वाटे. म्हणून निजताना तो सर्व खिडक्यादारे घट्ट बंद करून घेत असे. या घातक सवयीपायी आपल्यास अखेर प्राणास मुकावे लागणार आहे याची त्याला अर्थातच कल्पना नव्हती.

चाळिशी उलटली. झोला वैभवाच्या शिखरावर होता. प्रकृतीने सुदृढ. यश आणि वैभव असूनही तो आतून उदास झाला होता. शोपेनहॉरच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास म्हणून असेल, किंवा अभ्यासिकेतल्या बुद्धाच्या पुतळ्याचा प्रभाव म्हणून असेल...पण झोला आतून खूप विरक्त होत गेला. त्याची नसन्नस हळवी–आर्त–ताणलेली अशी


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यांत यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

रहात गेली. जे माफक धूम्रपान वा मद्यपान तो करीत असे, त्याच्या-वरचीही वासना उडाली. हा काही केवळ आईच्या व फ्लॉबर्टच्या मृत्यूचा परिणाम नव्हता. अपत्यहीनता हेही एक कारण होतेच. अलेक्झॅण्ड्रिन्सुद्धा अताशा अगदी हिस्टेरिक् बनत चालली होती. लोक त्याला त्यासंबंधात सूचक प्रश्न विचारीत. झोला म्हणे, 'दुसरी स्त्री? ती कशाला? माझे लग्न झालेले आहे, तेव्हा दुसऱ्या स्त्रीचा मी विचार करू इच्छित नाही.'

## स्तुतीचा आणि निंदेचा महापूर

त्याच काळात झोलाची न्यूरॉलॉजिस्ट डॉक्टर चारकॉट यांच्याशी दाट ओळख झाली. मेस्मेर आणि बाल्झॅक यांचे जसे संबंध जुळले होते, तसेच चारकॉट व झोला यांचेही जुळून गेले. मानवी अंतर्मना-वर प्रकाशझोत टाकणाऱ्या मानसशास्त्राची, मानसिक विकृतींची दोघेजण चर्चा करीत. फ्राइडच्या उदयाला अद्याप अर्धशतकाचा अवधी होता. अंतर्मनाची गुंतागुंत उकलून धागेदोरे स्पष्ट करण्याची प्राथमिक खटपट चारकॉट करीत होता. झोला त्याचा नीट वेध घेत होता. त्या विश्लेषणाचा परिणाम Human Beast या कादंबरीत पहायला मिळतो. Human Beast ही कादंबरी विलक्षण परिणाम-कारक आहे. बैचेन नव्हे अस्वस्थ करणारी आहे. अत्यंत भीषण वास्तव! खूप गाजलेली ही झोलाची नवी कलाकृती. मानव या यंत्रयुगात अमानुष यंत्रशक्तीच्या हातचे बाहुले कसे बनत जातो हे झोलाने दाखविले होते. दलित, कामगार जनतेला झोलाविषयी नव्याने आत्मीयता वाटू लागली. जणू त्यांना आपली बाजू जगापुढे परिणामकारक रीतीने मांडणारा हा निर्भय प्रवक्ता असल्याचे मूक आश्वासन मिळाले होते. Joy of life या कादंबरीचेही रसिकांनी स्वागत केले.

यानंतर झोला साहित्यिक विश्वात अधिकाधिक बुडून गेला. त्या-शिवाय वेगळे अस्तित्वच उरले नाही. नियत कर्तव्य सातत्याने करीत रहावे तसे तो लिहीत राहिला. त्याने आपला बालमित्र सिझेनी याच्या जीवनावर बेतलेली कथावस्तू घेऊन कादंबरी लिहिली. सिझेनी हा पेंटर–झोलाच्या दृष्टीने अयशस्वी पेंटर-कलेने झपाटलेला. प्रत्यक्ष जीवनात अयशस्वी–कलेच्या क्षेत्रात उपेक्षित. सिझेनीच्या जीवनावर कादंबरी लिहिली होती. झोला आपल्याला अयशस्वी समजतो ही गोष्ट मित्राला अगदीच सहन झाली नाही. दोघात मूक-वितुष्ट आले. मित्र दक्षिण फ्रान्समध्ये निघून गेला.. मैत्री तुटली.

क्षणोक्षणी वाढत जाणारे झोलाचे वैभव बरोबरच्या साहित्यि-कांच्या डोळ्यावर येणे हे मानवी स्वभावाला धरूनच होते. दुस्वास, हेवादावा, व्यक्तिगत टीका या सर्वांचा त्रास उपेक्षणीय नव्हता. त्याने लिहिलेल्या La Terra (–Soil) या कादंबरीने पुनश्च खळबळ माजली. ग्रामीण जीवनावरील ही कादंबरी म्हणजे मूर्तिमंत कविता आहे. अत्यंत उत्कट, अस्वस्थ अशा 'मूड'मध्ये या कादंबरीचे लिखाण झालेले आहे. भूमिपुत्रावरील अन्यायाची ती ज्वलंत कहाणी. आहे. त्यातल्या अट्टल बदमाशाचे नाव आहे जीजस् ख्राइस्ट!

या कादंबरीमुळे झोलाच्या स्तुतीला तसाच निंदेलाही महापूर आला. Legion of Honour मिळाला. सिनेटर म्हणून नियुक्ती झाली. ही झाली जमेची बाजू. अकादमीवर येण्याचा मान मिळणार होता–गॉन्कॉर्ट सारख्याने द्वेषयुक्त अडसर टाकले नसते तर ती जागा सरळ चालूनही आली असती. अल्फान्सो डॉडेर हाही विरुद्ध पक्षात सामील झाला. अनातोल फ्रान्सने तर त्याची गणना 'गटार उपशा'-तच केली. तो म्हणे, 'वास्तव लिखाण करायचे म्हणजे अशी घाण उपसलीच पाहिजे, का हो?'

झोलाच्या विरोधकांनी त्याच्यावर टीकेची झोड उठविली. सतत धारेवर धरले. विकृत आक्षेपांचा गदारोळ उठविला. १८ ऑगस्ट १८८७ रोजी एका साप्ताहिकात ५ लेखकांच्या सहीने झोलावर विलक्षण टीका झाली. तिचा विशेष म्हणजे त्यात व्यक्तिगत आरोप, उपहास, नॅचरॅलिझम्वर उपरोधात्मक लिखाण हे तर होतेच, पण झोलावर नपूंसकत्वाचा आरोप करण्यासही विद्वान (?) साहित्यिक कचरले नाहीत. ओळखीच्या लेखकांनी अशी चिखलफेक करावी, इतक्या हीन पातळीवर जाऊन व्यक्तिगत टीका करावी हे पाहून झोला स्तंभित झाला. आपली सामाजिक प्रतिमा शक्य तेवढी प्रति-ष्ठित, उदात्त ठेवण्याचा त्याने प्रयत्न केला. त्यासाठी अकादमीचे दार ठोठावण्यास सुरवात केली. कोणीही मेंबर निवर्तला, की झोला आपली उमेदवारी जाहीर करून टाकी. गॉन्कॉर्टच्या कारवाईने त्याचे नाव शिताफीने दूर केले जाई. पण त्याने पिच्छा सोडला नाही. 'मरेपर्यंत मी अकादमीत निवडून येण्याचा प्रयत्न करणार! पंचवीस वेळा नकार आला तरी हरकत नाही! उलट ते चांगलेच! पुढच्या पिढ्यांना कळेल की, झोलासारख्या माणसाला अकादमीने टाळले!' झोलाची अखेर निवड झाली–पण ती १८९३ साली!

## नवे प्रीतीस्थान

अपत्यहीनतेवरून केलेला घाणेरडा आरोप झोला पचवू शकला नाही. 'एखादे पुस्तक लिहिणे, एखादे झाड लावणे अन् मूल जन्माला घालणे' ही त्याच्या दृष्टीने परिपूर्ण जीवनाची लक्षणे होती. पत्नीला अपत्यसंभव शक्य नाही हे अनेक उपायांनी स्पष्ट झाले होते. झोलाला विलक्षण अगतिकतेने ग्रासून टाकले होते. १८८७ च्या सप्टेंबर–ऑक्टोबरमध्ये तो रॉएनला (Royan) विश्रांतीसाठी गेला होता. त्याने बाह्यतः आळसाचा मुखवटा चढविला होता. मुद्रेवर कठोरता आणली होती. पण आतून मात्र वृत्ती सैरभैर झालेली होती. पन्नाशी आलेली. पोट सुटले होते–डोक्याला टक्कल–सर्वत्र सुखासीन वाता-वरण–पण चेहरा ओढलेला. वृद्धत्वाची सावळी छाया पडायला सुरु-वात झाली होती खरीच! एकदा तो एका थिएटरमध्ये नाटक पहायला गेला होता. मध्यंतरात पॅसेजमध्ये खूप गर्दी झाली–झोलाचा एक मित्र थोड्याशा अंतरावर होता. त्याला गाठण्यासाठी झोलाला जायचे होते. पण गर्दीत तो घुसला. पोटात धक्का बसला. श्वास लागला. ऊर धपापला. चेहरा घामाघूम! त्याची ती स्थिती पाहून मित्र म्हणाला, 'अरे बाबा, तू जरा वजन का कमी करीत नाहीस?'

'ते कसं काय करायचं?'

'त्यात अवघड काय आहे? फार सोपी गोष्ट! कोणतेही पेय घेणे बंद कर. बस्!'

दुसऱ्या दिवसापासून झोलाने हा उपाय अत्यंत कडकपणे अंमलात आणला. ३ महिन्यात ३० पौंड वजन उतरले. झोलाचे बारीक होणे हा लोकांच्या आश्चर्याचा विषय होता. त्या काळात झोलाचे कमी होणारे वजन व मोपाँसाचे वाढत जाणारे वेड हे दोन्ही विषय सर्व

पृष्ठ ३६ वर

# उलटी सुलटी अमेरिका

लेखक : **आर्ट बुकवॉल्ड**

अनुवाद : **अनंत भावे**

## ☐ सिगारेट ओढू नका सिगार फुंका

समाजातील एखाद्या अल्पसंख्यांक गटाने, आपल्या मुक्तीसाठी चालवलेली लढाई एका दिवसात जिकल्याचे उदाहरण अगदी क्वचितच पाहायला मिळते. पण अमेरिकेत हे घडलेले मी पाहिले आहे. अमेरिकेतील सिगार फुंकणाऱ्या शौकिनांचा जो अल्पसंख्याक गट आहे त्याच्या बाबतीत असा चमत्कार झाला आहे. मी स्वतः या अल्पसंख्याक गटातला आहे, हे सहज नमूद केले पाहिजे. सिगार फुंकणाऱ्यांना, आत्ता आत्तापर्यंत, महारोग्यांसारखे वागदले जायचे. यजमानीणबाई आमचा अपमान करायच्या; सेविका आमचा धिक्कार करायच्या; मुले आमच्याकडे तुच्छतेने पहायची; आणि बायका त्याबद्दल अखंड टोचून बोलायच्या.

चित्रपटांनी सुद्धा सिगार फुंकणाऱ्यांची प्रतिमा खराब केली आहे. चित्रपटात बेरकी राजकारणी पुरुष आणि टोळीवाले चोर-दरवडेखोर तेवढे सिगार फुंकताना दिसतात. असे चहूकडून भंडावले जाऊनदेखील आम्ही सिगार फुंकणे सोडले नाही. सिगार फुंकायचा की माणूस तोडायचा, असा प्रश्न आमच्या समोर कित्येक वेळा उभा राहतो. अशा वेळी आम्ही अर्थात सिगार फुंकायचा निर्णय घेतो; कारण सिगार (माणसापेक्षा) जास्त वेळ टिकतो आणि त्यापासून आनंदही जास्त मिळतो.

सिगार फुंकत असल्यामुळे मी तसा एकाकी होतो. पण सिगार फुंकण्यापासून मिळणारे दुर्मिळ सुख हवे असेल तर एकाकीपणाची किंमत द्यायलाच हवी होती. एखादे व्यसन तुम्हाला लागायचेच असेल तर ते समाजाला आक्षेपार्ह वाटणारे तरी असावे, असे माझे मत आहे.

मग अचानक ते घडले. सिगारेट ओढण्याबद्दलचा सर्जन जनरलचा अहवाल एक दिवस बाहेर आला आणि सिगारेट ओढणाऱ्यांची दैना झाली. उलट सिगार फुंकणाऱ्याकडे लोक कौतुकादराने पाहू लागले. सिगार फुंकणाऱ्यांना कर्करोगाची तितकीशी भीती नसते आणि ते सिगारेट ओढणाऱ्यांपेक्षा पुष्कळच दीर्घायुषी असतात, असे सर्जन जनरलच्या त्या अहवालात स्वच्छ म्हटले होते.

झाले. आधी मला कटाक्षाने टाळणारी माणसे आता आवर्जून माझी भेट घेऊन विचारू लागली, 'सिगार कसा ओढायचा ते शिकवाल का आम्हाला ?'

मी शिकवायचो त्यांना, 'धूर आत नाही घ्यायचा. सिगारचा. सिगार नुसता फुंकायचा.'

'पण धूर आत न घेता ओढणार कसा सिगार ?' असा प्रश्न हमखास विचारला जायचा.

'त्याचं काय आहे, तुम्ही सिगार ओढता तो तोंडभरू समाधानासाठी; त्याकरता धूर फुफ्फुसात घ्यायची गरजच नाही.'

सिगारेट ओढणाऱ्यांना सिगार फुंकायला शिकवणे हे सोपे काम नव्हते; पण मी ते चिकाटीने केले.

सिगार फुंकण्याची कला शिकवणारा शिक्षक म्हणून मला मोठी मागणी होती. किंबहुना एकूण समाजातच अचानक मला विशेष मानमान्यता मिळू लागली. यजमानीणबाई बड्या असामींशी माझी ओळख करून द्यायच्या. 'तुम्ही या मि. बुकवॉल्डना भेटायलाच हवं. सर्जन जनरलचा अहवाल बाहेर यायच्या आधीपासून सिगार ओढतात हे महाशय.'

हे ऐकले की माणसे एकदम प्रभावित व्हायची. कित्येकजण मुलांसाठी माझी सही वगैरे घ्यायचे.

विनयशील दिसण्याचा अटोकाट प्रयत्न करीत मी मजेत सिगार फुंकत राहायचो. त्यांना सांगायचो 'मी सिगार फुंकतो यात कौतुक करण्यासारखं खरंच काही नाही. दहा वर्षांचा असताना सिगारेटबद्दल माझी एक समजुत होऊन चुकली होती. आमच्या शेजारच्या वाडीतली मुले रेल्वे लायनीच्या पलीकडे जाऊन सिगारेट ओढायची; आणि मग खोकत बसायची. त्यामुळे सिगारेट ओढण्याचा आणि खोकल्याचा परस्परसंबंध असला पाहिजे असं मी ठरवून टाकलं. अशा प्रकारे, वयाच्या दहाव्या वर्षापासूनच मी आपला सिगार फुंकायला लागलो,

नव्या वातावरणात, सिगार फुंकण्यापासून आणखी एक फायदा होऊ लागला आहे. आता बायका सिगार फुंकू लागल्या आहेत. पार्टीमध्ये सुंदर सुंदर बायका माझ्याजवळ येऊन मला सांगतात, 'तुमच्या सिगारचा वास किती गोड आहे. मला तरी द्या ना एखादा सिगार'

मी लाजत लाजत त्यांना एक सिगार देतो. काहीजणी कानात कुजबुजतात माझ्या, 'मला आवडतोस रे तू.'

'पण मी कुठे देखणाबिखणा आहे ?' मी विचारतो.

'म्हणून काय झालं' त्या म्हणतात, 'दीर्घायुषी तर आहेस की नाही ? मग झालं.'

येणेप्रमाणे, सिगार फुंकण्यामुळे आत्तापर्यंत भोगलेल्या साऱ्या कष्टांची, अपमानांची आणि दुःखाची भरपाई आता होऊ लागली आहे. ज्यांनी सिगार फुंकणाऱ्यांचा छळ केला त्यांच्याच तोंडावर धुराचे फवारे सोडण्याचे भाग्य सर्जन जनरलच्या अहवालामुळे आम्हा सिगारफुंक्यांना लाभले आहे. सर्जन जनरल आमच्या धन्यवादास पात्र आहेत.



# कॅप्टन तनामा

**संजीवनी खेर**

गुप्तचरांचे व देशभक्तांचे अनेक प्रकार असतात. प्राणपणाला लावून लढणे, बुद्धीपणाला लावून लढणे, अनामिकतेचे दुःख असणे ह्या गोष्टी हेरांच्या कर्तृत्वाला सरताज चढवितात. स्वतःचे व्यक्तिमत्त्व, कीर्ती, इज्जतपणाला लावून एका जपानी कॅप्टनने रशियनांना नामोहरम केले. हे त्याने इतक्या स्वाभाविकपणे केले जितक्या स्वाभाविकपणे सत्य माहीत असून मुलाच्या बेइज्जतीने शरमून त्याच्या पित्याने आत्महत्या केली. रशियन हेरखाते, लष्करीखाते साऱ्यांच्या योजनांवर त्याने पाणी फिरविले. रशियन क्रांती लवकर घडून यायला जपान्यांनी रशियाचा केलेला पराभव हे एक महत्त्वाचे कारण होते. १९०५ ची पोर्ट आर्थरची लढाई, नशान, मुक्देन येथील रशियनांचा पराभव ट्रान्स सैबेरियन रेल्वे त्यांना सैनिक पुरवू शकली नाही हे असत्य आहे. त्यांच्याजवळ भरपूर मनुष्यबळ, साधने होती पण सगळी चुकीच्या जागी ठेवलेली होती.

झारच्या इंटेलिजन्स सर्व्हिसमधील एक जनरल, जनरल याब्लास्कीने ही माहिती आपल्या मित्राला दिली. या जनरलला झारशाही बुडाल्याचे दुःख होते. त्याच्या कोटावर डझनभर सन्मानाची पदके लटकत होती. रशियातून परागंदा होऊन बर्लीनमध्ये तो हलाखीच्या चणचणीच्या स्थितीत रहात होता. त्याचा गतेतिहास संपन्न होता व तेच त्याच्या स्वप्नांचे चलन होते. त्याच्या मते एक जपानी कॅप्टन ह्या रशियन क्रांतीला जबाबदार आहे. तो बदमाश नसता तर झारशाही अजूनही दिमाखाने मिरवली असती. जपान्यांनी आमचा पराभव केला व क्रांतीची लाट पसरत गेली. कॅप्टन तनामा त्याचे नाव. त्याच्या सहाय्याखेरीज हे अशक्य होते.

कॅप्टन तनामा सेंट पीटसबर्गला जपानी राजदूतावासात अॅटॅची म्हणून आलेला होता. जपानमधील राजवंशात ह्या जन्मलेला होता. अत्यंत घरंदाज व आदबशीर बोलणे यामुळे विविध थरातील स्त्रियात फार प्रिय झाला होता. सहा फूट उंचीचा, काळवंडलेल्या चेहऱ्याचा कुरूपसा तनामा गणवेषात भलताच आकर्षक व प्रभावशाली दिसायचा.

तनामा पीटसबर्गला आला तेव्हा जनरल याब्लांस्की कॅप्टन होता व हेरखात्यात दुय्यम दर्जावर होता. त्याचे तनामावर अगदी बारीक लक्ष होते. परकीय दूतावासात अॅटॅची सहाय्यक,म्हणजे हेरखात्याचा हस्तक असणे अगदी स्वाभाविक होते. तनामाचे घराणे प्रसिद्ध होते, सुसंस्कृत होते. त्याचे वडील मिकॅडो राजाचे विश्वासू सल्लागार होते. त्याचे आदबशीर, विनयशील घरंदाज वागणे यामुळे तो सर्वांचे लक्ष वेधी.

त्यामुळेच कदाचित लष्करी खात्याचे त्याच्यावर बारीक लक्ष होते. तो रशियात आल्यापासूनच टोकियोतील रशियाचे हेरखाते बातम्या फार फुटतात अशी जोरदार तक्रार करू लागले होते. तनामावर डोळ्यात तेल घालून लक्ष ठेवावे लागत होते ते यासाठीच. पण लष्करी खात्याने तनामालाच फोडायचे ठरवले.

तनामा उच्चप्रतिष्ठितांमध्ये अतिशय आवडता होता. स्त्रिया, अभिनेत्रींमध्ये तो चाहता पाहुणा होता. गडगंज संपत्तीमुळे मनमानेल तसा मुक्तपणे पैसा उधळणे हा त्याचा विशेष गुण होता. जुगाराच्या अड्डयावर लोक त्याची वाट पाहायचे कारण तो बेफाम हरायचा. त्याच्याशी जिंकून इतर अधिकाऱ्यांनी आपल्या स्त्रियांना दागिन्यांनी मढवले होते. तनामाच्या घरी येणाऱ्या जाणाऱ्यावर हेरखात्याची कडी नजर होती. परंतु त्याच्या वागण्यात आक्षेपार्ह काहीच आढळत नव्हते. गावात त्याच्या पुष्कळ मैत्रिणी होत्या पण त्या सर्व रशियन सरकारच्या नोकरीवर होत्या. त्यांच्याकडूनही काही बातम्या लागत नव्हत्या. तरीही जपानला रशियन बातम्या लागत नव्हत्या. तरीही जपानला रशियन बातम्या खूप पोहोचत होत्या.

त्यावर एकच उपाय होता. तनामाची रशियातून हकालपट्टी होईल याची तजवीज करायची व आशा करायची की त्याच्या बदली येणारा अधिकारी तनामा इतका चलाख, प्रभावी व हुशार नसेल. ह्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी तनामाला पेचात धरायचे बेत आखले जाऊ लागले. तनामा पेचात सापडला की एकतर रशिया सोडून जाईल किंवा आत्महत्या तरी करील. ह्या कामासाठी तनामाच्या एलीन्स्काया नावाच्या मैत्रिणीची मदत घ्यायचे ठरले. ती अभिनेत्री होती. तिला त्याच्याबद्दल माया होती पण सत्तेच्या दडपणाखाली तिने हे काम करायचे कबूल केले.

एके दिवशी ती तणतणत तनामाकडे गेली. त्याला आपल्याशी लग्न करायची गळ घालू लागली. विवाहाखेरीज आता गत्यंतर नाही असेही तिने सांगितले. तनामाने तिला सभ्यपणे पण धुडकावून लावले. कारण ह्या आंतरराष्ट्रीय विवाहाने त्याला देशाला मुकावे लागले असते व दुसरे म्हणजे तो विवाहित होता. तिने धमकी दिली तेव्हा तिचे तोंड बंद करायला त्याने भरपूर पैसा देऊ केला, पण तिने दोनच पर्याय मांडले‌—लग्न वा गौप्यस्फोट. एका दिवसाचा अवधी देऊन ती निघून गेली.

दुसऱ्या दिवशी तनामा याब्लांस्कीकडे आला. हतबल होऊन मार्ग शोधायला मदत करायची विनंती केली. गौप्यस्फोट होणे म्हणजे त्याच्या धवलकीर्तीला काळीमा लागल्यासारखे होते. त्याला त्याच्या समाजात तोंड दाखवायला जागा रहाणार नव्हती. घराण्याची इज्जत मातीत मिळणार होती. त्याच्या वृद्ध वडिलांना हा धक्का सहन झाला नसता. त्यांनी हे पुत्राचे मानहानीकारक वर्तन ऐकून आत्महत्याच केली असती. मानहानी जपान्यांना फार मोठा गुन्हा वाटतो. असे सांगून तनामाने स्वतःला मदत करायची याब्लांस्कीला विनंती केली, व ह्या मदतीची

परतफड मी कोणत्या स्वरूपात करू असे काकुळतीने विचारले.

याब्लांस्कीला मनातून आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. पण संकोचत तो म्हणाला, 'मी कितपत मदत करू शकेन याची शंकाच आहे. पण तुम्हाला रशिया सोडून जावे लागेल.'

'ह्या बाबतीत माझ्या वरिष्ठांशी काय ते बोलून कळवतो तुम्हाला.'

याब्लांस्कीने सारी हकीगत आपल्या वरिष्ठांना सांगितली. सारेजण जपान्यांच्या प्रतिष्ठेच्या खुळचट, जुनाट कल्पनांना हसले. एका क्षुद्र नटीच्या धमकीसरशी देशाची गुपिते द्यायला तयार झालेल्या कॅप्टनबद्दल त्यांना अतिशय आश्चर्य वाटले. अर्थात जपानी सत्ता रशियाला खोटी माहिती देऊन फसवणार व हुर्रे करणार यात शंका नव्हती. पण पाहू तरी जपान्यांची बुद्धिमत्ता! असा विचार करून तनामाला रशियातून गेल्यावर वापरायचे ठरवले. कराराप्रमाणे त्याला मांचुरिया व पोर्ट ऑर्थर येथील जपान्यांचे प्लॅन कळवायची विनंती केली. तनामाने पुरविलेल्या माहितीवर फारसे विसंबून रहायचे नाही हे ठरलेलेच होते. त्या माहितीच्या उलट सत्यस्थिती असणार हे ते मनात उमगून होते.

हे सारे ध्यानात ठेवूनही तनामाशी त्यांनी हा खेळ खेळायचे ठरवले. १९०२ च्या डिसेंबरला रशियन अधिकारी लष्करी हालचालींची पुनर्रचना करण्यात दंग असताना एक पाकीट त्यांच्या हाती आले. दूतावासाच्या डाकपेटीतून आलेले हे पाकीट तनामाने पाठविलेले होते. पोर्ट आर्थरवर जपान्यांच्या ज्या चढाईच्या योजना होत्या, त्याची तपशीलवार नोंद या लखोट्यात होती. सैनिकांची रणगाड्यांची, हल्ल्याच्या दिशांची सविस्तर व कारणासहित माहिती होती. ती पाहून एक रशियन मेजर म्हणाला, 'बनावटी लष्करी रचनेच्या योजनेतही हे जपानी पारंगत दिसताहेत.'

दुसरा अधिकारी म्हणाला, 'अरे कदाचित ही माहिती खरी देखील असेल.'

'हॅट्, पण काही भरवसा नाही हं. आपण ह्या माहितीवर विश्वास ठेवणार नाही असे मानून त्यांनी खरीच माहिती पुरविली असल्याचा संभव आहे. काही केले तरी पंचाईत होईल आपली.'



ह्या बोलण्यानंतर तो लखोटा टेबलाच्या खणात ठेवला गेला व सगळेजण त्याबद्दल विसरून गेले.

सहा महिन्यांनंतर पुन्हा एक लखोटा आला. यात मांचुरियाच्या आक्रमणासंबंधीची योजना होती. पूर्वीच्या लखोट्याप्रमाणेच मुद्देसूद, चिरेबंद व अस्सल योजना आखलेली होती. एका दृष्टिकोनातून पहाता त्याच्या सत्यतेबाबत अधिकाऱ्यांची खात्री पटू लागली. यानंतर काही काळाने आणखी एक थैली रशियनांच्या हाती आली आणि त्याचवेळी टोकियोहून एक सनसनाटी बातमी आली की ज्यामुळे रशियनांचा त्या लखोट्यांवर असलेला अविश्वास पार उडाला. ती बातमी होती तनामासंबंधीची, अगदी विश्वसनीय रीत्या कळलेली. तनामाला गुप्त लष्करी फायली चोरण्याच्या आरोपात, प्रत्यक्ष चोरी करताना पकडण्यात आलेले होते. त्याच्यावर खटला भरण्यात आला होता.

ही देखील आपल्याला फसवायची कल्पती असेल असे समजून रशियन अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे कानाडोळा करायचे ठरविले पण त्याच्या मागोमाग दुसरी एक बातमी आली. तनामाच्या वडिलांनी त्याचे हे देशद्रोही वर्तन पाहून, स्वतःची मानहानी असे समजून आत्महत्या केली.

ह्या बातमीनंतर मात्र रशियन अधिकाऱ्यांनी टेबलाच्या कप्प्यात ठेवलेल्या

बातम्यांच्या योजना बाहेर काढल्या. त्यांचा दक्षपणे अभ्यास करून त्यानुसार लष्करी फर्मानें सुटली. भराभर लष्करी सेनेची पुनर्रचना झाली. १९०४ मध्ये युद्ध भिडले. त्यात रशियन सैन्याने मार खाल्ला. व ह्यानंतर १९०५ व १९१७ ची क्रांती अधिक सुलभ झाली.

जपानी सैन्याच्या रचनेची आगाऊ माहिती मिळाल्याने त्यानुसार रशियनांनी आपली ठाणी व सैनिक यांची रचना केली होती. पण प्रत्येक ठिकाणी अपेक्षेपेक्षा दुप्पट सैनिकांचा रशियन सैनिकांना मुकाबला करावा लागला. रशियन सैन्य मागे हटत गेले. पण सारे चुकीच्या दिशेत झाले. पण ही चूक लक्षात आली तेव्हा फार उशीर झालेला होता. ह्यानंतर लष्करी पुर्नरचना करणे आवाक्यातले नव्हते. सारी व्यूहरचना तनामाने पाठविलेल्या पत्रकांवर आधारलेली होती. रशियन सैन्याचा नशान, मुखेन व पोर्ट ऑर्थरला पराभव झाला. इतिहासात नोंद आहे की ट्रान्ससैबेरियन रेल्वे रशियनांना सैनिक पुरवू शकली नाही. पण हे निखालस असत्य आहे. त्यांच्याकडे युद्धआघाडीवर भरपूर सैन्य होते पण सारे चुकीच्या जागी रचलेले होते.

याब्लांस्कीने युद्धात कैद केलेल्या एका जपानी अधिकाऱ्याला तनामाची हालहवाल विचारली तेव्हा तो अभिमानाने म्हणाला, 'तनामा तर राष्ट्रीय वीरसेनानी बनला आहे. राजाने त्याला आमच्या देशातील सर्वोच्च मानपदक 'उगवत्या सूर्याचे पदक' बहाल केले आहे.'

'म्हणजे त्याच्यावर राजद्रोहाचा खटला भरला हे खोटं होतं तर?'

'नाही नाही. त्याच्यावर खटला भरून त्याला बदनाम करण्यात आले. त्याने आपण होऊन ही बदनामी स्वतःवर ओढून घेतली होती. पण त्यामुळेच त्याचे वागणे तुम्हाला खरे वाटले.'

'अरे पण त्याच्या वडिलांनी त्यामुळे आत्महत्या केली त्याचे काय?'

'त्यांचे हे बलिदान होते. शत्रूला फसवण्यात, दिशाभूल करण्यात त्यांच्या आत्महत्येचा फार मोठा भाग होता. म्हणूनच ते अमर बलिदान वाटते आम्हाला.'

प्रतिहेरगिरी तीही बदनामी, आत्मत्याग ह्या उदात्ततत्वावर जेव्हा नागरिक स्वीकारतात तेव्हा कितीही हुशार शत्रू असला तरी तो फसतो व आपला विजय होतो. अशांचा पराभव अशक्य होतो. रूसो-जपानी युद्धात असेच झाले. □ □

## अमीरशाही

अफगाणिस्थानच्या एका अमीराकडे त्याच्या राज्यातील दोन प्रजानन गेले.

'आमच्या इस्टेटींच्या मधोमध एक शेत आहे. त्याच्यावर माझाच हक्क आहे. मला न्याय मिळालाच पाहिजे. शेत माझंच आहे...' दोघेही दावा करू लागले. दोघांनीही आपापला साक्षीपुरावा सादर केला.

अमीराची पंचाईत झाली, निर्णय काय द्यायचा? दोघेही हट्टाला पेटले होते.

'तुला मुलगा आहे?' अमीरानं एकाला विचारलं.

'हो...'

'तुला मुलगी आहे?' अमीरानं दुसऱ्याला विचारलं

'हो...'

'तर मग दोघांचं लग्न करा नि वादग्रस्त शेत त्यांना देणगी म्हणून देऊन टाका.' अमीरानं निर्णय दिला.


'पण समजा, या दोघा प्रजाजनांना तुम्ही सुचविल्याप्रमाणे हे लग्न घडवून आणायचं नाही.. तुम्ही काय कराल?' अमीराच्या पदरी असलेल्या एका इंग्रजानं अमीराला विचारलं.

'मी दोघा प्रजाजनांनाच फाशी देईन नि त्यांच्या इस्टेटी जप्त करीन...' अमीरानं त्वरित निर्णय दिला. □

## जय सचोटी

असं म्हटलं गेलं आहे, की काही ज्यूरींची लाच खाण्याची वृत्ती हा एक ज्यूरी-पद्धतीचा दोष आहे. पण असं क्वचितच घडतं, असंही दाखविता येईल. तरीही क्वचित प्रसंगी काही ज्यूरींकडून लाच खाल्ली जाते, हा लक्षणीय मुद्दा. न्यूयॉर्कमधील एका कोर्टात चालणाऱ्या खटल्यांच्या वेळी पुष्कळशा खटल्यांची सुनावणी बहुतांशी आपल्यापुढेच व्हावी अशी धडपड करणाऱ्या एका ज्यूरींच्या समूहाला सतत नेमणुका मिळत गेल्या. त्यांचा एक नेता खटल्यातील पक्षकारांकडून लाच घेई. 'निर्णय तुमच्या बाजूनं देऊ,' पक्षकाराला तो आश्वासन द्यायचा. पण यातही सचोटी असायची. म्हणजे असं, की तो एकाच वेळी दोन्ही पक्षकारांकडून लाच कधीही घेत नसे. लाच घेऊन काम फत्ते करायचं ते एकाच पार्टीचं. एका पार्टीशी असा सौदा केल्यावर तो त्याला चिकटू राहायचा. मग दुसरा पक्ष अधिक रक्कम देऊ करायचा. तो ती घेत नसे. म्हणायचा, 'सचोटी मोठ्यात मोठा गुणधर्म आहे...'

— चित्तरंजन घोटीकर



चित्रवार्ता पुष्पवणी

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

सिमी । सिद्धार्थ । खटला

शम्मी । मनोरंजन । संजीव

शर्मी । बाशू । आविष्कार




## सियाने बच्चे ऐसे नही करते

सिमी हिंदी चित्रपट सृष्टीतील एक सियानी (शहाणी) बाई आहे. सियानी आणि खानदानी. दिसते सिंपल. चार जणी प्रमाणे. फिल्मी स्टार म्हणून तिला कोणीही पास करणे शक्य नाही. ती खुबसूरत नाही, नटखट नाही आणि फिल्मी संकेताप्रमाणे सेक्सवालीही नाही. सेक्स नसतानासुद्धा जयाने जशी धूम मचावली होती तशी सिमी कधी धूम मचावील असे वाटले नव्हते.

अचानक काय झालं तिने 'फिल्मवर्ड' या इंग्रजी फिल्मी नियतकालिकावर खटला भरला. 'सिद्धार्थ' या इंग्रजी चित्रपटामधील तिची एक नग्न प्रोफाईल 'फिल्मवर्ल्ड'च्या मुखपृष्ठावर छापण्यात आली होती. त्यापूर्वी ती इलस्ट्रेटेड विकलीमध्येही आतल्या पानावर छापली होती. सीमीची ती प्रोफाईल आहे, हे पाहून आपण खूश झालो होतो. एखाद्या ओतीव धातुची पॉलिश्ड मूर्ती असावी त्याप्रमाणे सिमी दिसत होती. या चित्रपटाचा नायक शशी कपूर तिच्या सौंदर्यासमोर हात जोडून बसलेला दिसतो आहे. सिमीच्या सेक्सचे ते सौंदर्य काही खास आहे. ते काही मुमताझ, झीनत किंवा बिंदुमध्ये पहावयास मिळायचे नाही. सत्यजित रेच्या 'अरण्येर दिन-रात्रे' मधली ती संथाळ मुलगी म्हणून सिमी यासाठी पहायला हवी. डोळे पेटतात. आपल्या डोळ्यात नशा आहे, रात्र अशी झपाटलेली आहे. आणि एक काळीभोर नितंबिनी साऱ्या देहाला ओंजळी ओंजळीने प्यालेल्या शराबीच्या नशेमध्ये घोळवून तुमच्यासमोर पेश झाली आहे. मग तुमचे तुम्ही रहात नाही. दुनियेत तुम्हाला भोगण्यासाठी ती उभी रहाते आणि तुम्हीच तिचे होता. सत्यजित रेनी असे पेश केले एका संथाळ पोरीच्या रूपामध्ये सिमीचे सेक्स. हेच ते सेक्स इलस्ट्रेटेड विकलीच्या त्या छायाचित्रात पाहिले आणि त्याच्यासमोर हात जोडून विनम्र झालेल्या शशीचा आपल्याला हेवा वाटला. म्हणे एक दिवस हे चित्र खुशवंतसिंग यांच्या अचानक हातात आले. सिमी खुशवंत सिंगांची भतिजी. आपल्या भतिजीचे पराक्रम (!) पाहून ते दाढीतल्या दाढीत हसले नी छापून टाकलं त्यांनी चित्र. तेच चित्र फिल्मवर्डचे संपादक टी. एम. रामचंद्रन् यांनी छापण्याची आयडिया केली. एरवी

देव आनंदच्या सहवासात रहाणारे टी. एम्. रामचंद्रन् असा काही स्टंट करतील अशी अपेक्षा नव्हती. परंतु हल्ली इंग्रजी अखबारवाल्यामध्ये अखबार खपण्याची सेन्सेशनल मसालेदार गोष्टी देण्याची स्पर्धा चालू आहे. इन फॅक्ट, समाजातील लैंगिक विकृती, जुनाट बुरसटलेले विचार आणि मागासलेपणा याचा हे इंग्रजी अखबारवाले फायदा घेण्यासाठी जितके वखवखले आहेत तितकी इतर भाषेतील वर्तमानपत्रे नाहीत. टी. एम्. रामचंद्रही आपल्या इंग्रजी भाषावाल्यांच्या जातीला जागले आणि सीमीच्या फोटोचा फायदा आपल्या पेपरच्या उठावासाठी घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सिमी पण एरवी हिंदी चित्रपटसृष्टीतली आऊट सायडरच अभिनेत्री म्हणून गुणी असली तरी तिचे चित्रपट ‘ जोहर-मेहमुद इन गोवा ’ सोडून दुसरे चालले नाहीत. मेरा नाम जोकर, अनोखी पहेचान, सीमा, नमक हराम, अशा मोजक्या सिनेमात ती दिसली. वहिदाची कारकीर्द संपत आली होती. त्यामुळे सिमीच तिची जागा घेईल, इतकी अभिनयाची जाण आणि आपल्या संवेदनाक्षमतेची छाप तिने जाणकार प्रेक्षकांवर टाकली होती. सिद्धार्थचे निर्माते कॉनराड रुक्स हे नट सिमीचे ‘ जोकर ’ मधले काम पाहून भयंकर खुश झाले होते. म्हणूनच त्यांनी तिला सिद्धार्थमधल्या वारांगनेची भूमिका दिली होती. वहिदानंतर सिमी हीच इंटलेक्च्युअल म्हणून असेल किंवा दुसऱ्या काही कारणामुळे असेल, ती भारतीय निर्मात्यापेक्षा भारताबाहेरील निर्मात्यांना जास्त पसंत होती. ती स्नॉबिश सर्कलमध्ये फिरते, चित्रपटातील भूमिकांची निवड चोखंदळपणे करते, सेटवर वेळेपेक्षा अधिक लवकर हजर रहाते. एकूण ती भारतीय अभिनेत्री याने की चालू अभिनेत्री नाही. एक तिच्या एज्युकेशनची, सोशल स्टेटसची, अॅडव्हान्समेंटची इज्जत आहे. म्हणूनच सिमी नग्न प्रोफाईलमध्ये ज्यावेळी दिसली त्यावेळी आपण मानले. सियानी औरत.

पण, आपल्या नग्न प्रोफाईलचे छायाचित्र इथल्या इंग्रजी अखबारात छापून आले

वहिदा रहेमानची
जागा फक्त
सिमीसाठीच....



(आणि हे नियतकालिक अद्याप रस्त्यावर मिळते. त्या फोटोमुळे की काय कोणी त्याला हात लावत नाही.) आणि तिने 'फिल्मवर्ल्ड'वर खटला भरला.

खटल्याचा निकाल फिल्मवर्ल्डने जिंकला. अर्थातच टी. एम. रामचंद्रन यांनी खटल्यासंबंधी फक्त इंग्रजी अखबारांना विश्वासात घेण्याची भूमिका घेतल्यामुळे बिगर इंग्रजी वर्तमानपत्रांनी टी. एम. रामचंद्रच्या बाजूकडे दुर्लक्ष केले.

अर्थात 'दि इलस्ट्रेटेड वीकली 'मध्ये ते छायाचित्र छापल्यानंतर ते फिल्मवर्ल्डने छापले तर त्याबद्दल फिल्मवर्ल्डला दोषी धरणे चूकच होते. परंतु त्यापेक्षाही चूक सीमीने हा खटला करण्यात होती. सीमीचे म्हणणे असे की भारतीय पब्लिकपुढे हे जाऊ नये ! पाश्चात्य लोक सिनेमात नग्न स्त्री बऱ्याचदा पहातात म्हणून त्यांनी तिला पाहिले तर काय हरकत आहे ! पाश्चात्य लोकांच्याबद्दल सीमीचा हा समज पाश्चात्य लोकावर अन्याय करणारा आहे.

सोनिया सहानीने सीमीचे भारतीय पब्लिक आणि बिगर भारतीय पब्लिक असे दोन भाग केल्याबद्दल कान उपटले आहेत.

सीमी इंटलेक्चुअल आहे–इंग्रजी स्टाईलची. इंग्रजी स्टाईलचे इंटलेक्चुअल जितके कचखाऊ आहेत तितके आमचे साधेसुधे लोक नाहीत. अमिताभ बच्चन हा इंटलेक्चुअल 'दि लास्ट टँगो इन पॅरिस' पहातो आणि ते खराब चित्र आहे असे म्हणतो. अमिताभ काय किंवा सीमी काय सियानी माणसे आहेत ना.

सीमी सियानी आहे. तिने सिद्धार्थमध्ये आपले नग्न रूप पडद्यावर दाखवले. आता जग इतके लहान आहे की या खुशवंतसिंगच्या भतिजीचे पराक्रम कधीतरी खुशवंतसिंगपर्यंत येणारच. मग तिने एकदा नग्न झाल्यावर उगीच आवराआवर करण्याचे काय कारण आहे ? सियाने बच्चे 'ऐसे नही करते.




हॉटेल मॅनेजरच्या लाजवाब भूमिके शम्मीकपूर असा

आणि 'पांड' पोलिसाच्या





'आविष्कार 'मधल्या शर्मिलेच्या खळीला आणि राजेशच्या अभिनयाला तरी लोक फसणार नाहीत

## भारतीय अर्मा ला दूस

तुम्ही बहुतेकांनी जॅक लेमन-शर्ले मॅक्लीनचा धमाल चित्रपट अर्मा ला दूस पाहिला असेलच. आता तुम्ही त्याची भारतीय आवृत्ती ' मनोरंजन ' पहाणार आहात. अर्मा ला दूस ह्या चित्राला दहा वर्षापूर्वी भारतात प्रदर्शनाला बंदी होती. अर्थात दिग्दर्शक झालेल्या शम्मी कपूरने तो इंग्लंडला पाहिला होता आणि त्याची भारतीय आवृत्ती काढून आपल्या पब्लिकपुढे सादर करण्याची आयडिया त्याने केली होती. खरं म्हणजे त्यातल्या मुस्टाश ह्या हॉटेलवाल्याच्या भूमिकेवर शम्मी इतका खूश होता की त्याला ती भूमिका करून साऱ्या प्रेक्षकांना आपल्या अभिनय गुणाने चमकवून टाकायचे होते. पण इतक्यात ' अर्मा ' भारतात प्रदर्शित झाला. त्यामुळे शम्मीच्या मनसुब्यावर पाणी पडले.

अर्थात ' अर्मा ला दूस ' तुम्ही आम्ही पाहिला तरी तो झुमरीतलैया आणि राजनंदगडचे पब्लिक थोडीच पहाते. त्याला मनोरंजन पाहूनच ' अर्मा ला दूस ' पाहण्याचं समाधान मिळणार आहे. मनोरंजनची आयडिया त्याला सॉलिड वाटणारच आणि शम्मी, संजीव आणि झीनत यांच्या भूमिकाही त्याला लाजवाब वाटणारच.

झीनत ' हरेराम 'नंतर आपल्या मनातून उतरली. तिचे दोन सिनेमा पाहिले. यादो की बरात आणि हीरा पन्ना. दोन्हीमध्ये हरेकृष्ण-हरेराममधली तुफान हिप्पी पोरगी दिसली नाही आपल्याला. अर्थातच ' अर्मा 'चा रोल तिला जिंदगीमधला सबसे चंगा रोल मिळाला आहे. पण ती त्याला योग्य आहे का ? आपण जर प्रोड्युसर असतो तर या भूमिकेसाठी हेलन पसंत केली असती. पण झीनत ही झीनत आहे आणि हेलन ' हेलन ' आहे.

संजीव मात्र जॅकलेमनच्या भूमिकेसाठी एकदम फिट माणूस. त्याने पोलिसचा पेहराव चढवला आणि मुमूर्ताचा शॉट दिला तेव्हाच हा मनोरंजनचा हीरो होणार हे आपण ओळखले. तो शम्मीला म्हणाला, माझी भूमिका पोलिसची, तेव्हा आपण चांगलं मराठी नाव ठेऊ. तुम्हाला ' पांडू ' नाव मी घेतल तर कसं वाटतं ? शम्मी म्हणाला फारच छान. म्हणजे भूमिका जर पडली तर पब्लिकलाही ' पांडू 'वरून तुला शिवी द्यायला सोपं जाईल ! ■

## बाशुंचा ' आविष्कार '

बाशु भट्टाचार्य यांचा तिसरी कसम आणि अनुभव हे दोन्ही चित्रपट गाजले. ते रंगीत चित्र पेश करत आहेत ' आविष्कार '. यातील नायक-नायिका आहेत राजेश-शर्मिला. रेडिओवर याची राजेशखन्नाकृत तरफदारी ऐकू येतेच.



प्रेमा नारायण
आणि विक्रम
ओलेत्या क्षणी

मधुबालेचा चेहरा
घेऊन आलेल्या या
नटीचे नाव सोना



तुम्ही रोमीओ ज्युलिएट, लैला-मजनुच्या कहाण्या ऐकल्याच आहेत पण संसारिक जीवन हे वेगळं. या जाहिरातीमध्येच बाशुंनी सिनेमात काय दाखवले ते आले. बाशुजीसारखा नव-चित्रपटवाला कौटुंबिक तणाव कसे होतात, हे समजून घेण्यासाठी किती बारिक सारिक गोष्टी शोधत रहातो ते पहा. तुम्ही-आम्ही ते तणाव जगत असतो. त्यात नवीन दाखवण्यासारखे काहीच नसते ! एकूण नवचित्रपटवाल्यांनी जीवन पाहिले नाही, हे खरेच. आणि तरीसुद्धा हे वास्तववादी चित्रपट म्हणवतात, हा सर्वात मोठा विनोद आहे.

अर्थात 'आविष्कार' कसाही असो. एक गोष्ट शर्मिलाचे काम लाजवाब. ती एकदा राजेश आपल्याशी घरी आल्यावर नीट वागणार नाही, ह्या तयारीने तो त्याच्या फॅमिली फ्रेंडशी बोलत असताना जो लूक देते किंवा राजेश एकदा वैतागून सिगारेट फुंकत आपल्याकडे दुर्लक्ष करत असताना त्याची सिगारेट उडवते तेव्हा आपल्याला वाटले या बाईला उठून सलाम करावा ! नंदो भट्टाचार्यांचे छायाचित्रण ग्रेट ! ■

# मधुकर तोरडमल

## वैभवाला कमतरता नाही

माधव कुलकर्णी




म्हातारे अर्क


प्राध्यापक मधुकर तोरडमल यांना नाट्यसृष्टीत 'मामा' म्हणून सर्वजण ओळखतात. तसे नाट्यसृष्टीत आणखी बरेच मामा आहेत. आपणही कुणाचे तरी मामा असतोच. पण मामा तोरडमल ही खास व्यक्ती आहे. खरं म्हणजे त्यांना वल्लीसुद्धा म्हणायला काही हरकत नाही. त्यांची भव्य देहयष्टी आणि रुबाबदार चेहरा पाहिल्यानंतर थोडंसं टरकायला होईल पण ते आपलं वरवरचं. मीसुद्धा या मामाला थिएटरमध्येच अनेकदा भेटलो. थोड्याबहुत गप्पाही झाल्या. पण नाट्य या विषयापलीकडे गप्पांची मर्यादा गेली नाही. त्यामुळेच असेल बहुधा, त्यांच्याबरोबर मनमोकळ्या गप्पा मारण्याची हौस बळावली आणि नुकताच तो योगही जुळून आला.

तोरडमल हे एक फसवं व्यक्तिमत्त्व आहे. या फसवणुकीची सुरुवात त्यांच्या नावापासून होते. ते नगरचे रहाणारे असल्यामुळे आणि नगरमध्ये मारवाडी समाज मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे मामा तोरडमल मारवाडी असावेत अशी बहुतेकांची समज आहे. मीही त्याला अपवाद नव्हतो. पण तोरडमल हे मारवाडी नसून ९६ कुळीचे मराठा आहेत. तोरडमल ही त्यांच्या पूर्वजांना मिळालेली पदवी आहे. त्यांचं खरं आडनाव पवार.

छाया : राजदत्त, मुंबई




काळं बेट लाल बत्ती



भोवरा



चांदणे शिंपीत जा



माणूस नावाचे बेट

पण तुम्ही विचाराल की, ही जातीविषयक चर्चा कशासाठी ? बरोबर आहे. आपल्या राजकारणात आणि समाजकारणात जातीसंस्थेचं प्राबल्य अतिशय घट्ट असतानासुद्धा नाट्यसृष्टीत मात्र जातीयवादाला अजिबात थारा नाही. इथे कलावंत हीच एक जात मानली जाते. अमूक एक मराठा आहे किंवा ब्राह्मण आहे किंवा सारस्वत आहे म्हणून त्याला संधी मिळते किंवा संधी नाकारली जाते असं इथे घडत नाही. इथे उपयुक्त कोण हाच निकष मानला जातो आणि त्या दृष्टीनं विचार करता मामा तोरडमल मराठा आहेत ह्याला काही महत्त्व नाही. मामा हे वकुबाचे नाटककार, दिग्दर्शक आणि नट आहेत हेच सर्वांत महत्त्वाचं.

साहित्य संघातला दुपारचा प्रयोग आटोपल्यानंतर मामांबरोबर त्यांच्याच गाडीतून आम्ही बांद्र्याला निघतो. मराठी नटाजवळ गाडी आहे आणि ती चालवायला ड्रायव्हरही आहे हे पाहून माझी आपली उगीचच छाती फुगते.

'मामा, तुम्ही स्वतः ड्राईव्ह करता की नाही ?' मी कॅज्युअली विचारतो.

'नाही. पण बायकोला ड्रायव्हिंग शिकवलं आहे. ती मधून मधून चालवते. पुरावा हवा असेल तर हा पोचा पहा.' मामा मिष्किलपणे संभाषणाला सुरुवात करतात.

'मामा, तुम्ही म्हणे चित्रपटात कामं करायला सुरुवात केली आहे?'—मुख्य विषय घरी गेल्यावर बोलायचा असल्यामुळे मी अवांतर विषय सुरू करतो.

'होय. तोही अनुभव नटाला हवाच.'

'पण रंगभूमीवर प्रेक्षकांची दाद घेण्याची सवय लागलेल्या माणसाला कॅमेऱ्यासमोर उभं राहून अभिनय करणं कितपत मानवतं ?'

'मला मानवलंय्. त्या दृष्टीनं माझी काही तक्रार नाही.'

'मग तक्रार काय आहे ?'

'वेळ फार जातो आणि त्या मानानं मिळकत थोडी. कमी पैशासाठी इतक्या डेट्स् देणं परवडेल की नाही हे पहावं लागेल.'

'सिनेमासाठी कथा लिहिणार आहात का ?'

'हो. तसा विचार आहे. काही चांगल्या गोष्टी डोक्यात आहेत. थोडंफार पेपरवर्कही केलं आहे.'

'तरुण तुर्क...चा सिनेमा का करीत नाही? ती गोष्ट सिनेमालाही चांगली आहे.'
'त्या दृष्टीनं काही निर्मात्यांजवळ बोलणी झाली आहेत. पण थोडासा घोळही झाला आहे...सांगेन केव्हा तरी.'
वांद्र्याच्या साहित्य सहवासाजवळ मामांची फियाट येऊन थांबते. चार मजले चढून आम्ही एका प्रशस्त फ्लॅटमध्ये येतो. वर येताना पहिल्या मजल्यावर 'मधुसूदन कालेलकर' या नावाची पाटी दिसते. बाहेरूनच एक उत्तेजक वास येतो. मधल्या मजल्यावर राजाराम हुमणे रहातात. ते घर शांत वाटलं.
'मामा, मुंबईत इतका चांगला फ्लॅट, गाडी, नोकर...हे भाग्य किती मराठी नटांच्या वाट्याला आलं आहे?'—माझा उत्सुक प्रश्न. मामा मंदसे हसतात आणि तीच सम पकडून बोलायला सुरुवात करतात.
'आमच्या घराण्यात वैभवाला कमतरता नाही. आजही तोरडमलांची खानदेशात सातशे एकर जमीन आहे.'
'सातशे एकर?' मी सावरून बसतो.
'थोडीशी जास्तच. पण त्यासाठी तुम्हाला तोरडमलांच्या तीन पिढ्यांचा इतिहास ऐकावा लागेल.'
माझी उत्सुकता शिगेला पोहचते. मामा बोलू लागतात.
'माझे पणजोबा पोलीस खात्यात फौजदार होते. माणूस मोठा जबरा आणि आणि कडक शिस्तीचा. त्या शिस्तीत माझे आजोबा वाढले. एकदा ते पुण्याला मॅट्रीकची परीक्षा द्यायला गेले आणि आपण नापास होणार याची खात्री पटल्यामुळे चाळीसगावला घरी परत न जाता नगरला येऊन चक्क हमाली करायला लागले. असेच एकदा योगायोगानं काही बोजा घेऊन तेथील डी. एस. पी. च्या घरी गेले. डी. एस. पीं. चं त्यांच्याकडे लक्ष गेलं. रंगानं ते गोरे आणि अंगापिंडानं चांगलेच मजबूत होते. डी. एस. पी. ने त्यांची चौकशी केली. तेव्हा आपण कोण हे त्यांनी सरळ सांगून टाकलं. साहेबानं त्यांना 'पोलिसात भरती होतोस का?' असं विचारलं आणि ते हो म्हणाले. काही दिवसांनी त्यांचे वडील नगरला आले तेव्हा हवालदार मुलाला फौजदार पित्याला सलाम ठोकावा लागला. फौजदाराला आपला मुलगा हवालदार झालेला मुळीच सहन झालं नाही. त्यांनी डी. एस. पी.ला सांगितलं—'एक तर तो राजीनामा देईल किंवा मला द्यावा लागेल.' डी. एस. पी.नं सांगितलं—'तूच दे.'
त्यांनी राजीनामा दिला.
पुढे स्वतःच्या कर्तबगारीवर आजोबा चढत चढत पुढे गेले. त्यावेळी दरोडेखोरांनी त्या भागात धुमाकूळ घातला होता. आजोबांनी ती मोहीम हाती घेतली आणि तीन प्रमुख दरोडेखोरांना स्वतः गोळ्या घालून ठार केलं. सरकारनं त्यांचा बहुमान केला आणि साडेपाचशे एकर जमीन इनाम दिली. ह्याच आजोबांनी नाशिकच्या जॅकसन खून खटल्याची तपासणी केली.
श्रीमंतीत आणि रुबाबात माझे वडील लहानाचे मोठे झाले. तेही मोठे रुबाबदार आणि देखणे होते. शेतकी कॉलेजची पदवी त्यांनी मिळवली होती. आणि शेतावरच्या प्रचंड वाड्यात स्वतः राहून ते अफाट शेतीवर देखरेख करीत होते. त्यांनी एकूण तीन लग्ने केली. पहिल्या बायकोच्या पहिल्या बाळंतपणात तिचीच धाकटी बहीण घरी आली आणि यांच्या मनात भरली. तेव्हा लग्नाची परवानगी मिळविण्याचे काम त्यांनी आपल्या बायकोवरच सोपविलं. त्या माऊलीनं नवऱ्याचा स्वभाव विचारात घेऊन या दोघांचं लग्न जुळवून दिलं. पण ही दुसरी आई पहिल्या बाळंतपणातच देवाघरी गेली.

काही वर्षानंतर आणखी एक मुलगी त्यांच्या मनात भरली. त्याही लग्नाची परवानगी मिळवायला माझी मोठी आई त्या मुलीच्या आईकडे गेली. तिनं मुलीच्या आणि तिला होणाऱ्या संततीच्या नावानं सर्व इस्टेट लिहून मागितली. तेव्हा वडील चिडले आणि 'आठ दिवसात दुसरं लग्न करून दाखवतो.' अशी गर्जना केली. ह्या गर्जनेप्रमाणे त्यांची जी तिसरी बायको झाली तीच माझी आई.
ह्याच सुमारास एक विचित्र घटना घडली. आपल्या अफाट शेतीवर देखरेख करण्यासाठी त्यांनी वाड्यावर दुर्बीण बसवली होती. तिच्यातून पहाणी करीत असताना त्यांना दूरवर धूर दिसला. गड्याजवळ त्यांनी चौकशी केली तेव्हा एक डाकू मुक्कामाला आला आहे असं कळलं. वडिलांनी बंदूक घेऊन त्याला घेरलं. तो शरण आला आणि म्हणाला—'मी तुमचा पाहुणा आहे. मला सोडून द्या. तसं केलंत तर तुमच्या भागाला अभय देईन, स्वतः त्यांचं रक्षण करीन.'
पण वडील सरकारनिष्ठ होते. त्या काळातले सगळेच वतनदार, इनामदार सरकारनिष्ठ असण्यात भूषण मानीत. वडिलांनी त्याला बांधून पोलीस ठाण्यावर नेलं. त्याला तीन वर्षांची शिक्षा झाली. पण तुरुंगात जाताना तो म्हणाला—'बाहेर आल्यावर पाहून घेईन.' त्यावेळी वडिलांना त्याचं महत्त्व वाटलं नाही पण तो सुटून आला आणि त्यानं सूड घेण्याचा विडा उचलला आहे असं कळलं तेव्हा ते घाबरले आणि रातोरात चाळीसगावला आले. हरिभाऊ पाटसकर हे त्यांचे मित्र. हरिभाऊंनी त्यांना आपला मोकळा वाडा देऊ केला. वडिलांनी तो विकत घेतला. त्यावेळी या वाड्यात तीन सवाष्णींची भुतं आहेत हे त्यांना ठाऊक नव्हतं.

माझ्या वेळेला आई तेव्हा गरोदर होती. तिला भुताची बाधा झाली. पण काही हितसंबंधियांनी उठवलं की मोठ्या आईनंच काहीतरी करणी केली. वडिलांनी बाळंतपण हॉस्पिटलमध्ये करायचं ठरवलं. तेव्हा आयुष्यभर मुकाटपणे सोसणारी ती माऊली खवळली. त्याकाळी मोठ्या घराण्यातल्या बाया बाळंतपणासाठी हॉस्पिटलमध्ये जात नसत. 'हिला हॉस्पिटलमध्ये नेणार असाल तर माझ्या प्रेतावरूनच न्यावं लागेल.' असं मोठ्या आईनं वडिलांना खडसावलं. वडिलांनी तिचं ऐकलं आणि तिच्यावरच सर्व जबाबदारी टाकली. माझा जन्म झाला आणि त्या क्षणापासून आत्तापर्यंत आपला मुलगा म्हणूनच मोठ्या आईनं मला वाढवलं.
वडिलांचं ऐषारामी जीवन चालूच होतं. त्या मस्तीत त्यांना पन्नास हजारांचं कर्ज केव्हा झालं हे कळलंच नाही. पण एका लेवा पाटलाशी त्यांचं वितुष्ट आलं तेव्हा कर्ज वसुलीसाठी त्यानं फिर्याद केली. त्यावेळी अशा फिर्यादी मामलेदारसमोर चालत. मामलेदारकडून वडिलांना रीतसर नोटीस आली. हा मामलेदार वडिलांच्या बैठकीतला होता. त्यानं नोटीस पाठवण्याआधी आपल्याला विचारायला हवं होतं असं

वडिलांचं म्हणणं. ते त्याच्यावर रागावले आणि त्याला धडा शिकवण्यासाठी त्यांनी एक भलताच प्रकार केला.
जंगलात ते त्याला पार्टीला घेऊन गेले. मामलेदार नेहमीच्याच खाण्यापिण्याच्या बैठकीतला असल्यामुळे त्याला काही शंका आली नाही. मध्यरात्रीपर्यंत पार्टी रंगली. आणि मग वडिलांनी त्याला खडसावला आणि चक्क नागवा करून जंगलातून पिटाळला. त्या माणसानं साहजिकच मनात डूख ठेवला आणि वडिलांच्या सर्व कर्जदारांना त्यांच्याविरुद्ध एकदम उठवलं. कोर्टात केस उभी राहिली. पण आपल्यासारख्या अब्रूदार माणसानं कोर्टात आरोपी म्हणून उभं राहणं वडिलांना मानवलं नाही. ते पुण्याला आवासाहेब मुजुमदारांकडे पळून गेले. दरम्यान कोर्टात एकतर्फी निकाल लागला. माझ्या मोठ्या बहिणीच्या यजमानांनी कर्जफेड केली. वडिलांना समजुतीनं परत आणण्यात आलं. आवासाहेब मुजुमदाराच्या सल्ल्यानं आमची सर्व इस्टेट कोर्ट ऑफ वॉर्डच्या ताब्यात गेली. एकंदर प्रकाराने वडील खंगले आणि त्यातच त्यांचा अंत झाला. कोर्ट ऑफ वॉर्डनं प्रपंच खर्चासाठी फक्त नव्वद रुपये आम्हाला मंजूर केले. त्यावेळी नगरला आमच्या घोड्याच्या पागा होत्या. वीस पंचवीस नोकर होते. त्या सर्वांना रजा देण्यात आली. रडत रडत सर्वजण निघून गेले. भांडी घासायला फक्त एक मोलकरीण राहिली. खरं म्हणजे पन्नास हजाराचं कर्ज हे आमच्या एकूण इस्टेटीच्या मानानं काहीच नव्हतं. पण वडिलांच्या विशिष्ट स्वभावानं एवढं रामायण घडलं. वाईटातून चांगलं घडतं असं म्हणतात–त्याप्रमाणे कोर्टाच्या ताब्यात आमची इस्टेट सुरक्षित राहिली आणि मी सज्ञान झाल्यानंतर पुन्हा आमच्या ताब्यात आली.
नाट्यमय प्रसंगांनी भरलेल्या घराण्यात मामा तोरडमल वाढले. तेव्हा त्यांच्या रक्तात नाट्य भिनणं स्वाभाविकच होतं. मामांना लहानपणी नाटकं पाहण्याचा नाद नव्हता. आपल्या प्रतिष्ठेला साजेल अशा रुबाबात वडील त्यांना गंधर्वांच्या नाटकाला घेऊन जायचे. पण नाटकं मामांनी झोपेतच पाहिली. शाळेत सुद्धा त्यांनी मुख्यतः उनाडक्या केल्या, परीक्षा चुकवल्या. पण तो त्यांच्या बेछूटपणाचा वरवरचा आविष्कार होता. मनानं हा तरुण इंग्रजी-मराठी वाङ्मयाच्या अभ्यासात रमत होता. म्हणूनच पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून त्यांनी एम. ए. ची पदवी संपादन केली. नगरच्या कॉलेजात आपला मुलगा प्राध्यापक झाला हे कदाचित त्यांच्या वडिलांना मानवलं असतं. पण तोंडाला रंग लावून तो लोकासमोर उभा राहिलेला त्यांनी पाहिला असता तर... छे ! कल्पनाच करता येणार नाही. पण विधात्यानं तेच योजलं होतं. मामा नाटकाच्या वेडानं झपाटले जात होते. त्यावेळी सरकारी नाट्यस्पर्धांना नुकताच आकार येऊ लागला होता. पुण्याच्या प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशननं प्रा. वसंत कानेटकर यांना नाटककार म्हणून पुढे आणलं होतं. भालबा केळकर, श्रीराम लागू, श्रीराम खरे, अरुण जोगळेकर ही मंडळी आघाडीवर होती. मुंबईत नाटककार तेंडूलकरांची रंगायनबरोबर गाठ पडली होती. विजया जयवंत, अरविंद देशपांडे यांचं अभिनय नैपुण्य प्रकाशात आलं होतं. नागपुरातून पुरुषोत्तम दारव्हेकरांनी मुंबईकरावर यशस्वी आघाडी मिळवली होती. आणि त्याच सुमारास नगरच्या नाट्यप्रेमिकांना एकत्र आणून प्रा. मधुकर तोरडमल ' भोवरा ' खेळू लागले होते. स्पर्धेत या नाटकाची डाळ शिजली नाही. प्राथमिक फेरीतच ते बाद झालं. पुढे हेच नाटक, मामा मुंबईत आल्यानंतर नाट्यमंदारनं रंगभूमीवर आणलं आणि तोरडमलांच्या खुमासदार लेखणीची, शिस्तशीर कल्पक दिग्दर्शनाची आणि ठसठशीत अभिनयाची मुंबईकरांना माहिती झाली. दत्ता भट आणि मधुकर तोरडमल यांच्या अभिनयाची थक्क करणारी जुगलबंदी पाहण्यासाठी हे नाटक आवर्जुन पाहण्यात आलं.
' सैनिक नावाचा माणूस ' या तोरडमलांच्या नाटकानं प्रथमच नाट्यस्पर्धेची अंतिम फेरी पाहिली. नगरमध्ये एक सतेज नाट्यविश्व उमलत आहे हे तेव्हाच मुंबईकरांच्या लक्षात आलं. पुढल्या वर्षी ' काळे बेट लाल बत्ती ' या नाटकानं तर चक्क राज्य नाट्यस्पर्धा जिंकली आणि प्रा. मधुकर तोरडमल हे नाव सर्वतोमुखी झालं. ' काळे बेट लाल बत्ती 'चे प्रयोग झपाट्यानं होऊ लागले आणि तोरडमल व्यावसायिक रंगभूमीवर आपोआपच आणले गेले.
व्यावसायिक रंगभूमीवर नट आणि दिग्दर्शक म्हणून मामांना कधी हार खावी लागली नाही. वसंत कानेटकरांच्या ' घरात फुलला पारिजात 'चं दिग्दर्शन व त्यातील प्रमुख भूमिका त्यांनीच केली. अगदी अलीकडे ' शिकार ' आणि ' चांदणे शिंपीत जा ' या कालेलकरांच्या नाटकांचं दिग्दर्शनही त्यांचंच. तोरडमलांनी लिहिलेल्या दोन नाटकांनी मात्र (एक नाट्यसंपदेचं आणि एक चंद्रलेखाचं) व्यावसायिक यश मिळवलं नाही. पु. भा. भावे यांच्या ' सौभाग्य ' या नाटकातील विनोदी भूमिका करून त्यांनी अभिनयाचं वेगळं अंग प्रथमतःच मुंबईकरांसमोर प्रकट केलं.
परंतु एवढी धडपड करूनसुद्धा तोरडमल व्यावसायिक रंगभूमीवर स्थिर होऊ शकले नाहीत. आता नगरला परत जावं की काय असा विचार करीत असतानाच ते ' तरुण तुर्क आणि म्हातारे अर्क ' हे अफलातून नाटक लिहून गेले आणि या नाटकानं तोरडमलांचं व नाट्यमंदारचं भविष्यच उजळून टाकलं. हे नाटक चावट आहे पण अश्लिल–घाणेरडं नाही. ते तसं न होण्याचं मुख्य कारण म्हणजे प्रो. बारटक्के या अद्वितीय भूमिकेचं लेखन आणि रंगभूमीवरील तिचा तितकाच मनोज्ञ अवतार. एरवी हिटलरसारखा करडा चेहरा घेऊन रंगभूमीवर वावरणारे तोरडमल प्रो. बारटक्केचं भाबडं, बावळट आणि तितकंच निरागस व्यक्तिमत्त्व साकार करताना आपल्या नाट्यनैपुण्याचा कळस गाठतात. ठिकठिकाणी विखुरलेल्या मराठी जनतेला–विशेषतः पुणेकरांना या नाटकानं वेडं केलं आहे.
तोरडमल आपल्या यशाचा सध्या मनमुराद आनंद घेत आहेत. तरीदेखील ते त्यात गुरफटलेले नाहीत किंवा स्वस्थही नाहीत. चंबळच्या खोऱ्यातील दरोडेखोरांच्या जीवनावरील नाटक त्यांनी लिहून पूर्ण केलं आहे.
तोरडमलांच्या नव्या नव्या नाट्याविष्काराची आपण नेहमीच वाट पहाणार आहोत. □ □

मध्यंतर

# मुंबई मराठी साहित्य संघाची नवी योजना

पुष्पा भावे

हौशी नाट्यसंस्थांना आपापल्या कार्यात जाणवणारी सर्वात मोठी व्यावहारिक अडचण म्हणजे प्रयोगाचा दिवसेंदिवस वाढणारा खर्च, नाट्यगृहांच्या तारखा मिळवणे आणि प्रेक्षक मिळविण्यासाठी जाहिरातीचा खर्च करणे. व्यावसायिक नाट्यसंस्था वा नाट्यनिर्मातासंघ यांना अनेक दिवस या अडचणी माहीत असूनही त्यांनी त्याकडे लक्ष दिले नव्हते. 'मुंबई मराठी साहित्य संघा 'ने मात्र गेल्या काही वर्षांत हौशी नाट्यसंस्थांना अनौपचारिकरित्या मदत करायला प्रारंभ केला होता. 'उन्मेष 'च्या 'धडपड 'साठी पुरंदरे सभागृह उपलब्ध करून देणे, संघाच्या मुख्य नाट्यगृहाचा गुरुवार हौशी संस्थांसाठी राखून ठेवणे, संस्थांना प्रयोगसाहित्य उपलब्ध करून देणे या मार्गाने संघाने पालकसंस्थेची भूमिका स्वीकारलीच होती. याच भूमिकेतून दोन वर्षांपूर्वी हौशी नाट्यसंस्थांचा दोन दिवसांचा मेळावा त्यांनी आयोजित केला होता. मेळाव्यातूनच 'हौशी रंगमंच संघटने 'ची स्थापना झाली. ही संघटना गेली दोन वर्षे मुंबई व मुंबईबाहेरील संस्थांना मदत करण्याचे व परस्पर सामंजस्याचे वातावरण निर्माण करू पहात आहे. इतकेच नव्हे तर मुंबईच्या संघटनेपासून प्रेरणा घेऊन नागपूर, पुणे इथेही हौशी नाट्यसंस्था एकत्र येण्याचा यत्न करीत आहे.

'मुंबई मराठी साहित्य संघा 'ने गुरुवार दि. २१ मार्च रोजी बैठक घेऊन हौशी नाट्यसंचासाठी नवी प्रयोग योजना सादर केली आहे. ही योजना पुढे देत आहे. या योजनेबरोबर प्रायोगिक नाट्यसंस्थांच्या अनेक व्यावहारिक अडचणी दूर होऊ शकतील. नाट्यसंस्थांना केवळ प्रयोगासाठीच नव्हे तर प्रेक्षकशिक्षणासाठी, नाट्यविषयक अभ्यासमंडळ चालविण्यासाठी या योजनेचा फायदा घेता येईल. आता केवळ स्पर्धेसाठी एक प्रयोग अशी अवस्था आर्थिक कारणासाठी होण्याची गरज नाही.

'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया 'ने साहित्य संघाकडून बोध घ्यायला हरकत नाही. या योजनेचे यश आता हौशी नाट्यसंस्थांवरच अवलंबून आहे.

## योजना

संघाचे एक नाट्यकार्य म्हणून मुंबई मराठी साहित्य संघाने त्यावेळच्या नियामक मंडळाच्या आदेशानुसार गेली तीन वर्षे संघाचे कै. डॉ. अ. ना. भालेराव नाट्यगृह आठवड्यातून एक दिवस हौशी गटांना सवलतीच्या दराने राखून ठेवले होते. त्याशिवाय मुंबईतील काही हौशी गटांनी बसविलेली वैशिष्ट्यपूर्ण नाटके व बाहेरगावच्या हौशी गटांनी निर्मित केलेले नाट्यप्रयोग यांना सर्व प्रकारचे साहाय्य देऊन त्यांचे प्रयोग संघसदस्यांस व इतर रसिक प्रेक्षकांस विनामूल्य किंवा सवलतीच्या दराने दाखविण्याचेही कार्य केले आहे.

या नाट्यकार्याची पुढची पायरी म्हणून संघाने पुढील योजना तयार केली असून ती कार्यान्वित करण्याचे ठरविले आहे. या योजनेचे सर्वसाधारण स्वरूप व संघाने या योजनेत कोणत्या तऱ्हेने पुढाकार घ्यावयाचा आहे व त्यासाठी संघाने आठवड्यातून एक दिवस डॉ. भालेराव नाट्यगृह विनाशुल्क द्यावयाचे, ही माहिती नाट्यशाखेचे कार्यवाह डॉ. रा. अ. भालेराव यांनी नियामक मंडळाच्या दि. ६ जानेवारी १९७४ रोजी भरलेल्या सभेत दिली. नियामक मंडळाने या योजनेस संमती दिली व ती कार्यान्वित करावी असा आदेशही दिला.

दरवर्षी महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धा व इतर नाट्यस्पर्धा होतात व त्यात मुंबईचे व बाहेरगावचे बरेच हौशी गट भाग घेतात. नाट्याचे निरनिराळे प्रकार त्यात दाखविले जातात. त्या गटांना स्पर्धेतील प्रयोगांवर संतुष्ट राहावे लागते. फार तर एखाद दुसरा प्रयोग करणे शक्य असते. अधिक प्रयोग करण्याची इच्छा असताना आर्थिक बोजामुळे त्यांना ते करता येत नाही. नवीन काही करून दाखविण्याची इच्छा व शक्यता असताना आर्थिक जबाबदारीमुळे अशा गटांची कुचंबणा होते. तेव्हा सातत्याने असले प्रयोग करण्याची संधी देण्यासाठी आर्थिक जबाबदारी कमी करणे व इतर दृष्टीने सहकार्य देणे संघाला आता शक्य आहे, असे वाटल्यावरून ही योजना तयार करण्यात आली आहे.

या कामी साहित्य संघाने 'हौशी रंगमंच संघटने 'चे सहकार्य घेण्याचे ठरविले आहे. दोन वर्षांपूर्वी साहित्य संघाने महाराष्ट्रातील हौशी नाट्यसंस्था व त्यातील कार्यकर्ते यांचा एक मेळावा आयोजित केला होता. तो तीन दिवस चालला होता. त्या मेळाव्यातून 'हौशी रंगमंच संघटना ' अस्तित्वात आली. साहित्य संघाने हौशी रंगमंच संघटना व निरनिराळे हौशी नाट्यगट यांच्या सहकार्याने ही योजना कार्यान्वित करण्याचे ठरविले असून त्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे राहील.

१. वर्षभर दर गुरुवारी (रात्रौ) डॉ. भालेराव नाट्यगृह संघाने या योजनेसाठी विनाशुल्क द्यावयाचे आहे. ही योजना एप्रिल १९७४ पासून सुरू करण्यात येईल.

२. गुरुवारी करण्यात येणाऱ्या प्रयोगाबाबत कोणत्या संस्थेने केव्हा प्रयोग करावा हे वेळापत्रक ठरविण्याची संपूर्ण जबाबदारी हौशी रंगमंच संघटनेची राहील. या योजनेनुसार होणारे प्रयोग शक्यतो प्रयोगात्मक (Experimental) स्वरूपाचे राहील.

३. प्रयोग करणारी संस्था हौशी रंगमंच संघटनेची सभासद असली पाहिजे व प्रयोग करणाऱ्या संस्थेने आपल्या खर्चातून दर प्रयोगास रु. १०/– हौशी रंगमंच संघटनेला दिले पाहिजेत.

४. हौशी संस्थांनी इतर संस्थांच्या प्रयोगाची किमान ५ तिकिटे घेणे आवश्यक आहे.

५. डॉ. भालेराव नाट्यगृहात संघाचे असलेले नेपथ्याचे सामान–सहा स्पॉटस्, डीमर्स, २ सोलर्स, फर्निचर, पोशाख वापरण्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे संघ आकारणार नाही.

६. संघात असलेल्या सामानाखेरीज संघाच्या नाट्यशाखेचा प्रयोग नसल्यास इतर

सामान उपलब्ध असल्यास तेही शक्यतो विनामूल्य अथवा अल्प भाडयाच्या दरात संघ देईल.

७. हौशी संस्थांनी नाटक उभे करण्यापूर्वी संघात उपलब्ध असलेले नेपथ्य सेटस्, प्रॉपर्टी, ड्रेपरी याचा अभ्यास करून त्यातूनच संस्थेला स्वतःस लागणाऱ्या सेटसचे डिझाइन अथवा मांडणी केल्यास तशी मदत देण्यास संघ तयार आहे.

८. रंगभूषेसाठी मेकअप बॉक्स सर्व सामानासहित संघ उपलब्ध करून देईल. मात्र रंगभूषाकाराची व्यवस्था त्या त्या संस्थेला करावी लागेल.

९. उपरोक्त सवलतीशिवाय स्वयंसेवक, परवाने, जाहिरातीसाठी व्यवस्था संघातर्फे करण्यात येईल. स्वयंसेवकांचा खर्च, परवाना मिळविण्यासाठी लागणारा खर्च जाहिरात खर्च संस्थांस द्यावा लागेल. परवाना मिळविण्यासाठी लागणारे पोलीसकडून किंवा सेन्सॉरकडून लागणारे प्रयोगक्षमतेचे सर्टिफिकीट, नाटकाच्या प्रती संस्थेने संघाकडे प्रयोगापूर्वी दोन आठवडे तरी पोहोचते केले पाहिजे.

जाहिरात दोन प्रकारची असेल व त्यास लागणारा रु. १०० (दर प्रयोगी) खर्च प्रयोग करणाऱ्या संस्थेने आगाऊ संघाकडे पोहोचता केला पाहिजे. पहिला प्रकार वृत्तपत्रांतील जाहिरात. ही गुरुवारच्या दोन मराठी वृत्तपत्रांत येईल व ती लहान असेल. तीत त्या दिवशीच्या व पुढच्या गुरुवारच्या नाटकांची माहिती येईल. तिचे स्वरूप माहितीवजा राहील. नाटकाचे नाव, संस्थेचे नाव, लेखक, दिग्दर्शकाचे नाव, नाट्यगृह व वेळ असे राहील. दुसरा प्रकार—साहित्य संघ, निरनिराळ्या हौशी नाट्यसंस्था, यांच्याशी संबंधित असलेले रसिक प्रेक्षक यांची नावे (पत्त्यासह) त्या त्या संस्था देतील, त्याचप्रमाणे जे रसिक प्रेक्षक आपापली नावे नोंदण्यास सांगतील त्या सर्व व्यक्तींच्या नावाची यादी साहित्य संघ तयार करील व त्या सर्व व्यक्तींना महिन्यात होणाऱ्या सर्व चार किंवा पाच नाटकांचा कार्यक्रम एका कार्डावर छापून ती कार्डे पाठविण्यात येतील.

१०. तिकिटाचे दर रु. ३/– आणि रु. २/– एवढेच राहतील. सन्मान्य पत्रिका कोणालाच देण्यात येणार नाहीत. फोनवरून तिकिटे राखून ठेवण्याची सोय, प्रयोगापूर्वी तीन दिवसापासून करण्यात येईल; मात्र ही राखीव तिकिटे प्रयोगापूर्वी एक तास ताब्यात घ्यावी लागतील.

११. एकूण झालेल्या तिकीटविक्रीतून प्रयोगाच्या दिवशीचा संस्थेला लागणारा खर्च (हा दर जाहिरातीच्या रु. १०० सह अधिकाधिक रु. ५०० येईल असा अंदाज करण्यात आला आहे) वजा जाता शिल्लक राहिलेल्या पैशातून संघाला निम्मी रक्कम द्यावी लागेल. मात्र सदर रक्कम कधीही रु. ३२० पेक्षा अधिक असणार नाही. उरलेली रक्कम प्रयोग करणाऱ्या संस्थेला मिळेल. संघाला मिळालेली ही निम्मी रक्कम संघ शक्यतो प्रामुख्याने प्रकाश योजना, नेपथ्य, वीजसामान व व्यवस्थापन, वेषभूषा व रंगभूषापूरक सामान इत्यादी या योजनेवर होणाऱ्या खर्चासाठी करील.

ज्या संघसदस्यास, नियामक मंडळाच्या सदस्यास, अशा हौशी गटांच्या प्रयोगात्मक (Experimental) नाट्यप्रयोगात रस असेल त्यास विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी आपली व अशा नाट्यप्रयोगात रस घेणाऱ्या त्यांच्या मित्रमंडळींची नावे साहित्य संघ कार्यालयाकडे पाठवावीत म्हणजे या योजनेनुसार होणाऱ्या कार्यक्रमाची त्यांना माहिती कळविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**संपर्क :**

**दि. वि. आमोणकर**—प्रमुख कार्यवाह

**रा. अ. भालेराव**—कार्यवाह नाट्यशाखा

**शि. ना. चिखलीकर**—कार्यवाह

डॉ. भालेराव नाट्यगृह



# उद्याची रंगभूमी

## तेंडुलकर आणि कार्नाड

थिएटर अॅकॅडेमी २७ मार्चला एक वर्षाची झाली. या एका वर्षात नाट्यरसिकांच्या आठवणीत राहतील असे अनेक उपक्रम या संस्थेच्या तरुणांनी केले. (खऱ्या अर्थाने ही संस्था तरुणांचीच.) त्या अनेक उपक्रमांपैकी एक म्हणजे दरवर्षी नाटक, रंगभूमी या विषयावर जाणकारांची व्याख्याने घडवून आणणे. या वर्षी २७ व २८ मार्चला ' मला दिसणारी उद्याची रंगभूमी ' या विषयावर श्री. विजय तेंडुलकर आणि गिरीश कार्नाड यांची व्याख्याने झालीं. पुणेकरांना हा उपक्रम फारच आवडला. राज्य शिक्षण शास्त्र संस्थेचा खच्चून भरलेला हॉल याची साक्ष देत होता. श्रोतृवर्गात तरुणांची उपस्थिती जास्त ही आणखी एक जमेची बाजू. दुसऱ्या दिवशी म्हणजे २८ मार्चला डॉ. श्रीराम लागू अध्यक्षपदी होते. खरे तर ते दोन्ही व्याख्यानांना अध्यक्ष होते.पण पहिल्या दिवशी ते येऊ शकले नाहीत. दुसऱ्या दिवशी आले ते बाहेरगावाहून. गाडीतून थेट सभागृहात.

व्याख्यानाचा विषय एक. वक्ते दोन. तेही खंदे. अनुभवाचे आणि विचाराचे. तसेच कृतीचेही. दुसऱ्या दिवशी श्री. कार्नाड यांचे व्याख्यान संपल्यावर थोडासा श्रोत्यांच्या मताचा कानोसा घेतला. तरुण मंडळी दोघांवरही खूश होती. काहींना तेंडुलकरांपेक्षा कार्नाड आवडले तर काहींना याउलट. बोलण्याचा क्रमांक दुसरा असल्यामुळे कार्नाड यांची काहीशी पंचाईत झाली असावी असं मला उगाचच वाटलं.

तर त्यांचे हे उद्याच्या रंगभूमीविषयीचे विचार. प्रथम तेंडुलकर आणि नंतर कार्नाड

उद्याची रंगभूमी कशी असेल याविचारा-अगोदर रंगभूमी काल कशी होती आणि आज कशी आहे हा विचार अपरिहार्य आहे. मराठी रंगभूमीच्या बाबतीत १९४७ पासून तिच्या पुनरुज्जीवनाला आणि प्रगतीला सुरुवात झाली. आजवरचे अनेक संकेत मोडले गेले. कित्येक रूढ कल्पनांना नव्या नाटककारांनी धक्का दिला. आणि या संकेत मोडणाऱ्या मंडळींनी स्वतःच्या कळत न कळत नवे संकेत निर्माण केले. त्यातलाच एक संकेत म्हणजे रंगभूमीची किंवा नाटकाची भाषा. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भाषेचा नाटकासाठी असा एक वेगळा प्रकार होता. आणि तो संकेत तरुण लेखकांनी अगदी सहजपणे मोडला. विशेष म्हणजे हे संकेत सोडण्यात बंडखोरी नव्हती तर हे सर्व सहजगणाने झाले. कोणताही अट्टाहास न करता संपण्याच्या मार्गावर असलेले संकेत संपविले.

दुसरा बदल झाला तो नाटकाच्या साच्यात. किर्लोस्करी नाटक ते एकांकिका अशी वाटचाल दिसते. तिसरी गोष्ट म्हणजे रंगभूमीचा वास्तववाद. या वास्तववादाने मराठी रंगभूमीचा अतोनात ताबा घेतलेला दिसतो. नाटक हे प्रामुख्याने प्रेक्षकांसाठी असते. आणि वास्तववादाचा उपयोग नाटकाचा विषय प्रेक्षकापर्यंत प्रभावीपणे पोचविण्यासाठी असतो. नेमका या ठिकाणी प्रेक्षकांच्या परंपरेचा विचार अपरिहार्य ठरतो. रंगभूमीवरील वास्तववादापेक्षा रंगभूमीच्या बाहेर असलेले वास्तव केव्हाही जास्त महत्त्वाचे. हे वास्तव प्रेक्षकांसमोर मांडण्यासाठी रंगभूमीवरच्या वास्तववादाला रजा देणे कधी कधी आवश्यक ठरते. म्हणजे असे, गांधीवाद, साम्यवाद या सारख्या अनेक वादात वास्तववादाचा समावेश करू नये. रंगभूमीवर वास्तववाद आला तर तो ओघानेच यावा. त्यासाठी खास आग्रह धरू नये. विविध अनुभवांनी रंगभूमी संपन्न व्हावी हा मुख्य हेतू असला पाहिजे.

नाट्यगृहात रंगमंचाचा पडदा उघडल्यावर स्टेजवर केले जाते ते नाटक ही नाटकाची मर्यादा आता ओलांडण्याचे प्रयत्न होत आहेत. उघड्यावर, शाळांच्या वर्गात किंवा कुठेही नाटक करता येते. याला कारणे दोन. पहिले म्हणजे नाट्यगृहांची मागणी सारखी वाढते आहे आणि नाट्यप्रयोगांचा खर्चही वाढत चालला आहे. नव्या, तरुण व हौशी नाटककारांना हा खर्च परवडणे शक्य नाही. पण या पेक्षा दुसरे कारण जास्त महत्त्वाचे आहे. त्याचा सविस्तर विचार करायला हवा.

### मध्यमवर्गीय नाटक

सध्याचे नाटक हे प्रकर्षाने पांढरपेशा मध्यम वर्गीयांचे आहे. नाटकांचे विषय, प्रयोगाची जागा, प्रेक्षकवर्ग हे सबकुछ मध्यम वर्गीयच आहे. एवढेच नव्हे तर ९९॥ टक्के नाटककार देखील मध्यमवर्गीयातून आलेले आहेत. या सर्वामुळे नाटकाचा परीघ मर्यादित झाला आहे. मध्यमवर्गीयाला पचते, रुचते, जाणवते तेच नाटक सध्या रंगभूमीवर येते, यशस्वी होते. नाटककारही मध्यमवर्गीय असल्यामुळे त्यांची अनुभूती ही प्रामुख्याने मध्यमवर्गीय अनुभूती असते. अर्थात हे अगदी गैर झाले अशी टीका करण्याचा माझा हेतू नाही. या नाटककारांनी अनेक चांगली नाटके रंगभूमीवर आणली ही वास्तुस्थिती आहे. पण मध्यमवर्गीयांची अनुभूती हा रंगभूमीचा निर्णायक संकेत ठरणे योग्य नाही. मध्यमवर्गीय समाज हा एकूण समाजाचा एक छोटासा भाग असतो म्हणून त्याची अनुभूती ही खऱ्या अर्थाने समाजाची अनुभूती ठरू शकत नाही. या अनुभूतीच्या पलीकडे असलेल्या वास्तवाचा स्पर्शही मराठी रंगभूमीला होत नाही. माणसाचा व्यापक विचार रंगभूमीने अद्यापी केलाच नाही.

माणसाला विचार करायला लावणारे, घोटाळयात पाडणारे प्रश्न, डोक्यात किडे पडावेत अशा समस्या, जगणे अशक्य व्हावे अशी भोवतालची परिस्थिती. आणि परिस्थितीशी झगडणारा माणूस. फूटपाथवर राहणारा, झोपडपट्ट्यांतून राहणारा माणूस. त्याच्या अंगावरचे चिरगुटही उद्या जाणार आहे. माणसाची माणूस म्हणून असलेली किंमतही हिसकावून घेतली जाणार आहे. त्या माणसाला या सर्वांची चीड येते. शत्रू समोर दिसत नाही. मग समोर जो दिसेल तोच आपला शत्रू समजून हा माणूस त्याच्याशी लढतोय. पराभव होणार हे ठरलेले असले तरी हे असे आहे. रंगभूमीबाहेरचे वास्तव. आजचे. उद्याचे. या वास्तवाचा स्पर्श रंगभूमीला होणार नसेल, या परिस्थितीचे चित्र आजचे, उद्याचे नाटककार रंगवणार नसतील तर ते एक दुर्दैव ठरेल.

नाट्यमाध्यमाचा जनमानसावरील प्रभाव अमर्याद आहे. गुजराथमधील तरुणांनी याच माध्यमाचा कळत न कळत उपयोग करून आपले आंदोलन यशस्वी केले. थाळयाच्या गजराने अहमदाबाद हादरले, सत्ताधीशांची प्रेतयात्रा निघाली. त्यांची न्यायालयीन चौकशी झाली. सजा फर्माविल्या गेल्या. हे सारे नाटक होते. तेलंगणात थोड्या अधिक प्रमाणात याच माध्यमाचा उपयोग जमीनदाराविरुद्धच्या उठावात केला गेला. नाट्य■

माध्यमाच्या या अलौकिक सामर्थ्याची दखल नाटककारांनी घेतली पाहिजे. सर्व प्रकारचे सामाजिक संघर्ष, बऱ्या वाईट अशा सर्व सामाजिक घटना रंगभूमीवर आल्या तर रंगभूमी सर्व प्रकारच्या अनुभवांनी संपन्न होईल. या माध्यमाला चैतन्य, रसरशीतपणा येईल. हे करण्याच्या पद्धती अनेक असू शकतील. त्यासाठी रंगभूमी अधिक व्यापक झाली पाहिजे. सध्याची रंगभूमीची चौकट मोडून तिने बाहेर पडले पाहिजे. नाटकात प्रेक्षकानाही सहभागी करून घ्यायला हवे. आजच्या समाजातल्या सर्व घडामोडी, उलथापालथी सध्याच्या बंदिस्त रंगभूमीवर दाखविणे केवळ अशक्य आहे.

शेवटी प्रश्न असा येतो की, हे सगळे करायचे कोणी. प्रथम आजच्या नाटककारांनी त्यांच्या परीघाबाहेर पडायला हवे. समाज आज वेगवेगळ्या थरांवर बेचैन दिसतो. यात जे सहभागी होतात, जे लोक हे सारे भोगतात त्यांनी आपल्या अनुभूती मांडाव्यात. असे झाले तर नट, नाटककार व विषय हे सारे नवे येतील, प्रेक्षकवर्गही नवा मिळेल.

हे सारे होईल की नाही मला माहीत नाही. झालेच तर ते केव्हा होईल तेही सांगता येणार नाही. पण रंगभूमीवर सध्या जे बदल होत आहेत, नवेपणा दिसू लागला आहे. संकेत बाजूला सारले जात आहेत या मुळे असे काहीतरी होण्यास मदत होईल असे मला तरी वाटते.

### मनोरंजन हा हेतू

रंगभूमीचा हेतू निश्चितपणे कोणता आहे, या प्रश्नाच्या उत्तरावर उद्याच्या रंगभूमीचे भवितव्य आणि तिच्या विकासाची दिशा ठरविली जाईल. लोकशिक्षण, विचारास प्रवृत्त करणे, क्रांती घडवून आणणे हे नाटकाचे हेतू असतातत असे सांगणारा ब्रेश्त देखील शेवटी मनोरंजन हाच नाटकाचा एकमेव आणि अंतिम हेतू आहे असे म्हणतो. पण मनोरंजन ही कल्पनाच मुळी सामाजिक विचार आणि परिस्थितीशी संबंधित असते. इतर सर्व कलाप्रकारांपासून होणारे मनोरंजन आणि नाटकामुळे होणारे मनोरंजन यात एक महत्त्वाचा फरक आहे आणि तो फरक नाट्यकलेच्या वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपात आहे. इतर सर्व कलाप्रकार म्हणजे संगीत, चित्रकला यांचे शुद्ध स्वरूपात अस्तित्व असते. पण नाट्य हे शुद्ध स्वरूपात असूच शकत नाही. त्याचे स्वरूप थोडेसे भेसळयुक्त असते. चित्रकला, संगीत यासारख्या इतर कलांचे मिश्रण नाटकात असते. त्या त्या काळची भाषा, सामाजिक आचारविचार यांचा प्रभाव नाट्यकृतीवर पडत असतो. समाजाच्या सांस्कृतिक जीवनात रुजलेली, समाजाने स्वीकारलेली गोष्टच रंगभूमीवर येते. म्हणून नाटक किंवा रंगभूमी ही त्या त्या समाजाच्या संस्कृतीची एक प्रकारची प्रतिकृती ठरते. याचा एक परिणाम म्हणजे इतर कलाक्षेत्रात जे घडते ते सुमारे वीसएक वर्षांनंतर रंगभूमीवर येते. त्याचा स्वीकार काळाने किंवा कादंबरीने अगोदरच केलेला असतो आणि म्हणून नाटक हे लोकशिक्षणाचे माध्यम न राहता मनोरंजन हाच त्याचा प्रमुख हेतू असतो.

पण सिनेमा, व्हरायटी प्रोग्रॅम हे व इतर मनोरंजनाचे प्रकार अस्तित्वात असताना मनोरंजनासाठी रंगभूमीची गरज काय, असाही प्रश्न विचारला जातो. कारण आपल्याकडे सिनेमामुळे—म्हणजे व्यापारी हेतूने काढलेल्या सिनेमामुळे—एकामागून एक अत्यंत वेगाने घडणाऱ्या घटना म्हणजेच चांगली करमणूक असा विचार रूढ झाला आहे. एखाद्या घटनेचा परिपोष, घटनेचा क्रमबद्ध विकास ह्या गोष्टी लोकांना रुचेनाशा झाल्या आहेत. यक्षगानातील भीम—दुर्योधनाचे पाऊण तासाचे संवाद किंवा मच्छकटिकातील राजवाड्याची सहा पानी वर्णने आता लोकांना कंटाळवाणी वाटतात. लोकांना 'जॉनी मेरा नाम' मधली गतिमानता हवी आणि हे त्यांच्या मनावर ठसविण्यासाठी पद्धतशीरपणे 'ब्रेन वॉशिंग' चालू आहे. अशा सिनेमाच्या प्रसिद्धीसाठी लाखो रुपये खर्च केले जात आहेत. अमेरिकेत तर याहून पुढची पायरी गाठली गेली आहे. टी. व्ही.वर दर १०—१५ मिनिटांनी जाहिराती येतात व तसे खंडित कार्यक्रम पाहण्याची सवय लागल्यामुळे सिनेमागृहात बसून दीड तासाचा सिनेमा पाहणे त्यांना कमालीचे 'बोअरिंग' वाटते. आपल्याकडे नाटकावर सिनेमामुळे असा परिणाम झालाच आहे. उद्या टी. व्ही. मुळे आणखी होईल.

तरीपण नाटक व सिनेमा यातला मूलभूत फरक विसरून चालणार नाही. सिनेमा केवळ पडद्यावर दिसतो. त्याचा प्रेक्षकांशी काही संबंध नसतो. पण नाटक हे नाट्यगृहात जिवंतपणे घडते. फूटलाईटच्या पलीकडे व अलीकडे सर्वत्र त्याचे वास्तव्य असते. प्रेक्षक हा नाटकाचा एक भाग बनतो. म्हणून नाटककाराला नट व प्रेक्षक या दोघानाही विसरता येत नाही. ही एक प्रकारची बांधीलकी ठरते. नटाची, नाटककाराची व प्रेक्षकांची. नटाची प्रत्येककृती, नाटककाराने लिहिलेला घटनांचा क्रम यांनाही आगळे महत्त्व प्राप्त होते. कारण त्यात पुस्तकासारखे मागचे प्रकरण पुन्हा वाचणे किंवा पुढचे प्रकरण अगोदर वाचणे असा प्रकार नाही. याच ठिकाणी नेमका विषयाच्या निवडीचा आणि जबाबदारीचा आणि हेतूचा प्रश्न निर्माण होतो. कोणत्या विषयावर लिहावे, काय लिहावे यावर परिस्थितीची बंधने पडतात.

एका अर्थाने भारतीय रंगभूमीचा आज विकास होत आहे. नाटक हे माध्यम प्रादेशिक किंवा भाषेची बंधने तोडून सर्वत्र जाऊ शकते. तेंडुलकरांचे 'शांतता कोर्ट चालू आहे' कन्नड भागात होते. ते कोणालाही खटकत नाही. पण ही प्रक्रिया अशीच पुढे चालू राहण्यासाठी नाटकराने प्रेक्षकांना बरोबर घेऊन जायला हवे. सध्याचे काही तरुण नाटककार आत्यंतिक व्यक्तिवादाच्या भूमिकेतून नाटके लिहितात. नाटके सादर करतात. पण भोवतालच्या सामाजिक प्रश्नात गुंतू न पडता केलेले हे व्यक्तिवादी नाटक तग धरू शकणार नाही. प्रेक्षकांना समजणारी, अर्थपूर्ण नाटकेच टिकू शकतील. या व्यक्तिवादी नाटकांचा उदय पश्चिमेकडे झाला पण आपला प्रेक्षक आणि पश्चिमेचा प्रेक्षक यात मूलभूत फरक आहे. आजची मॅटिनी चांगली नव्हती, किंवा रविवारची वृद्धपत्रे कंटाळवाणी वाटतात या विषयावर तिकडे नाटके चालतील पण आपल्याकडे त्याचा मुळीच प्रभाव पडणार नाही. त्यादृष्टीने आजचा नाटककार आणि सामान्य माणूस याच्यात विचाराची फार मोठी दरी आपल्याकडे निर्माण झाली आहे. नाटककार आणि सामान्य माणूस याच्यात विचारांची एकात्मता असते तेव्हाच नाटके लोकप्रिय होतात.

उद्याच्या नाटककारांनी हे पथ्य पाळायला हवेच. सध्या जे लिहिले जाते त्याचा समाजाशी काही संबंधच नाही असे वाटते. त्याच बरोबर चांगली नाटके हवी असतील तर समाजाचा सांस्कृतिक दर्जाही बदलायला हवा. इतर सर्व क्षेत्रांचा विचार न करता केवळ चांगल्या नाट्यकृतीची अपेक्षा करणे गैर आहे.

—मधुकर प्रभुदेसाई

# नजर

## 'समर ऑफ ४२'- मोहाच्या कळ्यांचे दिवस

माणसाची पौगंडावस्था म्हणजे एक धुक्याचा समुद्र असतो. आपल्या आरपार सारे काही धुकेच असते. पण हे धुके मोठे लाघवी असते. हवेहवेसे वाटणारे असते. असे धूसर गुलाबी धुके आपल्या मनाला भुरळ घालीत असते. आपणही सारखे एकटक त्या धुक्याकडे पाहात असतो. मात्र आपल्याला काहीच कळत नाही. हे धुके मोठे गूढ आणि अनाकलनीय असते. मोठे फसवे असते. आपली दृष्टी मात्र नकळत धुक्यात बुडालेली असते. आपल्याला माहीत नसते की, त्या धुक्याच्या पलीकडे एक मोहाचे झाड फुलते आहे. त्या झाडाच्या नुकत्याच फुलू लागलेल्या अर्धस्फुट कळ्यांशी आपलं काहीतरी रक्ताचं नातं आहे. त्या अर्धस्फुट कळ्यांचा हळुवारपणे ठिबकणारा गंध आपल्या धमन्यांतून, आपल्या गात्रांतून पाझरू लागलेला असतो. हा रक्तगंध आपल्याच नाभीत असताना आपण त्या वेड्या मृगासारखा त्याचा शोध घेत फिरत असतो. पण डोळे उघडून पाहावे तो सभोवार धुके. त्या धुक्यातूनच एखादी मोहरलेली फांदी आपल्याला खुणावीत असते. जबरदस्त ओढ लावीत असते. आपण नकळत त्या धुक्याकडे ओढले जात असतो. काय होतंय हेच आपल्याला कळत नाही. नकळत फुलणाऱ्या फुलासारखे आपणही मग धुके होऊ लागतो. धुक्याच्या ह्या समुद्रात स्वतःच धुके होऊन बुडताना आपल्या मनात मात्र कधी न अनुभवलेल्या भावनांचा समुद्र खळबळू लागतो. लाटांवर लाटा आदळत असतात. मोहाच्या लाटा येतात. भीतीच्या लाटा येतात. सारा देहच धुके होतो आणि मग तो क्षण येतो. चालत आपल्या दारी येतो. प्रत्येकाच्या आयुष्यात हा क्षणच येतोच. कुणाच्या वाट्याला त्याचं काव्यमय रूप येतं तर कुणाच्या वाट्याला वकाल, बाजारी. पण तरी तो क्षण पकडणे, त्याला सामोरे जाणे म्हणजे आयुष्य जगणे. त्या क्षणाच्या पाठीमागे लागणारांची कीव करावी. कारण तो स्वतःहून येत असतो ना. अर्थात त्या क्षणाला कुणी काव्यमयतेच्या तरल पातळीवर भोगावं तर कुणी त्याचा बाजारही करावा. हे ज्याचे त्याचे प्रारब्ध.

अशा धुक्याच्या दिवसात जांभळाचे दिवस येतात. उन्हाळ्याच्या सुट्टीत आपल्यातला 'हर्मी' मामाच्या गावाला जातो. रानोमाळ भटकतो. दाट दाट हिरव्यागार गवतातून आपल्या उनाड मित्रांच्या बरोबर हुंदडत असतो. पुळणीवर लोळत असतो. समुद्राच्या पाण्यात खेळत असतो. अशा वेळी आपली नजरही भिरभिरत असते. मध्येच एखादं पिकलेलं टपोरं जांभूळ आपल्याला हवंहवंसं वाटतं. तर कधी नदीकाठावर भिजलेली साडी नकळत आपण एकटक बघतो. उनाड मित्रांबरोबर उंडारताना आपल्या गप्पाही मोठ्या चविष्ट अन् खमंग असतात. बालसुलभ कुतूहलातून स्त्री पुरुष संबंधाविषयी आपण हावरेपणाने ऐकत–बोलत असतो. कुणी हळूच एकादं तसल्या चित्रांचं पुस्तक चोरून आणतो. आणि ते अधाशासारखं आपण पुन्हा पुन: बघत असतो. दूर धुक्यात बघावं तसे आपण एखाद्या मोहरलेल्या बाईकडे एकटक बघत असतो. एखाद्या बाईकडे आपण नकळत जातोही. पण घाबरून काहीच न बोलता तेथून पाय काढतो. मग चिडविणाऱ्यांशी चिडून उगीच मारामारी. मग आपण थोडे धीट होतो. थोडीशी सलगी करतो. हळूहळू बोलू लागतो. एखाद्या पोरीला चित्रपटाला ही घेऊन जातो. अंधारात मात्र आपली तारांबळ उडते. मध्येच आपल्यातलाच एखादा मित्र माहीत नसलेल्या 'रबरा'चेही ज्ञान देतो. तो विकत घेताना होणारी आपली घालमेल. मग पोरींना गवताआड घेऊन जाणे. ह्या साऱ्या प्रकारात आपली छाती मात्र धडधडत असते आणि अशा धडधडत्या धुक्यात आपल्यातल्याच एखाद्या 'हर्मी'च्या आयुष्यात तो क्षण चालून येतो. एखादी प्रौढा आपल्याला जवळही करते. पण ते सारे काही इतकं विलक्षण असते की, कुठेतरी जखम होते. असे का घडते हे कुणाला कळत नाही. मग सारे आयुष्यभर ती अनोखी जखम घेऊन उरी बाळगीत आपण जगत असतो.

असले काही जिवंत क्षण, असल्या काही हुरहुर लावणाऱ्या व्यथा पुन्हा अनुभवायच्या असतील तर तुम्ही प्रतिभावंत चित्रपट दिग्दर्शक रॉबर्ट मुलीगनचे 'समर ऑफ ४२' हे इंग्रजी चित्र अवश्य बघावे. काही चित्रपट दिग्दर्शकाचे असतात, काही नटाचे असतात तर काही कॅमेऱ्याचे असतात. समर ऑफ ४२ बघताना आपल्याला असेच वाटते की, हा चित्रपट रॉबर्ट मुलीगनचा आहे किंवा ह्या चित्रपटासाठीच तो जन्माला आला असावा. आयुष्यातल्या कोवळ्या उन्हातले काही सुंदर क्षण काव्याच्या अत्युच्च अशा तरल पातळीवर पकडण्याचे यशस्वी प्रयत्न रॉबर्ट मुलीगनने केले आहेत. समर ऑफ ४२ हा मोहाच्या कळ्यांच्या दिवसांचे सुंदर चित्रण आहे. परंतु ही कथा केवळ पौगंडावस्थेची नाही तर माणसाच्या आयुष्यात नियतीने काही अटळ गोष्टी वाढून ठेवलेल्या असतात. त्यांना शरण जाणेच आपल्या हाती असते. एखाद्या जबरदस्त तीव्र दुःखाच्या आघातात माणसाला वासनेला बळी पडल्याशिवाय राहवत नाही, हे मानसशास्त्रीय सत्य सांगणारी ही कथा आहे.

हा चित्रपट पाहाताना रॉबर्ट मुलीगनच्या प्रतिभेचे उन्मेष बघत राहावेत असे वाटते. पहिली गोष्ट ज्या पौगंडावस्थेचे चित्रण करावयाचे त्याला पोषक असे धूसर वातावरण निवडून व सबंध चित्राचे धूसरतेच्या पातळीवर चित्रण करून त्याने ह्या धुक्याच्या वयाची जणू प्रतिमाच वापरली आहे. ह्या चित्रणामुळे संबंध कथेच्या आशयाला मोठी अर्थपूर्ण घनता आली आहे.

दुसरी गोष्ट ह्या कथेच्या चित्रिकरणासाठी जे वातावरण निवडले आहे ते अत्यंत अर्थपूर्ण आहे. विशाल अशा खळबळत्या सागराच्या पार्श्वभूमीवर किंवा 'कॅनव्हास'-ही कथा चित्रित करून चित्रपटातील माणसांचे भावनिक व मानसिक आंदोलन उठावदार केले आहे. अधूनमधून खळबळत्या समुद्राचे शॉट घेऊन मनातील सारी खळबळ व्यक्त केली गेली आहे. तसेच पार्श्वसंगीत म्हणून सततस मुद्राची 'गर्जना' जागती ठेवण्यात त्याने मोठी कल्पकता वापरली आहे.


तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे कॅमेरा. ह्या चित्रपटात कॅमेरा फार महत्त्वाचे काम करतो. फुलातील सुगंध उलगडून दाखवावा तसा येथे कॅमेरा दृश्या दृश्यातील अर्थ उलगडून दाखवतो. चित्रपटातील संवादापेक्षा येथे कॅमेरा फार बोलका आहे. विशेषतः चित्रपटातील शेवटचा महत्त्वाचा भाग ज्याला 'क्लायमॅक्स' म्हणता येईल तो सबंध भाग कसलेही पार्श्वसंगीत न वापरता (अपवाद रेकॉर्डची खरखर) किंवा एकही शब्द न वापरता केवळ कॅमेराच असा फिरवला आहे की ढीगभर संवादांनी ते काम झाले नसते. ह्या शेवटच्या शॉटचे चित्रण सागराची गर्जना घुमत असताना सांद्रलयीत काव्याच्या तरल पातळीवर झाले आहे. इथे आपल्याला रॉबर्ट मुलीगन प्रकर्षाने दिसतो. इथेच काय संबंध चित्रपटभरच दिसतो. पुळणीवरचे शॉट, तसले पुस्तक बघतानाचे चित्रण, हर्मी रबर घेतानाची ती धमाल, पोरींच्याबरोबर चित्रपट बघतानाची मजा अशा अनेक जागा आहेत. रसिक प्रेक्षक तेथे दिग्दर्शकाला दाद दिल्याशिवाय राहात नाही.

सुदैवाने ह्या चित्रपटातील कलाकारांची निवड अत्यंत अचूक आहे. हर्मी (गॅरी ग्रिम्स) व त्याचे बिलंदर दोस्त, हर्मीची प्रौढ मैत्रीण डोरेथी (जेनिकर ओनील) कलाकार चांगला अभिनय करतात असे म्हणणे साचेबंद होईल. ते अक्षरशः त्या भूमिका जगतात.

'ग्रॅज्यूएट' व 'समर ऑफ ४२'ची तुलना होण्याची शक्यता आहे. दोन्ही चित्रपटातील घटना सारख्याच असल्या तरी आशय मात्र भिन्न आहेत. ग्रॅज्यूएटची कथा एका विपयासक्त प्रौढेच्या भयानक वासनेला बळी गेलेल्या एका नवथर तरुणाची आहे. ती कथा तितकीच भडकपणेही चित्रित केली आहे. उलट 'समर ऑफ ४२' ची कथा नुकत्याच उमलू लागलेल्या संवेदनाशील तारुण्य सुलभ वृत्तीची आहे. ह्या कथेतील डोरेथी विषयासक्त स्त्री नाही. सुरुवातीपासून हर्मी विषयी तिला तसे काही वाटत नसते. आयुष्यातील एका जबरदस्त आघाताने ती व्याकुळ होते. युद्धावर गेलेल्या पतीचा मृत्यू हे तिचे दुःख इतके तीव्र आहे की त्या दुःखाला वाट करून देण्याशिवाय किंवा एका अदृश्य, अटळ अशा नियतीला शरण जाण्याशिवाय तिला गत्यंतरच नसते. असे आपण का वागलो हे तिलाही कळत नाही. उमगत नाही. केवळ अनावर अशा दुःखाच्या उमाळ्यातच ती हर्मीशी संभोग करते. हर्मीच्या धुक्याच्या आयुष्यात डोकावलेली ती एक मोहाची डहाळी असते. परंतु तीव्र वेदनेने ओथंबलेली म्हणून ह्या कथेचे बीज जसे पौगंडावस्थेत आहे त्या पेक्षा ते अधिक दुसऱ्या महायुद्धाच्या भयानक परिणतीत आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

समर ऑफ ४२ ही एक तरल कविता आहे. ह्या तरल कवितेला कॅमेऱ्याने पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या दिग्दर्शक रॉबर्ट मुलीगनला आपण मानतो.

—ह. शि. खरात

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. ६ ते १२ एप्रिल ७४**

## श्री. वसंतराव नाईक राजकीय रंगमंचावर

मुंबई व महाराष्ट्राच्या कुंडलीत खळबळ माजविणारे ग्रह गोल जमा होत आहेत. राहू महाराष्ट्राला बारावा झाला आहे तर केतू हा मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या चंद्राजवळ आला आहे. जवाहरलाल दर्डा प्रकरणात श्री. वसंतराव नाईक यांचे गोवले गेलेले नाव हे याचेच उदाहरण होय. त्यांच्याविरुद्ध काँग्रेस पक्षातच होत असलेला उठाव आणि उपराष्ट्रपती पदासाठी त्यांच्या नावाचा झालेला 'स्फोट' यात काही गांभीर्य व भरीव तथ्य असो वा नसो देशाच्या राजकीय रंगमंचावर नाईक यांचे नाव नजिकच्या काळात चर्चिले जाईल एवढे खरे. केंद्रीय शासनात त्यांची आवश्यकता निर्माण होईल असे स्पष्ट दिसते. महाराष्ट्रात त्यांना अंतर्गत विरोधही तीव्र होत जाणार आहे. या आठवड्यात याची चाहूल लागेल. खाडिलकर, अण्णासाहेब शिंदे, धारिया या मराठी मंत्र्यांना पंतप्रधानांकडून काही सल्लाही मिळण्याची शक्यता आहे.

### मेष : व्यवसायाचे आव्हान

या आठवड्याची सुरुवात कन्या राशीच्या चंद्राने होत आहे. सहावा, सातवा व आठवा चंद्र यावेळी तुम्हाला उद्योगाला प्रवृत्त करणार असून हे नवे क्षेत्र तुम्हाला आव्हान ठरणार आहे. शेती, खते, शेतीची अवजारे यांच्या व्यवसायात लक्ष घाला. रविवार ते मंगळवार या दृष्टीने छान आहेत. सोमवारी आर्थिक वाटाघाटी यशस्वी होतील. बुधवारी नोकरीत शुभ घटना घडेल. याच दिवशी लॉटरीचे तिकिट काढा. जमून जाईल. गुरुवारी घरी पाहुण्यांचा तळ पडणार असून शारिरिक व आर्थिक श्रम बरेच होतील. शुक्रवारी नजिकचा प्रवास घडेल. महत्त्वाची राजकीय व्यक्ती भेटेल. डोक्यात एखादी नवी कल्पना येईल. आर्थिकदृष्ट्या हा आठवडा तसा मध्यमच आहे. कर्ज काढावे लागणार नाही. उसने दिलेले पैसे परत मिळणार नाहीत. आज मात्र भांडण टाळा. **महिलांस** : तब्येतीला जपून काम करा. विवाहित महिलांनी नोकरीत पडू नये. आठवडा अनुकूल नाही. ◻

### वृषभ : परीक्षेत यश आहे

आज कन्येचा चंद्र तुम्हाला आहे. पाचवा चंद्र वृषभ राशीचा मित्र आहे. या आठवड्यात कला व कलावंत यांच्याशी संबंध येईल. नाट्य, चित्रकला, चित्रपट अशा क्षेत्रात तुमचा प्रवेश होईल. प्रसिद्धी व कीर्ती मिळेल. तुम्ही संगीताचे भक्त असाल तर आकाशवाणीच्या माध्यमातून प्रसिद्धी मिळेल. राशीवर केतू आला आहे. अद्‌भुत विद्येकडे मन वळेल. तुम्ही कोणत्याही परीक्षेला बसलेले असाल व त्याचा रिझल्ट या आठवड्यात असेल तर तुम्हाला यश मिळणार आहे. सोमवार ते गुरुवार नोकरी नसणाऱ्यांना नोकरी मिळेल. इंटरव्ह्यू होऊन राहिला असेल तर ते काम यावेळी होईल. राजकारणात भाग घेऊ नका. पैशाचे काम शुक्रवारी होईल. शुक्रवार हा तुमचा भाग्यकारक वार आहे. कोणत्याही कामाची नवी सुरुवात या दिवशी करा. **महिलांस** : संसारात सुख, आनंद मिळेल. पैशाच्या अडचणी दूर होतील. ◻

### मिथुन : फक्त पैसा सांभाळा

चौथा चंद्र कन्येचा आहे. आठवड्याची सुरुवात आर्थिक खळबळीची आहे. पैसा कमी पडेल किंवा त्यामुळे काही अडेल असे नाही. पण पैशाच्या बाबतीत काळजी घ्या. नोकरीत प्रत्यक्ष रोकडीशी तुमचा संबंध असेल तर स्वतःच्या मित्रावरदेखील विश्वास ठेवू नका. पैसा खर्च करण्यात सर्व प्रकारचा मोह टाळणे आवश्यक आहे. एवढी जर काळजी घेतली तर आठवडा अपेक्षापूर्ती करणारा आहे. मंगळवार ते गुरुवार प्रवासाचा योग आहे. मोठ्या व्यक्तीबरोबर दौरा होईल. नव्या ओळखी होतील. मन प्रसन्न होईल. आध्यात्मिक सामर्थ्य असलेल्या व्यक्तीचा सहवास लाभेल. गुरुवार शुक्रवार नोकरीच्या दृष्टीने अनुकूल. नोकरीत बदल करण्याचे विचार सोडून द्या. वरिष्ठांशी प्रामाणिक राहा. स्वतः करावयाचे काम हाताखालच्या माणसावर सोपवू नका. घरातील नोकरापासून सावध राहावे. **महिलांस** : पतिराजाबरोबर प्रवास होईल. कॉलेजमधील तरुणींनी काळजी घ्यावी. ◻

### कर्क : नोकरीत बढती

कन्या राशीचा तिसरा चंद्र असताना आपला आठवडा सुरू होत आहे. कन्या चंद्र, मान आणि बढतीचा योग होय. नोकरीच्या दृष्टीने शनिवार ते बुधवार शुभयोगावर आहेत. भावनेच्या आहारी न जाता, विचारात चंचलपणा न आणता, विशेष हेतू मनात धरून नोकरीत तुम्ही आपला पाय रोवा. ज्यांच्या नोकऱ्या कायम झाल्या नसतील त्यांच्या नोकऱ्या कायम होतील. बेकारांना त्यांच्या मनाप्रमाणे नोकरी मिळण्याचा योग आहे. प्रमोशनचे काम होईल. गुरुवार ते शुक्रवार कलावंतांना उत्तम आहे. लेखकांचे पहिले लिखाण प्रसिद्ध होईल. प्रकाशनाच्या वाटाघाटी होतील. गायकांच्या मैफली गाजतील. कागद, प्लॅस्टिक, रसायन याच्याशी निगडीत असा कोणताही उद्योग या दोन दिवसात सुरू करायला हरकत नाही. या राशीच्या व्यापाऱ्यांना सरकारचे सहकार्य मिळेल. **महिलांस** : लहान मुलींच्या अभिजात गुणाच्या विकासाला संधी मिळेल. नोकरदार महिलांना पगारवाढ मिळेल. ◻

## सिंह : महत्त्वपूर्ण घटना

या आठवड्यात तुम्हाला दुसरा, तिसरा व चौथा चंद्र आहे. रवी, शनी व मंगळ हे ग्रहदेखील अनुकूल आहेत. त्यामुळे तुम्हाला हा आठवडा विशेष महत्त्वाचा जाईल. शनिवार ते बुधवार या काळाची विशेष नोंद करून ठेवा. जी जी संधी येईल त्या त्या संधीचा लाभ उठवा. सर्वच क्षेत्रात प्रगतीचे नवे उन्मेष बहरून येतील आणि यशाचे सोपान तुम्ही भराभर चढू शकाल. राजकारणात घसरलेली गाडी पुन्हा रुळावर येईल व ती इतकी भरधाव सुटेल की तुम्हीदेखील थक्क होऊन जाल. एखादे महत्त्वाचे पद लाभावे. नोकरीत आजवरचे अपयश धुवून निघेल. शेतीपदवीधर, पॉलिटिक्सचे अभ्यासक प्रगतीपथावर येतील. चालू नोकरीत बढती-बदलीचे जमावे. नवा धंदा कोणताही करा. यश मिळेल. टीकात्मक लेखन मात्र टाळा. चौथा राहू राहत्या जागेत काही अडचणी निर्माण करील. **महिलांस** : या आठवड्यात आपल्या कामाव्यतिरिक्त इतर ठिकाणी लक्ष घालू नका. ◻

## कन्या : अडचणीवर मात

या आठवड्यात तिसऱ्या राहुचे कार्य सुरू होईल. पराक्रमातील हा राहू प्रतिकूल व अनुकूल अशा दोन्ही प्रकारच्या घटना घडवील. अनेक बाबतीत यश व अपेक्षापूर्ती मिळवून देणारा हा काळ आहे. शनिवार घरसंसारात, घरच्या कुटुंबात मजेत वेळ जाईल. सहल, मजेत फिरणे होईल. दुय्यम व्यवसायात चार पैसे मिळतील. रविवार ते बुधवार घरी पाहुण्यांची गर्दी होईल. बरेच दिवस न भेटलेले मित्र वा नातेवाईक घरी तळ ठोकतील. खर्चही बराच वाढेल. पण आर्थिक बाबतीत आठवडा वाईट नाही. पैशाच्या तात्पुरत्या गरजा भागतील. येणे वसूल होईल. प्रवासाचा बेत ठरवा. पूर्वी केलेल्या पत्रव्यवहाराची उत्तरे यावेळी येतील. तिसरा राहू यश व मानसन्मानाचे योग आणील. पण भाग्यस्थ केतू थोडी उणीव निर्माण करील. नोकरीत वरिष्ठांबरोबर संघर्ष निर्माण झाला तरी नुकसान होणार नाही. कामाचा ताण मात्र अतिशय वाढेल. विशेष करून बुधवार, गुरुवार फार ताण पडेल. **महिलांस** : क्षुल्लक गोष्ट मनाला लावून घेऊ नका. मुलांचे सुख उत्तम आहे. ◻

## तूळ : चैन कराल

या आठवड्यात पहिले दोन तीन दिवस व्ययस्थानच्या चंद्राचा तुमच्यावर प्रभाव राहाणार आहे. सध्या मूळ चंद्रावर हर्शल आहेच. रसिकता व कलावृत्ती हे शुक्राचे दोन खास गुण तुमच्या ठायी मोठ्या प्रमाणावर असतात. त्यामुळे उंची कपडे, अत्तरे, सिनेमा, नाटके, तमाशा, गाणे इतकेच नव्हे तर 'हिरवी साडी' यावर पैसे उडवाल. शनिवार ते बुधवार या मुदतीत पाय घसरणार नाही याची काळजी घ्या. गुरुवार, शुक्रवार हे दोन दिवस मात्र महत्त्वाचे ठरावेत. व्यवसाय धंद्यात प्रामुख्याने कापड व्यापार, रेशीम, सौंदर्य प्रसाधनांचा व्यापार यात चकित होण्याएवढा पैसा मिळेल. पूर्वी झालेले नुकसान भरून निघेल. नोकरीच्या दृष्टीने देखील एरवी हा आठवडा अनुकूल आहे. बेकारांची वणवण संपेल. सामान्य नोकरी मिळेल. पण पैसे मिळतील. चालू नोकरीत फारसे कष्ट पडणार नाहीत. **महिलांस** : गुरुची अनुकूलता आहे. त्यामुळे कोणत्याही कामात यश मिळेल. ◻

## वृश्चिक : लॉटरीत धनप्राप्ती

पैसा मिळून खर्च होण्यात काही गैर नाही. पैसा शिल्लक राहाणार नाही. या आठवड्यात पैसा हाती टिकणार देखील नाही. पण लॉटरीसारख्या मार्गाने तुमच्या नशिबाचे चक्र भरभराटीच्या दिशेने वळणार आहे याची नोंद घ्यावी. चौथा गुरू, आठवा शनी, नुकताच सातवा झालेला केतू हे ग्रह काही तुम्हाला फारसे अनुकूल नाहीत. पहिले दोन तीन दिवस चंद्र प्रतिकूल असला तरी बुधवार ते शुक्रवार हे दिवस अनुकूल आहेत. नोकरीत हाताखालच्या माणसांना न दुखवता गोड बोलून कौशल्याने वागा व जुळवून घ्या. महसूल खाते, बांधकाम खाते, सैन्य या क्षेत्रात काम करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तापटपणावर नियंत्रण ठेवावे. पैशाच्या बाबतीत धाडस नको. नवे वाहन अटीतटीने खरेदी करू नका. पत्नीबरोबर एकनिष्ठ राहा. मुलाचे सुख बरे आहे. राजकारणात चलती. **महिलांस** : बंगल्यात राहायची इच्छा पुरी होईल. मातृसुख मिळेल. परीक्षेत यश. ◻

## धनू : कसोटीचा काळ

गेल्याच आठवड्यात राहू बारावा झाला आहे. हा वृश्चिक राशीतील राहू खर्चाला नवी नवी क्षेत्रे निर्माण करील. काही वेळा हा खर्च कसा मिटवू अशी मोठी समस्या निर्माण होऊन तुम्ही हताश व्हाल. त्यातच तब्येतीला जपायला हवे. डोक्याला त्रास होईल असा कोणताही विचार टाळा. डोळे शांत ठेवणे व मन कलाकरमणुकीत गुंतवणे हेच यावेळी करणे फायद्याचे ठरेल. असे असले तरी मंगळवार ते शुक्रवार हे दिवस काही अनुकूल घटना घडवून आणतील व तुमच्या मनाला दिलासाही देतील. लाभस्थानी हर्शल आहे. त्याच्याबरोबर बुधवारी चंद्राची सहल चालू होईल. त्याचवेळी आर्थिक लाभाचे क्षेत्र विस्तारेल. लॉटरीत पैसा मिळण्याचा योग आहे. रेसदेखील फाय-




द्याची टरावी. पडून राहिलेल्या मालाला एकदम उठाव येईल व नफा मिळेल. सोने, चांदी, स्टील, जमिनीची खरेदी-विक्री, कागद व्यवहार, प्रकाशन, गहू हे सारे धंदे भरपूर पैसा मिळवून देतील. वायदेबाजार करणाऱ्यांचे अंदाज अचूक ठरतील. प्रतिष्ठा पैशामुळे उंचावेल. नोकरीचा कंटाळा येईल. **महिलांस** : विश्वासातील माणसांच्या सल्ल्यानेच कोणताही व्यवहार करा. उतावळेपणा नको. ¤

## मकर : नोकरीत चूक नको

तुमच्या मागचा त्रास आता बराच कमी झाला आहे. अनेक दिवस तुमची जी कोंडी झाली होती तीमधून या आठवड्यात तुमची मुक्तता होईल. चंद्राचे भ्रमण कन्या, तूळ या राशीतून होईल. त्यावेळी नोकरीत अनुकूल अनुभव यावा. शनिवार ते मंगळवार हे दिवस नोकरी करणाऱ्यांना छान आहेत. वरिष्ठांच्या आतल्या गोटात तुमचा समावेश होईल. मंत्र्याबरोबर संबंध येईल. तुमच्या बुद्धीचा उपयोग करून घेतला जाईल. खास फायदा मिळेल. सरकारी कामाच्या निमित्ताने परदेशपर्यटन घडेल. नोकरीत आजवर अपुरे राहिलेले सर्व मनोरथ पूर्ण होतील. बुधवार ते शुक्रवार संसारात पत्नीचे प्रेम मिळेल. मुलांचे कौतुक ऐकण्याचे भाग्य लाभेल. मुले भेटतील. दूरचे नातेवाईक घरी अचानक उगवतील. दुरावलेले मित्र पुन्हा सहवासात येतील. पैशाची परिस्थिती गुरुवारी सुधारेल. येणे असलेले पैसे वसूल होतील. प्रवाससुख मिळेल. नवी वस्तू मिळेल. **महिलांस** : उंची साडी मिळेल. नोकरीत पगारवाढ होईल. लघुउद्योग सुधारेल. ¤

## कुंभ : आर्थिक लाभ

पहिला गुरू, पाचवा शनी आणि भाग्यस्थ तूळ राशीचा हर्षल, तुम्हाला एवढी उत्तुंग अद्वितीय व असामान्य ग्रहस्थिती असताना आणखी काय हवे? भाग्यचक्रातील नव-बहराचे युग, प्रसन्नतेची पहाट तुमच्या जीवनात आता सुरू होणार आहे. आशा-आकांक्षा बहरून येतील. हात लावाल तिचे सोने होईल असे उत्तम ग्रहमान आहे. नोकरी, उद्योग व्यवसाय, व्यापार, प्रवास, राजकारण पैसा इत्यादी क्षेत्रात काही तरी दिव्य भव्य घडावे. शनिवार ते बुधवार या दिवशीच्या चंद्रभ्रमणात आर्थिकदृष्ट्या या वातावरणाचा प्रत्यय यावा. लॉटरीत एखादा लक्षाधीश होईल. रेसमध्ये एखाद्याचे नशीब उघडेल. व्यापारी क्षेत्रात पडून राहिलेल्या मालाला प्रचंड मागणी येईल. शेअर बाजार कडाडेल. मटका खेळणे बेकायदेशीर आहे. पण हा बेकायदेशीर खेळ खेळणारेदेखील यावेळी तरतील. नोकरीत वरिष्ठ व्हाल. आमदार, खासदारांना शासनात बढती मिळेल. **महिलांस** : उपासनेचे फळ मिळेल. साक्षात्कार होईल. पैसा मिळेल. ¤

## मीन : प्रणयाचे सुख

या आठवड्यात आपणास संसाराच्या नव्या नंदनवनात वावरण्याचा प्रसन्न योग आहे. प्रेमात पडलेले नवे तरुण, नवविवाहित तरुण एका आगळ्या मधूर वातावरणात धुंद होऊन जातील. सोमवार ते बुधवार क्रिकेट, कुस्त्या वगैरे खेळाशी निगडीत असलेल्या व्यक्तींना अनुकूल आहे. त्यांचे नाव गाजण्याचा योग आहे. यश व कीर्ती मिळेल. नोकरीलादेखील हा काळ उत्तम आहे. अपेक्षापूर्तीचा आहे. कामाचा ताण कमी होऊन आवडते काम मिळेल. खाजगी नोकरीत मालकांची मर्जी राहील. सरकारी नोकरीतील न्यायालयातील मोठे अधिकारी टीकेचे भक्ष्य बनतील. या राशीच्या राजकीय नेत्यांना लोकांपासून संरक्षण घ्यावे लागेल. पत्रकारांनी लेखणी जपून चालवावी. कुणाची मने दुखवू नयेत. सर्वसामान्य लोकांनी कर्ज काढावे लागणार नाही याची काळजी घ्यावी. **महिलांस** : तरुण स्त्रियांनी नोकरीत सावध राहावे. पैसे मिळतील. □ □

## पुस्तकं आणि बंदुक

'यिट्झॅक' नावाच्या बायॉलजीच्या इस्रायली विद्यार्थ्याला मिलिटरीत राखीव सैनिक म्हणून बोलावणं आलं. त्यानं ते अभिमानानं स्वीकारलं. जाताना त्यानं आपल्या बरोबर टेक्निशियन लायब्ररीमधून परतबोलीवर घेतलेली शेकडो शास्त्रीय विषयावरील पुस्तकंही नेली. गोलन टेकड्यांजवळच्या एका सैनिकी स्थानकावर त्याच्या पलटणीचा मुक्काम पडला होता. सीरियातील फौजांनी जेव्हा गोलन टेकड्यांवर तुफानी हल्ला चढवला तेव्हा घाईगडबडीत त्याच्या पलटणीला ते स्थान सोडून पळ काढावा लागला. हे इतक्या अनपेक्षितपण घडलं, की स्वतःच्या अनेक वस्तूंबरोबरच यिट्झॅकला ती सारी पुस्तकंही टाकून पळ काढावा लागला. फक्त इतरांप्रमाणे त्यानं आपली बंदुक तेवढी जवळ बाळगून ठेवली.

युद्धाची लाट ओसरल्यावर तो धावतच त्या पोस्टवर गेला. पण सारंच उध्वस्त झालेलं त्याला आढळून आलं. पुस्तकांसहित सारंच बाँबिंगनं बेचिराख झालं होतं. तो अस्वस्थ झाला. मौल्यवान ग्रंथ गेले होते.

यिट्झॅकनं लायब्ररीच्या डायरेक्टरना पत्र लिहिलं '..तर असं सारं घडलंय...सर्व अमोल ग्रंथ बाँबिंगमुळे अग्नये स्वाहा झाले आहेत. मी अत्यंत दिलगीर आहे. पुस्तकांची किंमत पाठवीत आहे...क्षमस्व!'

लायब्ररीच्या डायरेक्टरनं–'आन्हॉन कुट्टीननं–' यिट्झॅकला त्वरीत उत्तर पाठवलं. 'ग्रंथ रीप्लेस करता येतात. नाश झालेले ग्रंथही पुनश्च मिळवता येतील. पण तुझ्यासारखे इमानी, प्रामाणिक नि ज्ञानार्जनात रत झालेले शास्त्राचे विद्यार्थी पैदा होऊ शकत नाहीत. तू जगलास हे केवढं भाग्य! नवीन टेक्स्टबुकं तुला पाठवीत आहे. तुझ्याकडून 'निल' येणे आहे...तुझी बंदुक सुरक्षित आहे ना?'

–चित्तरंजन घोटीकर

# हा भव्य प्रकल्प संपल्यावर झोलाला एक असीम पोकळी जाणवू लागली

पृष्ठ १२ वरून

साहित्यिकांच्या मेळाव्यात सतत चर्चिले जात. झोलात होणारा बदल केवळ शारीरिक नव्हता–तर मनानेही तो पुनश्च तरुण बनला होता. तारुण्यातले सारे आनंद आता नव्याने हवेहवेसे वाटू लागले. एखादी छानपैकी तरुण मुलगी दृष्टीस पडली की त्याला वाटे, पुस्तक लिहीत बसण्यापेक्षा हिच्याशीच बोलत बसले तर?...तेच अधिक श्रेयस्कर ठरेल! त्याच्या वयातली निम्मी वर्षे जणू गळून पडली. ५० वर्षांचा झोला नवथर तरुणासारखा प्रेयसीच्या शोधार्थ जागा झाला. दृष्टी अधू! तेव्हा अगदीच जवळची...घरातली नोकराणी जेनी रोझेरॉट ही झोलाचे प्रीतीस्थान ठरली. ती उत्तम शिवणकाम करीत असे, म्हणून ॲलक्झॅण्ड्रिनने तिला घरातच ठेवून घेतलेले होते. ती २० वर्षांची तरुणी होती. सुरेख, निकोप, नम्र, कामसू व मनमोकळी होती जेनी. मान वर करून धन्याशी बोलण्याइतके धारिष्टच तिच्यापाशी खासच नव्हते. झोला आजवर स्त्रीमोहात पडलेला नव्हता. पन्नाशीच्या सुमारास तर ती शक्यता फारच कमी झाली होती. तथापी आपल्याला मूल असावं ही इच्छा मात्र उत्कट होती–दोषारोपाने चेतविली गेली होती. घरातली एक तरुण नोकराणी एमिलने जवळ करावी ही गोष्ट मदाम झोलाला पटणे शक्यच नव्हते. तिचा तडफडाट–हेवेदावे–तमाशे सुरू झाले. झोलाने तिकडे शक्य तितके दुर्लक्ष केले. इतके दिवस त्याच्या पुस्तकांतून मानवी वासनांचा मुक्त आविष्कार होत असे. प्रत्यक्ष जीवनात वासनापूर्ती झाल्यानंतर पुस्तकातून होणारा आविष्कार कमी झाला. जीवनच काव्यात्मक बनले. जेनीसाठी वेगळे घरकुल करून घेण्यात आले. जेनी काही सुशिक्षित नव्हती. पण हुशार, संवेदनाशील होती. लवकरच गर्भधारणा होऊन २० सप्टेंबर १८८९ रोजी झोलाला एक अप्रतीम सुंदर मुलगी झाली. त्या काळात झोला संपूर्ण जीवन जगत होता. लिखाण दूर सारले होते...तो एक तन्मय प्रियकर, प्रेमळ पिता झाला होता. तो, जेनी या व्यतिरिक्त त्याला कोणीही नको होते. स्वतःच्या घरी जात असे. आपले अन् जेनीचे घर यातच तो जणू बंदिस्त झाला होता.

पहिल्या प्रेमाचा आवेग ओसरल्यावर त्याने लष्करी जीवनाच्या पार्श्वभूमीवर La Debacle ( = dawnfall ) ही कादंबरी लिहिली. त्यासाठी कसून अभ्यास केला. भरपूर तपशील जमविला. चर्च, लष्कर व राजसत्ता या तिन्ही संस्थांवर शरसंधान केले. निरनिराळ्या युद्धभूमींना भेट दिली. लष्करी छावणीतला आडमुठेपणा टिपला. लष्करावर व पर्यायाने देशातल्या एकंदर बावळटपणावर प्रकाश टाकला होता. यानंतर Dr. Pascle ही कादंबरी प्रकाशात आली. त्यातला डॉ. पास्कल् म्हणजे संपूर्ण आत्माविष्कार हे सहज समजण्यासारखे होते. एकप्रकारचे स्वयंचित्रणच आहे ते. (Self portrait) झोला मनोमन खूश होता. १८९१ च्या सप्टेंबरमध्ये जेनीला मुलगा झाला. पुत्रजन्माची बातमी कळताच झोला जणू हवेत तरंगत घरी आला. आता जेनीची उत्तम व्यवस्था करायला हवी होती. मदोजवळच दुसरे घर घेतले. मुलांवर झोलाचा फार जीव होता. स्वतःच्या घरातून दुर्बिणीतून तो मुलांचे निरीक्षण करीत असे. अशा तऱ्हेने दुसरा घरोबा ठेवणे हे प्रतिष्ठित समाजात मान्य नव्हते. पत्नीला तर सवतीची कल्पनाही सहन होत नव्हती. जीव देण्याचा धाक, घटस्फोटाचा धाक इ. प्रकार चालत असत. झोलाचे मन फाटून जाई. केवळ पुत्रप्राप्तीसाठीच हा मार्ग चोखाळला होता ना? पण अलेक्झॅण्ड्राइनला ते काही पटत नसे.

'Rougon Macquast' या मालिकेतील अखेरची १९ वी कादंबरी लिहून झाली. हा भव्य प्रकल्प संपल्यावर झोलाला एक असीम पोकळी जाणवू लागली. निर्वेध रहाण्याची कधी सवयच नव्हती. मग त्याने Society of the Men of Letters या श्रेष्ठींच्या संस्थेत प्रवेश केला. लगेच त्याची कार्यकारिणीवर निवड झाली. एवढेच नव्हे तर अध्यक्षपदाची माळही लगेच गळयात पडली. सबंध राष्ट्राने त्याचा या सन्मानाबद्दल जयजयकार केला. जणू त्याच्या साहित्यसम्राटपदाला दिलेली ती उत्स्फूर्त मानवंदनाच होती. त्यानंतर Society of the Men of Letters चा अध्यक्ष या नात्याने त्याने इंग्लंडला भेट दिली. त्यावेळपर्यंत इंग्लंडमध्येही त्याचे साहित्य भाषांतरित होऊन वाचले गेले होते. झोलाची लेखक या दृष्टीने असणारी थोरवी इंग्रजांनी ओळखलेली होती. त्याचे शाही इतमामाने स्वागत करण्यात आले. 'अप्रतीम साहित्य निर्मिती करून एमिल झोला यांनी सबंध जग जिंकून घेतले आहे!' हे उद्गार, इंग्लंडच्या भूमीवर फ्रेंच लेखकाविषयी काढले जीवन ही घटना अत्यंत अर्थपूर्ण होती.

यानंतर झोलाने बराचसा प्रवास केला. बेल्जियम, जर्मनी, इटाली इ. देश पाहिले. इटालीत मुक्काम जास्त दिवस झाला. वडील इटायलीयन असल्याने झोलाला त्या देशाचे आकर्षण वाटणे स्वाभाविकच होते. तेथेही त्याचे अभूतपूर्व मानसन्मान झाले. राजेरजवाडे, पोप इ. श्रेष्ठींच्या गाठीभेटी झाल्या तेवढ्यावर विसंबून न रहाता त्याने रोममधील समाजाच्या साऱ्या स्तरांची ओळख करून घेतली. पोपशी बरीच चर्चा झाली. धर्माच्या नव्या विशुद्ध स्वरूपाविषयी पोपचे विचार त्याला ऐकायचे होते. पोपचे विचार त्याला पारंपरिक व सनातनी वाटले, प्रागतिक व बदलत्या जगाच्या विचारधारेशी सुसंगत वाटले नाहीत. बरेचसे निरीक्षण व चिंतन केल्यावर त्याने पुस्तक लिहिले. 'रोम.' नव्या युगाच्या नवधर्माचा शोध हा या पुस्तकाचा खरा आशय आहे.

यानतर Lourdes या शहरावरही अभ्यासपूर्ण पुस्तक लिहिले. एखाद्या शहराचा सर्वांगिण अभ्यास–त्याची उत्क्रांती हा विषय त्याला फार वेधक वाटला. अशाच तऱ्हेने पॅरिसवर पुस्तक का लिहू नये? हा विचार तरळत जाताच तो पॅरिसला आला. पॅरिससारखी चिरनूतन चिरसुंदर नगरी! झगझगीत प्रकाशाने झळाळणारी! बुद्धिमंतांची व कलावंतांची पेठ आणि त्यावरील प्रतिक्रिया लिहिणार झोलासारखा अंतर्वेधी कलावंत. पुस्तक अप्रतीम झाले हे काय नव्याने सांगायला हवे?

आता मात्र झोलाला सारखे लिहीत बसण्याचा एकूण कंटाळाच आला. आपल्या चिमुकल्या मुलांशी खेळावे, त्यांच्यात रमावे, त्यांना थोडेफार शिकवावे एवढीच इच्छा उरली. त्याने मित्राला लिहिले, 'या तीन शहरांवरील पुस्तकांचे कसे काय स्वागत होईल याबद्दल मी साशंक आहे. मला वाटते, मी आता थांबवावे हे उत्तम, पुरे झाले लिखाण!'

झोला इटालीहून परतला तेव्हा त्याला फक्त सामाजिक व नैतिक क्षेत्रातच रस होता. राजकारणाच्या धकाधकीविषयी सामान्यत: तो उदासीन असे. कारण मुळातच त्याला राजकारणाची गोडी नव्हती.

परंतु साठीच्या सुमारास त्याच्या गळयाभोवती राजकारणाचे फास आवळले जाण्याचा प्रसंग अगदी अभावितपणे आला खरा! व्हिक्टर ह्यूगो, लॅमर्टिन, व्हॉल्टेअर या सर्वांच्या प्रभावी भूमिका एकदम करून दाखविण्याची वेळ आली. कठोर सत्त्वपरीक्षाच ती. ज्या घटनेपायी झोला राजकारणात गुरफटला गेला, त्या घटनेचा व्यक्तिश: त्याच्याशी तिळमात्रही संबंध नव्हता. तो इटालीत पोपशी धर्मचर्चा करण्यात गुंतलेला असता फ्रान्समध्ये अल्फ्रेड ड्रेफ्यू नावाच्या निरपराध लष्करी अधिकाऱ्यावर अन्याय घडला होता. झोलाच्या हातून हा अन्याय जगाच्या वेशीवर टांगला जायचा होता. त्यासाठी प्राणपणाने राजसत्तेशी, लष्करी सत्तेशी, न्यायासनाशी, जनतेशी प्रखर झुंज द्यायची होती. झोलाचे व्यक्तिमत्त्व सबंध जगापुढे भव्योदात्त ठरविणारी ड्रेफ्यू केस अशी–

## एक नकोसा ज्यू

१८९४ मध्ये फ्रेंच लष्करी अधिकाऱ्यांना एक भयंकर गोष्ट समजली. फ्रेंच 'सीक्रेट सर्व्हिस' खात्याच्या हाती आलेल्या एका लहानशा कागदाच्या चिठोऱ्यावरून असा निष्कर्ष निघाला, की कोणी तरी फ्रेंच लष्करी अधिकारी शत्रूराष्ट्राला लष्करीदृष्टया महत्त्वाच्या वित्तंबातम्या पोहोचवितो आहे!

फितुरी! राष्ट्रद्रोह! तोही एका लष्करी अधिकाऱ्याने केलेला! कोण आहे हा बदमाश? गुन्हेगार ताबडतोब शोधून काढलाच पाहिजे. लष्करी गुपितांची गळती थांबवलीच पाहिजे! गुन्हेगाराच्या शोधासाठी लष्करी यंत्रणा कटिबद्ध झाली. चौकशीची चक्रे वेगाने फिरू लागली. त्या काळात सेमेटिक वंश विरोधी वातावरण पसरलेले होते. ज्यू लोकांचा तिरस्कार हा जवळजवळ स्थायीभाव झालेला होता. कोणताही नेकबाज फ्रेंच माणूस अशा तऱ्हेने राष्ट्राचा घात करणार नाही अशी लष्करी हडेलहप्पीत मुरलेल्या अधिकाऱ्यांची कल्पना. त्यामुळे फितुरी करणारा ज्यूच असणार हा तर्क! त्या बळावर अल्फ्रेड ड्रेफ्यू या लष्करी अधिकाऱ्यावर फितुरीचा आरोप ठेवण्यात आला. ड्रेफ्यू ज्यू होता हे सांगायला नकोच. कोणताही तर्कशुद्ध पुरावा हाताशी नसता त्याला गुन्हेगार ठरविले. डेव्हिल आयलंडवर जन्मठेप, काळ्यापाण्याची सजा भोगायला धाडून दिले. आपण निरपराध आहोत हे तो पुन: पुन्हा आवर्जून, तळमळून सांगत होता. त्यावर कोणीही विश्वास ठेवला नाही. केस मिटवून टाकली.

ड्रेफ्यूला अटक होईपर्यंत झोलाने कधी त्याचे नावही ऐकलेले नव्हते. ही घटना घडली तेव्हा तो इटालीत पोपशी चर्चा करून 'रोम' या पुस्तकास उपयुक्त असे संदर्भ गोळा करीत होता. परत येत असता अल्फान्सो दॉदेकडे झोलाने मुक्काम केला. त्या मुक्कामात दॉदेच्या मोठ्या मुलाने त्याला ही हकिकत सांगितली. ड्रेफ्यूची लष्कराने कशी मानहानी केली, सन्मान निदर्शक बिल्ले कसे ओरबाडून घेतले, त्याची तलवार कशी काड्दिशी मोडून टाकली आणि अखेर ड्रेफ्यूने आपण निरपराध असल्याचे उद्गार किती तळमळून काढले, ते सारे झोलाला सांगितले. एकांड्या अश्राप जीवाचे आर्त उद्गार! गर्दीच्या उसळत्या आरोळ्या! अनेकांविरुद्ध एक! टोकळेबाज लष्करी शिस्तीची असंख्य बिनडोक माणसे, विरुद्ध एकाकी, संवेदनाशील, निरपराध माणूस! एक चमत्कारिक भीषण नाटच झोलाच्या नजरेसमोर तरळत राहिले. उत्स्फूर्तपणे तो उद्गारला 'ड्रेफ्यू निरपराधच असला पाहिजे!'

पण आता काय त्याचे? केस पुरी होऊन गेली होती. एक साडेतीन हाताचा हाडाचा सापळा निष्पाप असूनही काळेपाणी सोसत कुजत पडला होता...त्याला तीन वर्षे उलटून गेली होती. आता कोण कुठला ड्रेफ्यू?...त्याचा केव्हाच निक्काल लागला. लष्करातल्या पाशवी शक्तीपुढे निरपराधी जीवाचा काय पाड लागणार?

यानंतर जनरल पिकार्त या फ्रेंच सीक्रेट सर्व्हिसच्या नव्या अधिकाऱ्याच्या हाती आणखी एक फितुरीचा पुरावा आला. त्यावर चक्क फितुराचे नावच लिहिलेले होते, म्हणजे फितुर ओळखण्याचा वगैरे प्रश्नच नव्हता. मेजर काउंट फर्डिनंड वाल्सिन् ईस्टरहेझी. ईस्टरहेझीचे सर्व रेकॉर्ड लक्षात घेता पिकार्तला लष्कराची चूक स्वच्छ समजली. हा फितूर आणि ड्रेफ्यूला ज्यासाठी काळ्या पाण्यावर धाडले तो फितूर एकच होता. हस्ताक्षर तेच होते. म्हणजे ज्या गुन्ह्याबद्दल ड्रेफ्यूला शिक्षा झाली तो गुन्हा वस्तुत: ईस्टरहेझीने केलेला होता.

संपूर्ण सत्य लक्षात आले तरीही ही केस पुनश्च चालवून ड्रेफ्यूला न्याय देण्याची सरकारची तयारी नव्हती. कारण त्यात न्याय, लष्कर व सरकार या सर्वांना आपापली चूक कबूल करावी लागली असती. फ्रेंच लष्कर, सरकार, विरुद्ध एक नकोसा ज्यू! असल्या नगण्य


## ऐतिहासिक व सरकारी दप्तरातील महत्त्वाचे साहित्य मिळविणे

'ऐतिहासिक महत्त्वाचे दस्तऐवज खरेदी समिती'ची बैठक खालील प्रकारच्या ऐतिहासिक व सरकारी कागदपत्रासंबंधी महत्त्वाचे साहित्याचा विचार करण्याकरता मे १९७४ च्या दुसऱ्या आठवड्यात भरण्याचा संभव आहे.

१. ऐतिहासिक कागदपत्रे–दस्तऐवज

२. सरकारी दप्तरातील हस्तलिखिते.

३. पूर्वीचे थोर व श्रेष्ठ पुरुष, उच्च दर्जाचे अधिकारी, लेखक, शास्त्रज्ञ, इत्यादींची खाजगी कागदपत्रे (परंतु यामध्ये नाणी, फोटो फिल्म खोदीव लेख, जाहिराती व मणी यांचा विचार होणार नाही)

वर उल्लेख केलेल्या साहित्य वर्गापैकी कोणत्याही प्रकारचे साहित्य जर कोणास विकत द्यावयाची इच्छा असेल तर त्यांनी मे. सेक्रेटरी 'ऐतिहासिक महत्त्वाचे दस्तऐवज खरेदी समिती National Archives of India, जनपथ, नवी दिल्ली–१ यांचेकडे तपशीलवार यादी १५ एप्रिल १९७४ पर्यंत पाठवावी.

प्रत्यक्ष मागितल्याशिवाय, विकायचे साहित्य अगोदरच पाठवू नये.

D. A. V. P. 521(136)73

माणसाला न्याय देण्यासाठी सरकारने आपली शान गमावायची? लष्कराने चूक कबूल करायची? छे छे! हे कसे शक्य आहे? केवढा प्रतिष्ठेचा प्रश्न! लष्करी सत्ता कधी चुकत असते काय? सैन्याची प्रतिष्ठा संभाळण्यासाठी एकादा ज्यू जिवंतपणी कबरीत पुरला गेला तरी काही हरकत नाही! ज्यूच ना तो? मग झाले तर! नक्राश्रू ढाळायचीसुद्धा गरज नाही! ही सत्ताधाऱ्यांची भूमिका. युद्धमंत्री, लष्करी अधिकारी हे सर्वजण आपापल्या प्रतिष्ठेची तोटकी वस्त्रे सावरून बसले. लाज राखायची, तर सीक्रेट सर्व्हिस् प्रमुखाला, पिकार्तला–आधी दूर करायला हवे होते. कारण तो निस्पृह होता. केव्हा तरी सत्य बोलून टाकले, म्हणजे सर्वांचीच पंचाईत यायची. मग काय? त्याची दूर दूर आफ्रिकेच्या जंगली विभागात बदलीच करून टाकली. जणू सत्ताधीश त्याला म्हणत होते, 'मर जा तिकडे! देशाच्या कारभारात गैरसोयीच्या सत्याची लुडबुड नको. आमची प्रतिष्ठा टिकवायला हवी. शासनाचा मान राखायला हवा. देशात अराजक का माजवायचे आहे? जा...सत्यवादी माणसा–दूर जा!'

## जमाव चिडला

'पॅरिस' या पुस्तकाची टिपणे करण्याच्या इरादाने झोला जेव्हा पॅरिसमध्ये आला, तेव्हा त्याला हा सारा भेंपकपणा समजला. त्याच्या तल्लख कल्पना शक्तीने संबंध घटनेचा अंतर्भेदी वेध घेतला. संघर्ष मुख्यतः तात्त्विक होता. प्रश्न एकट्या निरपराध ड्रेफ्यूविरुद्ध बदमाश ईस्टरहेझी असा नव्हता. तर एक निरपराध दुबळी व्यक्ती विरुद्ध सबंध राष्ट्र, सबंध लष्कर, सबंध जनता असा होता. प्रश्नाच्या कक्षा एकट्या फ्रान्सपुरत्या मर्यादित नव्हत्या, तर त्या विश्वव्यापी होत्या. या तात्त्विक संघर्षात हुच्चगिरी, दंडेली, सत्ता यांचा विजय होणार की निरपराधी माणसाचा, सत्याचा जय होणार? व्यक्ती विरुद्ध बहुसंख्य कलुषित समाज! असल्या बाळबुद्धी, द्वेषप्रेरित समाजातल्या विकृत बहुमतासाठी एका अश्राप व्यक्तीला आयुष्यातून उठवायचे का? आणि हा अन्याय धडधडीत दिसत असता सुजाण माणसांनी त्रयस्थपणे पहात स्वस्थ रहायचे का?

समरांगणात वीराने तलवार म्यानातून उपसावी अशा झोकात झोलाने आपली लेखणी सरसावली. वर्तमानपत्रातून सत्यस्थितीवर लेख लिहायला सुरुवात केली. २५ नोव्हेंबर १८९७ रोजी 'ल फिगारो' मधून पहिला लेख आला. कारुण्याने ओथंबलेल्या उत्कट स्वरात, वक्तृत्वपूर्ण शैलीत झोलाने समाजाच्या न्यायबुद्धीस आवाहन केले. सत्य, करुणा, दयाबुद्धी यांना साद घातली. राष्ट्रापुढील नैतिक संघर्षास दाद मिळालीच पाहिजे असा अट्टाहास धरला. तसे न केल्यास राष्ट्रीय नीतिमत्तेचा सर्वस्वी अधःपात होईल असा इशारा दिला. फ्रेंच समाजाला उदात्त तत्त्वांचे आकर्षण आहे. त्यासाठी फ्रेंच जनतेने केवढाले लढे दिलेले आहेत. राजक्रांतीसुद्धा करून दाखविली. शुद्ध तत्त्वांच्या रक्षणासाठी एवढी हत्या झाली...त्यांची आठवण करून देऊन झोलाने सत्य व न्याय यांचा जयघोष केला. झोलाचे तिन्ही लेख म्हणजे हृदयाला भिडणारे मूर्तिमंत काव्य आहे.

पण झोलाला एक भीषण सत्य माहीतच नव्हते...त्याला माहीत नव्हते, की बहुजनसमाज हा अजगरासारखा सुस्त असतो. आपले परंपरागत गृहीत कृत्य सहजा सहजी सोडून देण्यास तो कधीही तयार नसतो. लोकमतास विरोधी असे झोलाचे लेख प्रसिद्ध होताच फिगारोच्या अंकांची होळी झाली. संपादक बडतर्फ! वर्तमानपत्रावर बहिष्कार–झोला मुर्दाबाद या घोषणेशिवाय बात नाही. इतके दिवस लोकांनी त्याला कलावंत म्हणून डोक्यावर घेतले होते. तोच कलावंत लोकमतास वळण देण्याचा प्रयत्न करू लागल्याबरोबर, सत्याचा उपासक बनल्याबरोबर जनतेच्या मनातून पार उतरला. बहुजन समाजाचा रोष ही भयंकर गोष्ट आहे! काय त्या भयंकर शिव्या! या बाबतीत बहुजनसमाजाची कल्पनाशक्ती कवीलाही लाजवील अशी उत्फुल्ल होते.

'झोला फ्रेंच नाहीच! तो बेटा इटालियन् आहे. त्याची फ्रान्सवर निष्ठा असणे शक्यच नाही!'

'अरे ज्यूंनी त्याला पैसे चारले असणार! त्याशिवाय का तो ड्रेफ्यूची बाजू घेतोय?'

'नुसता शब्दबंबाळ खर्डेघाशा आहे झालं! अशी शब्दांची आतषबाजी करून काय साधणार हो?'

मग झोलाच्या घरावर दगडफेक...खुनाच्या धमक्या...स्फोटक पार्सले...नाना प्रकारची छळणूक. का? तर सत्याकडे डोळेझाक न केल्याबद्दल!

झोलाला हा अनुभव अगदीच नवीन होता. जमावाच्या पाशवी शक्तीची नुसती सलामीची चुणूकही फार भेदक होती. कोणताही बुझदिल मनुष्य पार कोलमडून गेला असता. जसजसा त्रास वाढत गेला, तसतशी झोलाला स्वतःच्या मानसिक सामर्थ्याची अधिकाधिक प्रचीती येऊ लागली. झोलाने या प्रश्नावर लेख लिहिल्यामुळे एक गोष्ट मात्र फार उत्तम रीतीने साध्य झाली. सबंध जगाचे लक्ष या प्रकरणाकडे वेधले गेले. इथे काही तरी असह्य अन्याय घडलेला आहे, न्यायाचा गर्भपात झालेला आहे (Miscarriage of Justice) हे जगातील सर्व सुजाण माणसांच्या लक्षात आले. त्यांना वाटू लागले, की फ्रान्समधले लोक चांगले शहाणेसुर्ते, तत्त्वनिष्ठ सजग – अन् त्यांनी अशी काय सत्याची अवहेलना चालविली आहे?

## विमुक्त, निःसंदेह

एमिल झोला व्यक्तिजीवनात भारी हळवा होता. पण सत्याची कास धरायची असा निर्धार करताक्षणी त्याच्या हृदयात जणू असीम ताकद आली. त्याने सबंध समाजाचे आव्हान स्वीकारले. शांत, खानदानी, अकादमीत प्रतिष्ठा पावलेला हा सत्याचा उपासक न्यायासाठी तीव्र लढा देण्यास सिद्ध झाला. 'ला अरोरा' या नव्या वर्तमानपत्रातून त्याने लेख लिहिले. आणि अखेर न्यायाची अशी दाबादाबी करून अश्राप व्यक्तीवर धडधडीत अन्याय केल्याबद्दल सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर जाहीर आरोप ठेवले. मुख्यमंत्र्यांना अनावृत्त पत्र लिहून जाब मागितला. त्या पत्राच्या तीन लाख प्रती देशभर पसरल्या, इतकेच नव्हे तर निरनिराळ्या खंडातून लगोलग छापून प्रसिद्ध करण्यात आल्या. उघड उघड दंड थोपटून त्याने सरकारला, लष्कराला, ज्यूविरोधकांना आव्हान केले.

प्रतिक्रिया अत्यंत भीषण झाली.

झोलाची प्रतिमा जाळली. सीन नदीत बुडविली. त्याच्या खुनाचा प्रयत्न झाला. सरकारने त्याला अजून कसे ठार मारून टाकले नाही? –त्याने सरकार व लष्कर यांचा भयंकर अपमान केलेला आहे. अशा धोकेबाज दिवट्याचा काटा काढून टाकलाच पाहिजे. अशी उघड

मागणी झाली. ज्यू लोकांचा भयंकर छळ सुरू झाला, जमावाने अनेक ज्यूंना ठार केले. झोलाच्या साहित्याचा निषेध–त्याच्यावर बंदी– असले प्रकार अविरत सुरू राहिले. असले उद्रेक झोलाला अपेक्षित नव्हते. जमावाची ही क्रूर वर्तणूक पाहून त्याला वाईट वाटले नसेल ? पण सत्याच्या उपासकाला हे सहन करावेच लागते – तो एक तपस्येचा भाग मानला पाहिजे. झोला शांत होता. त्रयस्थपणे, साक्षित्वाने सारे उद्रेक पहात होता. त्याचे मन विमुक्त, निःसंदेह होते. क्षणोक्षणी त्याच्या वागण्यातून अलौकिक उदात्तता झळाळत होती. सत्याचा उपासक असा निर्भय, निर्मोहीच असावा लागतो.

## दुसरी केस

सबंध ज्यू जमात, ड्रेफ्यूचे कुटुंब व इतर विचारी लोक (ज्यांची संख्या फारच थोडी होती) झोलाला सहानुभूती देत होते. सजग तरुण विद्यार्थ्यांचा विवेक बहुजनसमाजासारखा अद्याप कोळपलेला नव्हता. ३००० विद्यार्थ्यांनी झोलाला सहानुभूती दाखविणाऱ्या पत्रकावर सह्या केल्या. तथापी बहुजनसमाजाच्या गदारोळात मूठभर विचारवंतांचा आवाज कसा ऐकू येणार ? झोलावर सरकारने केस केली. नंतर काहीतरी कायद्याचा आधार घेऊन केस काढून घेतली. पण जाता जाता ईस्टरहेझीला निरपराध म्हणून मोकळे सोडले.

त्यामुळे पुनश्च केस उभी राहिली– सत्याचा पुरा पुरा तलास लावायला हवा होता. झोलाने अपरंपार खटपट करून पुनश्च केस उभी केली. सरकार म्हणाले ठीक आहे, पण ही केस ईस्टरहेझीच्या सुटकेच्या प्रश्नापुरतीच मर्यादित राहील. ज्या केसचा निकाल लावून झालेला आहे, (म्हणजे प्रस्तुत संदर्भात ड्रेफ्यू केस) त्याबद्दल कोर्ट विचार करणार नाही. इतकेच ठामठोकपणे सांगणे सोपे होते. परंतु सर्व घटनांची चाके एकमेकात अशी बेमालूम अटकलेली होती, की सत्य आपोआप उकलले जाणार हे उघड होते.

७ फे. १८९८ रोजी झोलाविरुद्ध दुसरी केस उभी राहिली. कोर्टाभोवती प्रचंड गर्दी. ज्यूविरोधी आरोळ्यांनी आसमंत दुमदुमलेला. त्या गर्दीत सराईतपणे गुंडगिरी करणारे लोक असंख्य होते. ईस्टरहेझीचा जयजयकार ! झोलाविरोधी घोषणांचा महापूर ! त्यादिवशी झोलाला ३०,००० पत्रे आली. काही दहशत घालणारी, तर काही सहानुभूती व्यक्त करणारी. अफवांचे पीक बेफाम ! झोलाला ज्यूंनी किती लक्ष फ्रँक्स् लांच दिली याचे आकडे – अर्थात कल्पनारम्य – फुगत फुगत २० लक्षापर्यंत पोहोचले.

कोर्टात जज्जसाहेब बेरकीपणाने झोलाला कायदा दाखवून स्वतःच्या प्रतिष्ठेचा मुखवटा सांभाळू लागले. त्या कायदेबाजपणाची चीड येऊन झोला म्हणाला,

' असला कायदा मी ओळखीत नाही. '

' अस्सं ? मग कायद्याला मान कसा द्यायचा ते आम्ही तुम्हांला बरोबर शिकवू, समजलात ?' कोर्ट उठल्यावर तो बाहेर आला. सबंध गर्दी एकदम त्याच्यावर चालून आली. मित्रांनी त्याच्याभोवती कडे करून त्याला सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला नसता, तर त्याचे हाडन् हाड तुटून गेले असते. कोणताही पोलीस झोलाचे रक्षण करण्यास सरसावला नाही. दुरून गंमत पहाण्याचे काम मनापासून केले. मित्रांनी झोलाला ढकलत–ओढत नजीकच्या इमारतीत नेले. तेथे त्याला स्नानगृहात लपून रहावे लागले. बाहेर कोणीसे ओरडले, ' झोला की जय !' क्षणार्धात जमावाने त्याला खूप चोपून काढले. झोलाचा राग त्या बापड्यावर काढला. इतके मारले की तो बेशुद्धच झाला.

अनेक तासांनंतर घेराव किंचित सैल ..पोलिसांनी वेढलेली गाडी दारात येते...मित्रांसह झोला गाडीत बसण्याचा प्रयत्न करतो... गर्दीतून भयंकर आरोळ्या...' झोला मुर्दाबाद. ' मार्ग अडविण्याचा प्रयत्न...गाडी भरधाव सुरू...लोक मागून ओरडतात...' झोलाला ठार करा !...नदीत फेका...जाळून टाका...झोला मुर्दाबाद !' वादळ वाढत जाते. झोला शांत आहे. त्याचा सद्सदविवेक स्वच्छ आहे. मग त्याने का घाबरावे ?

११ फे. १८९८. केस पुढे चालू. एक लष्करी जनरल झोलाचा ' लेखक ' म्हणून अधिक्षेप करतो. तत्क्षणी तप्तरसाने धगधगणारे उद्गार निघतात...

' प्रत्येकजण आपापल्या परीने देशाची सेवा करीतच असतो. कोणी तलवारीने, तर कोणी लेखणीने. जनरलसाहेबांनी मोठमोठे विजय मिळविले असतील, तर मीही माझ्या क्षेत्रात विजय मिळविलेले आहेतच. माझ्या साहित्यातून फ्रेंच विचार जगाच्या चारही कोपऱ्यात पसरलेले आहेत. मी आणि जनरलसाहेब या दोघांपैकी कोणाचे नाव अजरामर राहील ते भविष्यकाळच ठरविणार आहे. '

केवढा विलक्षण आत्मविश्वास !

## नरभक्षक !

एकदा प्रतिपक्षाच्या वकिलाने आरोप केला की या सर्व प्रकरणात झोला स्वतःकडे उगीचच मोठेपणा ओढून घेऊन थोरांच्या रांगेत बसण्याचा निष्फळ प्रयत्न करीत आहे. झोलाने ताबडतोब प्रत्युत्तर दिले, ' मजवर असले आरोप करून मला आपण आणखीच मोठेपण बहाल करीत आहात ! सत्य आणि न्याय या जगद्वंद्य मूल्यासाठी जो यातना सोसतो तो जगाच्या दृष्टीने मोठेपणास पोहोचतो...ड्रेफ्यू निरपराध आहे. माझा प्राण, माझी प्रतिष्ठा यांची शपथ घेऊन सांगतो की तो निरपराध आहे. या कोर्टासमोर, फ्रान्ससमोर, नव्हे सबंध जगासमोर मी हे सत्य निःसंदिग्ध शब्दात उघड करून सांगत आहे. तो जर निरपराध नसेल, तर माझे सारे साहित्य नष्ट होवो. मला त्याची पर्वा नाही ! दोन्ही सभागृहे, सरकार, लष्करी शक्ती वर्तमानपत्रे, जनमत...या साऱ्या शक्ती माझ्या विरुद्ध दंड थोपटून उभ्या आहेत. माझ्यापाशी यातले काय आहे ? काहीही नाही ! फक्त सत्य व न्याय या अमूर्त तत्त्वांचाच मला आधार आहे. मी शांत आहे...अंती सत्याचाच विजय होईल अशी माझी अविचल श्रद्धा आहे. न्यायाधिशमहाराज, आपण मला खुशाल फाशीची शिक्षा देऊ शकता. पण माझी खात्री आहे; एक दिवस असा उगवेल, की ज्या दिवशी ही माझी मातृभूमी तिचा मान राखल्याबद्दल मला धन्यवाद देईल !'

लॅबोरी (वकील) तात्काळ उद्गारले, ' नाही नाही...झोलांना फाशी देऊ नका. साऱ्या फ्रान्सचा मानबिंदू आहे. तो. '

निर्णय घेण्यासाठी ज्यूरी आत गेली...३५ मिनिटे...प्रदीर्घ काळ निकाल ? झोला दोषी आहे काय ?...

सबंध जगाला अनपेक्षित धक्का देणारा निकाल आला. होय ! दोषी ! ७ विरुद्ध ५ मतांनी झोलाला कोर्टाने दोषी ठरविले.

झोलाच्या तोंडून एकच शब्द आला. 'नरभक्षक!'

विरुद्ध पक्षात आनंदी आनंद! त्यांच्या कल्पनाशक्तीला उधाण आले. ५० वर्षांपूर्वी मरून गेलेल्या झोलाच्या वडिलांचा 'चोर' म्हणून उद्धार झाला. ज्या आधारावर हा आरोप करण्यात आला होता ते दस्तऐवज झोलाने पहायला मागितले. पुनश्च न्यायासनासमोर फेरतपासणीची मागणी केली. झोलाच्या वकिलाने आश्वासन दिले की २-३ महिन्यात सर्व पुरावा गोळा करून फालतू आरोप उडवून लावू.

कोर्टातून येतायेता झोलाच्या मित्रांनी व वकिलांनी त्याला देशांतर करण्याचा सल्ला दिला. अशा रीतीने पळून जाणे झोलासारख्या स्वाभिमानी व्यक्तीला पसंत पडणे शक्यच नव्हते. प्रतिपक्षीयांनी त्याचे केवढे भांडवल केले असते! असली मानहानी करून घेण्यासाठीच का सत्याची एवढी कड घेतली होती? पण त्याला भविष्याची कल्पना दिली. सत्याचा पाठपुरावा करायचा आहे ना? मग त्यासाठीच अज्ञातवास पत्करणे जरूर आहे. तो येथे राहील तर त्याला आमरण तुरुंगात टाकून देतील. आणि मग ज्या तात्त्विक संघर्षासाठी भांडायचे, त्या महत्कार्याचा सर्वस्वी विचका होईल. निघून जाण्यात मानसिक यातना होतील हे खरे, पण कदाचित त्या सोसल्यानेच नियतकार्य सुलभ होईल.

## 'अधिक चांगला माणूस बनलो'

नाईलाजाने झोलाने देशत्याग करण्याचे ठरविले. १८ जुलै १८९८ रोजी तो गुप्तपणे इंग्लंडला निघून गेला. ५ वर्षांपूर्वी शाही इतमामाने स्वागतसमारंभ झाला होता. आता अज्ञातवासात रहायचे होते, काही काळ तरी अज्ञाताच्या थडग्यात जिवंतपणी पुरून घ्यायचे होते.

फ्रान्समध्ये वावडयांचे पीक! कोणी म्हणे तो बेल्जमला गेला, तर कोणी म्हणे हॉलंडला. स्वित्झरलंडमध्ये त्याला पाहिल्याचे कोणी छातीठोकपणे सांगू लागले. तोतया झोला सापडू लागले...अनेक वदंता, अफवा सारेच हास्यास्पद, सारेच खोटे!

अतःपर झगडा अधिक उच्च स्तरावर आला. सुरुवात ड्रेफ्यूवरून झाली आणि त्याचे पर्यवसान वंश, धर्म, जात, राजकीय हेतू इ. अमूर्त मूल्यांच्या संघर्षात झाले. रस्त्यारस्त्यावर मारामाऱ्या चालत. लठ्ठालठ्ठी होई. इस्रायली लोक, जगभरचे इस्रायली लोक एकत्र येत होते. ड्रेफ्यू प्रकरणावर सर्वत्र सारखी चर्चा चालत असे. ड्रेफ्यूला ख्रिस्ततर झोलाला त्याचा अग्रदूत मानण्यापर्यंत काही रूपके पसरत होती. विरुद्ध पक्षीयांच्या कल्पनारम्य भराऱ्या तर काय वर्णाव्या?

झोलाला इंग्लंडमध्ये पहिल्याच दिवशी ओळखण्यात आले. नंतर त्याला लपत छपत जागा बदलत रहावे लागले. निर्जन ठिकाणी तो लहानशी इंग्लिश कॉटेज घेऊन राहू लागला. भाषा समजत नव्हती. मग व्याकरणाचे पुस्तक आणवून त्याने इंग्लिश भाषा शिकण्यास सुरुवात केली. एखाद्या जखमी चित्त्यासारखा तो झोपडीत येरझारा घालीत राही. लवकरच त्याने आपले अर्धवट हस्तलिखित मागवून घेतले, आणि Fecondite ही कादंबरी पूर्ण करण्यास सुरुवात केली.

झोलाने देशांतर करताच सरकारने त्याचा Legion of Honours हा सन्मान काढून घेतला. त्याचा निषेध करण्यासाठी अनातोल फ्रान्सने त्या पदाचा सरळ राजीनामा दिला. सरकारने कितीही दडपादडपी केली तरी सत्य काही कायम दडून राहिले नाही. अखेर त्याला पंख फुटलेच. खोटे दस्तऐवज करणाऱ्या लष्करी अधिकाऱ्याने गळा कापून घेऊन आत्महत्या केली. तत्पूर्वी गुन्ह्याची कबुली देऊन टाकली. ईस्टरहेझी तुरुंगात डांबला गेला. त्याची बाजू घेऊन भांडणारांनी राजीनामे दिले. दुसरे पदाधिकारी सत्तेवर आले. पुनश्च केस उभी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

झोला अद्यापही अज्ञातवासात होता. तथापी जेनी, डॅनिस व जेम्स् इंग्लंडला येऊन त्याच्याजवळ रहात होते. हा दिलासा फार मोठा होता. झोलाला इंग्लिश लोकांनी ओळखले होते. पण सत्याच्या शोधार्थ अज्ञातवास पत्करलेल्या शूराला इंग्लिश लोकांनी औचित्यपूर्ण वागणूक देऊन आपला दिलदारपणा दाखवून दिला.

३ जून १८९९ केस पुनश्च उभी करण्याचा सरकारी हुकूम सुटला. डेव्हिलस आयलंडवरून ड्रेफ्यूला बंदोबस्ताने मायदेशी आणण्यात आले. आपल्या मागे केवढे रामायण घडले याची त्या बिचाऱ्याला काहीही कल्पना नव्हती. झोलाने प्राणपणाने दिलेली लढत— स्वीकारलेला अज्ञातवास— जेरूसलेम, न्यूयॉर्क येथील सिनेगॉगस्कडून जमा होणारा फंड— संबंध जगातला जागा झालेला सदसद्विवेक . काही काही त्याच्या गावी नव्हते. १ जुलै १८९९ रोजी त्याचे पाय मातृभूमीला लागले. पार वाळून कोळ झाला होता तो! केस पांढरे . नजरेत वेडसर झाक— वाणी दुबळी— एक हरवलेला माणूस!

पुनश्च केस! निकाल?... दोन विरुद्ध ५ मतांनी ड्रेफ्यू दोषी! दोषी?... हा जगावेगळा न्याय ऐकताच एकूणएक विवेकी माणसांच्या काळजात धस्स झाले. असा कसा निकाल लागू शकला? निकाल देणाऱ्यांचे मत असे, की आधी लष्कराची प्रतिष्ठा सांभाळा, अन् मग न्यायाचा विचार करा!

ड्रेफ्यूला १० वर्षांची शिक्षा देण्यात आली. तथापी राष्ट्राध्यक्षांनी स्वतःच्या अखत्यारीत त्याला माफी देऊन टाकली. असली क्षमा स्वीकारणे त्याला मुळीच पसंत नव्हते. कारण त्यात गुन्हा केल्याची सुप्त कबुली दिली गेली असती. पण ड्रेफ्यूच्या घरचे लोक आता अगदी रंजीस आले होते. पुरे झाले! क्षमा घ्या अन् सोडून द्या. आपण निरपराध असल्याने पुनश्च नोकरीवर घ्यावे असा त्याने अर्ज केला, व तो मान्यही झाला. त्याला पूर्वीचा हुद्दा, लष्करी मानसन्मानदर्शक बिल्ले इ. सर्व काही मिळाले.

केस उभी राहिल्यावर झोला मायदेशी आला. सत्याचा पाठपुरावा करून निरपराध व्यक्तीच्या पाठीशी धैर्याने उभे राहून, न्याय मिळवून दिल्याबद्दल सबंध जगाने झोलाची वाहवा केली. झोला हा नुसता महाकवी नव्हे तर महाकाव्य जगणारा धीरोदात्त साहित्यिक आहे याचा सबंध जगाला प्रत्यय आला. 'या ड्रेफ्यू प्रकरणामुळे मी अधिक चांगला माणूस बनलो' असे झोला म्हणत असे. टॉलस्टॉय, मार्कट्वेन, लेनिन् अशा श्रेष्ठींनी झोलावर स्तुतिसुमने उधळली. जगभर या सत्याच्या उपासकाचा जयनाद निनादत राहिला. तरुण लेखकांच्या मंडळाचे अध्यक्षपद चालून आले. Fecondite प्रसिद्ध झाली. लोकप्रीयतेचा नवा उच्चांक! लोक ताज्या उत्साहाने झोला वाचू लागले. त्याच्या डोक्यात पुनश्च काहीतरी लिखाण करण्याचे विचार येत होते. पण प्रत्यक्ष लिखाण मात्र सुरू केले नाही. झोलाला खूप

थकवा आला होता. मनावर ताण पडला होता. आता जरा शांत निरामय– संथ जीवन जगायचे होते.

झोलाची पत्नी आता खूपच समंजस बनली होती. जेनीची मुले घरी आलेली तिला चालत असत. कित्येकदा ती, झोला आणि मुले फिरायला जात. डॅनिस अतिशय सुरेख होती. जेक्स् बुद्धिमान होता. झोलाला आता त्याच्या गोजिरवाण्या बछड्यात रमायचे होते.

२९ सप्टेंबर १९०२. रात्रीची वेळ. झोला व अलेक्झॅण्ड्रिन् शयनगृहात आले. १३ व्या लुईच्या शाही पलंगावर आरामात झोपायचे होते. थंडी फार. दारे खिडक्या बंद. कोपऱ्यात शेगडी पेटती होती. बेताची ऊब... बरे वाटत होते. लागली झोप. रात्री ३ च्या सुमारास मदामच्या पोटात कळमळल्यासारखे झाले. ती उठून बाथरूममध्ये गेली. तिला वांती झाली. आवाजाने झोला जागा झाला. 'आपल्या खाण्यात काहीतरी वेडेवाकडे आले असेल !' ही त्याची प्रतिक्रिया. ती झोपायला आली. झोलालाही बेचैन वाटू लागले. तो उठला... त्याला धाप लागली तसाच उभा राहिला... 'अग जरा खिडकी उघडतो. कदाचित मोकळ्या हवेत बरं वाटेल आपल्याला !'

'नको रे एमिल्– एकदम गारवा येईल. सर्दी होईल तुला.' ती इतके बोलते आहे तोच धाडकन् झोला खाली कोसळला. तिने उठायचा प्रयत्न केला. बेल वाजवून नोकराला उठवायचे होते. पण तेवढ्यात तिचीही शुद्ध हरपली. दुसऱ्या दिवशी सकाळचे नऊ वाजून गेले तरी झोलाच्या खोलीत काहीच जाग ऐकू येईना. नोकर बावरले. अखेर कुलूप तोडून आत प्रवेश करावा लागला. झोलाचा प्राण जाऊन ८० मिनिटे झाली होती. मदाममध्ये किंचित् धुगधुगी होती. तिला लगेच हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. झोलाच्या मृत्यूचे कारण ? कार्बन् डाय ऑक्साइड. प्राणवायूचा अभाव. खरोखरच त्याने खिडकी उघडली असती तर हा अनर्थ टळला असता.

मृत्यूविषयी अतोनात चर्चा... अफवा...! कोणी म्हणे त्याने आत्महत्या केली, तर कोणी म्हणे त्याला बायकोने वीष दिले... काय वाट्टेल ते ! सारेच विचित्र ! जेनी व जेकस या दोघांची मात्र हा राजकीय खून असला पाहिजे अशी खात्री होती. (१९२७ साली म्हणजे झोलाच्या मृत्यूनंतर २५ वर्षांनी एका अनाम व्यक्तीने तशी कबुलीही दिली. शयनगृहातील शेगडीवर जे धुराडे होते, ते अपरात्री बंद करण्यात आले व शहराला जाग येण्यापूर्वी उघडले गेले. दारे खिडक्या बंद, खोलीत अग्नी– आणि धुराडे हेतूतः बंद करविलेले, म्हणून मृत्यू आला !– तथापी हे प्रकरण कोणीही धसास लावले नाही– सरकारने अधिकृत रीत्या कार्बन डाय ऑक्साइडमुळे निधन झाले असे जाहीर करून टाकले.)

५ ऑक्टोबरला अंत्ययात्रा. ड्रेफ्यू आला. अंत्ययात्रेला उपस्थित रहाण्याचा त्याचा विचार मादामला आवडला नाही. अंत्ययात्रा तरी शांत, निर्वेध असू दे अशी तिची बिचारीची अपेक्षा होती. ड्रेफ्यू– मूर्तिमंत कृतज्ञता– त्याला दुःखाचे कढ आवरेनात. त्याने येण्याचा हट्टच धरला. 'अरे बाबा, तुझ्या जिवाला धोका होईल– म्हणून तरी तू येऊ नकोस !' त्याने प्रथम मान्य केले– पण अखेर तो गर्दीतला एक अनामिक म्हणून आलाच. झोलाची अंत्ययात्रा लष्करी इतमामाने काढायची की नाही यावर मतभेद होते– तथापी अखेर लष्करी इतमामाने मानवंदना देण्याचे ठरलेच.

झोलाच्या अंत्ययात्रेस अपरंपार जनसमुदाय उपस्थित होता. जगाच्या कानाकोपऱ्यातून शोकसंदेश येत होते. झोलाचे भक्त तारेने फुले पाठवीत होते. पुष्पमंडित गाडीतला या लोकप्रिय साहित्यिकाचा देह फुलांच्या राशीत जणू बुडाला होता. मागून दोन गाड्या भरून नुसती फुलेच फुले. फ्रान्समधले एकूण एक श्रेष्ठी आलेले होते. अनातोल फ्रान्स हा एकेकाळचा झोलाचा प्रतिस्पर्धी. पण तोही आलेला होता. अंत्ययात्रेत मध्येच कोठेतरी आवृत्त चेहेऱ्याने जेनी चालली होती. तिचे पाऊल उचलत नव्हते. दोन मुलांच्या आधाराने ती सरकत होती....

अखेर अनेक भाषणे.. अनातोल फ्रान्स म्हणाला, 'झोला म्हणजे मानवी सद्सदविवेकाची जाग होती ?'.. झोलाच्या स्तुतीला महापूर आलेला होता. लोक रेटारेटी करीत होते...एका कोपऱ्यात थोडीशी कुरबूर...मारामारी पोलिसी दंडुक्याचा प्रयोग...चार डोकी फुटली जमाव पांगला !

फ्रान्सच्या राष्ट्रीय आदराच्या व्यक्तींसाठी पॅन्थॉन ही खास जागा ठेवलेली आहे. झोलाचे अवशेष त्या ठिकाणी ठेवून त्याविषयीचा परमादर व्यक्त करावा असे ठरले. त्यानुसार ५ जून १९०८ रोजी झोलाच्या अवशेषांचे पुनर्दफन करण्यात आले. त्यावेळी मादाम, जेनी डॅनिस, तिचे पती, जेकस्, ड्रेफ्यु कुटुंबीय इ. मंडळी आलेली होती. झोलासारख्या श्रेष्ठ विचारवंताला, साहित्यिकाला, सत्याच्या उपासकाला अखेरची मानवंदना देण्याचा गंभीर प्रसंग होता तो ! लोकांच्या मनातला ज्यूद्वेष अद्यापही संपला नव्हता. ग्रेगरी नावाच्या ज्यू-विरोधकाने दफन चालू असता ड्रेफ्यूवर मागून २ गोळ्या मारल्या. पैकी 'एकीमुळे त्याच्या दंडाला जखम झाली. भळभळ रक्ताची धार ! सर्वांचा थरकाप झाला, गडबड–धरपकड...! पण जखमी स्थितीतही ड्रेफ्यू शांत होता. मुद्रेवरील अति मंद स्मित सांभाळीत तो जखमी हात उंचावून सांगत होता, 'काही झालं नाहीय् हो. मला काही झालं नाहीय्.' तरीही दंगा झाला–अनेकांची डोकी फुटली. १०० गुंडांना पकडण्यात आले ! असा तो पुनर्दफनाचा प्रसंग !

झोलाच्या मृत्यूनंतर मादामने जेनीच्या मुलांना एमिल झोलाचे नाव लावण्याची कायदेशीर परवानगी दिली. आपल्यामागे संपत्तीचा वारसाही दिला. डॅनिस लग्न झाल्यावर एका ऑपरेशनमध्ये लवकरच वारली. जेकस् उत्तम डॉक्टर झाला. जेनी १९१४ मध्ये व अलेक्झॅण्ड्रिन १९२५ मध्ये मरण पावल्या.

झोलाच्या मृत्यूनंतरही फ्रेंच सरकारचा झोलाविषयक आकस कमी झाला नाही. १९३९ मध्ये The life of Emil zola नावाचा अप्रतिम चित्रपट निघाला होता. त्याला फ्रान्समध्ये बंदी होती. सिनेमातला झोला सरकारवर धडाधडा आरोप ठेवीत जातो. ते ऐकण्याची तत्कालीन पंतप्रधानांची (ते स्वतः ड्रेफ्यूच्या बाजूचे असूनही) तयारी नव्हती.

सरकारी आसनांनी कितीही आकस बाळगला, तरी झोलाचे नाव इतिहासात अजरामर होईलच. चांगला साहित्यिक कलावंत...

आणि त्याहीपेक्षा, धैर्यशाली, सत्यनिष्ठ आणि न्यायाची चाड असलेला माणूस !

आता झोला पॅन्थॉनच्या स्मशानभूमीत खिडक्या नसलेल्या बंद काळोख्या घरात; व्हिक्टर ह्यूगोच्या शेजारी चिरनिद्रा घेत पडलेला आहे. शेजारून सेनचे प्रशस्त पात्र खळाळत वहात आहे – शांत, सुंदर, प्रसन्न झुळझुळणारे पाणी. दोन्ही तटावर बहरणारे पॅरिसचे चिरनूतन जीवन; त्याचे नित्य नवे विभ्रम ! झोलाची समाधी प्रत्येक अधुऱ्या मनाला आश्वासन देते ..धीर सोडू नकोस ! माणसाची काही काही स्वप्नेनिश्चितपणे प्रत्यक्षात येत असतात ! खरी होतात !

# म्हैसाळ दि. ८ ते १२ मे ग्रामायन शिबिर शेतमजुरांनी आमंत्रित केलेले....

सामाजिक, आर्थिक परिवर्तनाचे कार्य प्रामुख्याने ग्रामीण भागात व्हावयास हवे. कारण हा देश खेड्यांचा आहे. ग्रामायन ही ह्या दृष्टीने यथाशक्ती प्रयत्न करणारी एक नवी संस्था आहे. ज्या व्यक्ती व संस्था ग्रामीण भागात परिवर्तनाचे कार्य करीत असतील त्यांच्याशी संबध जोडावा, ठिकठिकाणच्या अशा संस्था व व्यक्तींचा परस्पर सहयोग घडवावा, नवीन व्यक्ती व संस्था यांना या कार्यात भाग घेण्यास प्रवृत्त करावे असे ग्रामायनचे सध्याचे कार्य आहे.

या कार्याचा एक भाग म्हणून पुढील महिन्यात एक शिबीर आयोजित केले आहे. त्यात महाविद्यालयामधील निवडक विद्यार्थी व ग्रामीण भागातील कार्यकर्ते भाग घेणार आहेत. ज्या भागात परिवर्तनाचे प्रयोग यशस्वी ठरले आहेत त्या भागात शिबीर घेणे अधिक चांगले. यादृष्टीने मिरजजवळील 'म्हैसाळ' हे ठिकाण शिबिरासाठी निवडले आहे म्हैसाळचे एक वैशिष्टय असे, की अगदी तळाशी दबलेल्या दलित शेतमजुरवर्गाचे कर्तृत्व तिथे फुललेले आहे. पाच-सात वर्षांपूर्वी अत्यंत निकृष्ट अवस्थेत राहणारा हा मजूरवर्ग एकत्र आला, सावकारांच्या तावडीतून त्याने आपल्या जमिनी सोडविल्या, एक सामुदायिक सहकारी शेती संस्था स्थापन करून सर्वांनी उन्नती साधली. आज या शेतमजूरांनी स्थापन केलेली श्री विठ्ठल संयुक्त सहकारी शेती सोसायटी या भागातील एक चोख व आदर्श सामुदायिक शेती संस्था म्हणून ओळखली जात आहे.

पुढील महिन्यातील 'ग्रामायन 'च्या शिबिरासाठी या श्री विठ्ठल सामुदायिक शेती संस्थेच्या सभासदांनी निमंत्रण दिले आहे व ग्रामायननेही ते स्वीकारले आहे. आर्थिक व सांस्कृतिक परिवर्तनाचा एक यशस्वी प्रयोग जवळून पाहण्याची संधी यामुळे सर्वांना लाभणार आहे.

शिबिराची कालमर्यादा एकूण पाच दिवस. यापैकी तीन दिवस आसपासच्या परिसरात हिंडून शिबिरात भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी एक लहानशी पहाणी करावयाची आहे. यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन व माहिती शिबिरात सहभागी होणाऱ्या प्राध्यापक वर्गाकडून दिली जाईल. नंतरच्या दोन दिवसात अनुभवांची, विचारांची देवाण-घेवाण व तदनुषंगाने निर्माण होणाऱ्या प्रश्नांवर चर्चा.

निवास व भोजनाची व्यवस्था या सामुदायिक शेताजवळील एका राहुटीत होईल. चर्चेसाठी 'सामाजिक समतेच्या प्रयत्नांचा व विचारांचा आढावा' आणि 'ग्रामीण भागातील आर्थिक विकासाची समस्या' हे दोन विषय ठेवले आहेत. चर्चेत अनेक अनुभवी कार्यकर्ते भाग घेणार आहेत.

शिबिरास उपस्थित राहू इच्छिणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी दि. २० एप्रिलपर्यंत ग्रामायन कार्यालयाशी पत्रद्वारे वा प्रत्यक्ष भेटून संपर्क साधावा. (कार्यालयाची वेळ सायंकाळी ५॥ ते ७॥.)

पत्रात नाव, पत्ता, वय, सामाजिक कार्याचा अनुभव इत्यादी स्वतःची सविस्तर माहिती कळवावी. प्रवेश शुल्क पाच रुपये. शिबिरास जाण्यायेण्याचा खर्च स्वतःस करावा लागेल.

शिबिराचे स्थळ : म्हैसाळ, ता. मिरज, जि. सांगली.

शिबिरकाल ८ मे १९७४ ते १२ मे ७४

कार्यक्रमाचा तपशील नंतर कळविण्यात येईल. पत्रव्यवहार अध्यक्ष, 'ग्रामायन', द्वारा साप्ताहिक 'माणूस', १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० या पत्त्यावर करावा.

**प्रा. वसंत देशपांडे**
अध्यक्ष, ग्रामायन

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**